


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार १६ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




# ८ अल्पवयीन मुलींचे १८ व्हिडिओ, ३९ फोटो व्हायरल




## ◆ आणखी दोघे जेरबंद ◆ आरोपींची संख्या चार

**अमरावती/प्रतिनिधी:-**अमरावती जिल्ह्यातील परतवाडा परिसरात सोशल मीडियावर अल्पवयीन मुलींचे आक्षेपार्ह फोटो व व्हिडिओ व्हायरल केल्याच्या गंभीर प्रकरणाने खळबळ उडाली असून, पोलिसांनी आतापर्यंत ४ आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणात तब्बल ८ पीडित मुलींचे १८ व्हिडिओ आणि ३९ फोटो आढळून आल्याने गुन्ह्याची व्याप्ती अधिकच भीषण असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अयान अहमद (वय १९, परतवाडा) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २९४, तसेच पोक्सो कायदा (कलम ८, १२) आणि माहिती तंत्रज्ञान कायदा २००० (कलम ६७, ६७-अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला २१ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून त्याचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

■ **लैंगिक शोषणाची कबुली-**मुख्य आरोपी अयानने अमरावतीतील एका मित्राच्या भाड्याच्या घरात पीडित मुलीचे लैंगिक शोषण केल्याची कबुली दिली आहे. त्या अनुषंगाने संबंधित व्यक्तीलाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

■ **५ मोबाईल जप्त, फॉरेन्सिक तपास सुरू-**आतापर्यंत या प्रकरणात ५ मोबाईल जप्त करण्यात आले असून, त्यांची न्यायवैद्यकीय (फॉरेन्सिक) तपासणी करण्यासाठी प्रयोगशाळेत पाठविण्याची प्रक्रिया सुरू आहे. याशिवाय आणखी ४ संशयितांना चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे.

### पीडितांमध्ये मुस्लीम तरुणींचाही समावेश

या प्रकरणातील पीडितांमध्ये मुस्लीम तरुणींचाही समावेश असल्याने समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, हे प्रकरण माणुसकीला काळीमा फासणारे असून उद्या आयोगाचे पथक परतवाडा येथे भेट देणार आहे. दुसरीकडे, स्थानिक मुस्लीम संघटनांनीही आक्रमक पवित्रा घेतला आहे. काझी म्यासुद्दीन यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने पोलिसांना निवेदन दिले असून, 'अशा नराधमाला धर्माच्या चष्म्यातून न पाहता भरचौकात कठोर शिक्षा द्या,' अशी मागणी केली आहे.

### व्हॉट्स ॲप-टेलिग्रामवर व्हिडिओ शेअर


तपासात आरोपी अयानने हे व्हिडिओ आपल्या मित्र उजेर खान (वय २०, अचलपूर) याला पाठवले असल्याचे निष्पन्न झाले. पुढे उजेरने हे व्हिडिओ मो. साद (वय २२) आणि तरबेज खान (वय २४) यांना व्हॉट्स ॲपवर शेअर केले. या तिघांनीही व्हिडिओ पुढे प्रसारित केल्याचे उघड झाल्याने त्यांनाही अटक करण्यात आली आहे. याशिवाय, टेलिग्रामद्वारेही व्हिडिओ पाठवण्यात आल्याचा धक्कादायक खुलासा झाला असून संबंधित व्यक्तीलाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

# अकोल्यात ऊष्माघाताचा पहिला बळी

## 44 अंश तापमानाने घेतला जीव; ऑटोमध्ये आढळला मृतदेह

**अकोला/प्रतिनिधी :**राज्यात उन्हाचा कडाका वाढत असतानाच, अकोल्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. अकोला शहरात एका मालवाहू ऑटोमध्ये अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. या व्यक्तीचा मृत्यू उष्माघातामुळे झाला असावा, असा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून अकोल्याचे तापमान जागतिक स्तरावर चर्चेचा विषय ठरत आहे.

जुने शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका मालवाहू ऑटोमध्ये हा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाची पाहणी केली असता, अंगावर कुठल्याही जखमा किंवा मारहाणीच्या खुणा आढळल्या नाहीत. त्यामुळे कडक



उन्हाचा तडाखा बसून या व्यक्तीचा मृत्यू झाला असावा, असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला असून, वैद्यकीय अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. अकोला जिल्ह्यात गेल्या ४ दिवसांपासून सूर्य आग ओकत आहे. मंगळवारी (१४ एप्रिल) अकोल्याचे तापमान ४४ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले, हे जगातील दुस-या क्रमांकाचे सर्वाधिक तापमान ठरले आहे. १० एप्रिलपासून तापमानात सातत्याने वाढ होत आहे.

**पोलिसांनी काय सांगितले?**

'मृतदेहावर जखमा नाहीत, त्यामुळे उष्माघाताचा अंदाज आहे. तरीही आम्ही शवविच्छेदन अहवालाची वाट पाहत आहोत,' अशी माहिती जुने शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार नितीन लेव्हलकर यांनी दिली. अकोल्यातील या घटनेने प्रशासनाचे धाबे दणाणले असून, नागरिकांनी दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे टाळावे आणि स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# अकोला अन् कलबुर्गी ठरली जगातील सर्वाधिक ऊष्ण शहरे; पारा 44 अंशांवर

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात उन्हाचा कडाका वाढला असून सूर्याच्या प्रखर किरणांनी नागरिक अक्षरशः होरपळून निघत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात उष्णतेची लाट असताना विदर्भावर मात्र सूर्याची विशेष वक्रदृष्टी पाहायला मिळत आहे. अकोला शहरात सलग तिस-या दिवशी देशातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली आहे. एल्डोराडो या जागतिक हवामान संकेतस्थळाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, मंगळवारी अकोला आणि कर्नाटकातील कलबुर्गी या दोन शहरांनी जगातील सर्वात उष्ण शहरांचा मान पटकावला. या दोन्ही शहरांत ४४ अंश सेल्सिअस इतक्या विक्रमी तापमानाची नोंद झाली आहे. यामुळे केवळ भारतच नव्हे, तर संपूर्ण जगात अकोल्याची उष्णता चर्चेचा विषय ठरली आहे.

● **उन्हात बाहेर जाणे टाळावे-** अकोला शहराचे तापमान मंगळवारी ४४ अंश नोंदवले गेले. शहराचे हे या वर्षातील सर्वाधिक तापमान आहे. पाच दिवसांत अकोल्याचे तापमान तब्बल ५.३ अंशांनी वाढले आहे. भारतीय हवामान विभागाने अमरावती व अकोल्यात १६ ते १९ एप्रिल दरम्यान उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. बुलडाण्यात १७ ते १८ एप्रिल दरम्यान उष्णतेची लाट राहणार आहे. तर वर्धा येथे १८ एप्रिलला उष्णतेची लाट येणार आहे. यवतमाळमध्ये १७ ते १८ एप्रिलदरम्यान उष्णतेची लाट राहणार आहे. दरम्यान, गत पाच दिवसांत अकोल्याचे तापमान ३८.७ अंशांवरून वाढून ४४ अंशांवर पोहोचले आहे. अकोला शहराचे तापमान हे २० एप्रिलपर्यंत निरभ्र, कोरडे, अति उष्ण राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी दुपारी १२ ते ४ वाजेदरम्यान उन्हात बाहेर जाणे टाळावे.

● **चक्कर येत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या-**ज्वलनशील पदार्थांपासून दूर राहावे. लहान मुले व पाळीव प्राण्यांना गेट बंद असलेल्या वाहनात, पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. तहान लागलेली नसली तरी जास्तीत जास्त पाणी प्यावे. अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम ही उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे आहेत. चक्कर येत असल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्या. पशुधन, पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवावे. त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

● **आभाळ निरभ्र, सूर्यकिरणे थेट जमिनीवर-**कर्नाटक व लगतच्या महाराष्ट्रात उच्च दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. यामुळे हवा खाली दाबली जात असल्याने ती गरम होत आहे. यामुळे जमिनीलगतची उष्णता वातावरणात वर जाऊ शकत नसल्याने तापमान वाढत आहे. वेस्टर्न डिस्टर्बन्स कमकुवत झाले आहे. त्यामुळे त्यांचा प्रभाव ओसरला असून आभाळ निरभ्र झाले आहे. त्यामुळे सूर्याची किरणे थेट जमिनीवर पडून तापमान वाढत आहे, असे हवामानतज्ज्ञांनी सांगितले.

● **अकोल्याचे तापमान ४५ अंशाचा टप्पा ओलांडणार-**अकोल्याचे तापमान ४८ तासांत ४५ अंशाचा टप्पा ओलांडण्याचा अंदाज आहे. अरबी समुद्रावरून येणा-या बाष्पयुक्त वा-यांचे प्रमाण घटले असून कोरड्या हवामानामुळे तापमानात वाढ होत आहे. अमरावती, वाशिम, यवतमाळ, वर्धा, बुलडाणा जिल्ह्यात २० तारखेपर्यंत तापमानाचा पारा सतत वाढत जाण्याची शक्यता आहे.

# CBSE बोर्ड १०वी सत्र-१ चा निकाल जाहीर: ९३.७०% उत्तीर्ण

## ◆ मुलींनी पुन्हा बाजी मारली ◆ तिरु वनंतपुरम टॉपवर ◆15 मे पासून सत्र 2 सुरू



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सेंट्रल बोर्ड ऑफ सेकेंडरी एज्युकेशन म्हणजेच CBSकने १०वी सत्र - १ चा निकाल जाहीर केला आहे. मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९४.९९% आहे, तर मुलांचे प्रमाण ९२.९५% आहे. तृतीयपंथी विद्यार्थ्यांनीही ९१.३०% निकालासह यंदा उत्कृष्ट कामगिरी केली आहे. तिरु वनंतपुरम विभागाचा निकाल ९९.७५% सह सर्वोत्तम लागला आहे. उमेदवार अधिकृत वेबसाइट results.cbse.nic.in आणि उमंग ॲपवर आपला निकाल तपासू शकतात. यावर्षी सुमारे २५ लाख विद्यार्थी सएच्क बोर्डाच्या १०वी सत्र १ च्या परीक्षेत सहभागी झाले होते, ज्यांचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.

**गुणवत्ता यादी जाहीर केली जाणार नाही-** CBSE बोर्ड गुणवत्ता यादी जाहीर करत नाही. याशिवाय, निकालात कोणताही टॉपर घोषित केला जात नाही. बोर्ड सर्व शाळा आणि शैक्षणिक संस्थांना हे निर्देश देखील देतो की, कोणत्याही विद्यार्थ्याला शाळा किंवा जिल्ह्याचा टॉपर घोषित करू नये.

**नवीन टू बोर्ड सिस्टिम अंतर्गत झालेल्या परीक्षा :** या वर्षी सीबीएसईने इयत्ता १०वीच्या परीक्षा नवीन टू बोर्ड सिस्टिम अंतर्गत आयोजित केल्या आहेत. पहिली बोर्ड परीक्षा (अनिवार्य) : १७ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ दरम्यान झाली होती. तर दुसरी बोर्ड परीक्षा (पर्यायी) १५ मे ते १ जून २०२६ पर्यंत होईल.

**१५ मे पासून होतील सएच्क १०वी सत्र २ परीक्षा:** १०वी बोर्ड सत्र - २ परीक्षा त्या विद्यार्थ्यांसाठी आहे ज्यांना त्यांचे गुण सुधारायचे आहेत. यात जास्तीत जास्त ३ गुणांमध्ये सुधारणा करण्याची संधी मिळेल. याव्यतिरिक्त, २ विषयांत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना कंपार्टमेंट श्रेणीत ठेवण्यात आले आहे, जे दुसरी परीक्षा देउ शकतात. तीन किंवा त्याहून अधिक विषयांत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना २०२७ ची मुख्य परीक्षा द्यावी लागेल.

# 'कैसे हराया..' फेम सहर शेखचे नगरसेवकपद जाणार

## तहसीलदारांकडून मोठी कारवाई

**ठाणे / प्रतिनिधी-** महापालिका निवडणूक निकालानंतर राज्यात चर्चेत आलेल्या युवा नगरसेविकेचे पद धोक्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा



येथील एमआयएमची नगरसेविका सहर शेखचे जात प्रमाणपत्र अवैध असल्याचा अहवाल ठाणे तहसीलदार उमेश पाटील यांनी दिला आहे. सहर शेख आणि वडील युनुस शेख यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी शिफारस उमेश पाटील यांनी आपल्या अहवालात केली आहे. उपविभागीय जिल्हाधिकारी ठाणे आणि कोकण विभाग जातपडताळणी समितीकडे शिफारस केली. सहरच्या वडिलांचे जात प्रमाणपत्र अवैध असल्याची तक्रार सिद्दीकी अहमद यांनी केली होती. सहर हिच्याविरोधात सिद्दीकी अहमद यांनी तक्रार केली होती. त्यावर चौकशी करण्यात आली. त्यात सहर दोषी असल्याचे आढळले आहे. आता सहरचे नगरसेवकपद जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणाची चौकशी ठाण्याचे तहसीलदार उमेश पाटील यांनी केली. उमेश पाटील यांनी याबाबतचा अहवाल तयार केला. जातपडताळणी विभाग, निवडणूक विभाग आणि ठाणे उपविभागीय जिल्हाधिकारी कार्यालय यांची फसवणूक केल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. एमआयएमची नगरसेविका सहर शेख ही मूळची उत्तर प्रदेश राज्यातील गाझियाबाद येथील रहिवासी आहे.

# राजधानीचे इंजिन ऐन प्रवासात पडले बंद

## मालगाडीच्या इंजिनने ओढण्याची आली वेळ, प्रवाशांचे हाल

**नागपूर/प्रतिनिधी :** बल्लारशाहहून नागपूरकडे येणा-या बेंगळुरू-हजरत निजामुद्दीन राजधानी एक्स्प्रेसचे




गुमगावजवळ इंजिन बिघाडल्याने गाडी पाच वाजेपर्यंत नागपूरला पोहोचू शकली नाही. प्रवाशांचे हाल झाले. अखेर मालगाडीचे इंजिन लावून गाडी नागपूरला आणण्यात आली. रेल्वे प्रशासनाची धावपळ उडाली.

बल्लारशाहहून दुपारी १२.१५ वाजता नागपूरकडे रवाना झालेली २२६९१ बेंगळुरू -हजरत निजामुद्दीन राजधानी एक्स्प्रेस नियोजित वेळेनुसार दुपारी २.५५ वाजता नागपूर स्थानकात पोहोचणे अपेक्षित होते. मात्र गुमगावजवळ पोहोचताच इंजिनमध्ये अचानक बिघाड झाला. यामुळे तात्काळ थांबवण्यात आले. अचानक गाडी थांबल्यामुळे प्रवाशांमध्ये सुरुवातीला संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. काही काळ नेमके काय झाले, याची माहिती न मिळाल्याने प्रवाशांची चिंता वाढली होती. या अनपेक्षित बिघाडाचा थेट परिणाम गाडीच्या वेळापत्रकावर झाला. नियोजित वेळेनुसार नागपूरला पोहोचणारी ही गाडी सायंकाळी पाच वाजेपर्यंतही स्थानकात दाखल झाली नव्हती. परिणामी दिल्लीकडे होणारे पुढील प्रस्थानही उशिराने झाले. राजधानीसारख्या महत्त्वाच्या आणि वेळेचे काटेकोर पालन करणा-या गाडीच्या वेळापत्रकात झालेल्या या बदलामुळे इतर गाड्यांच्या वेळांवरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

**प्रवाशांचे हाल, संताप-**गाडी बराच वेळ एका ठिकाणी थांबून राहिल्याने प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. प्रवाशांना उकाड्याचा त्रास जाणवू लागला. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता मर्यादित झाली होती, तर अन्नपुरवठाही ⇨(पान २ वर)

# दुष्काळात तेरावा ! 10 टक्के हंगामी भाडेवाढ

## प्रवाशांचा वैताग, पहिल्याच दिवशी एसटी बसमध्ये 'तू तू मैं मैं'

**यवतमाळ/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने आज बुधवारी पहाटेपासून उन्हाळी गर्दी बघता हंगामी भाडेवाढ केल्यानंतर पहिल्याच दिवशी अनेक बसमध्ये वाहक, प्रवाशांमध्ये 'तू तू मैं मैं' झाली. वाढलेले तिकीट दर आणि दोन रुपये स्वच्छता अधिभार यामुळे प्रवासी संताप व्यक्त करत आहेत.

**१० टक्के हंगामी भाडेवाढ-** उन्हाळ्यात राज्य परिवहन मंडळाच्या बसमध्ये प्रवाशांची गर्दी वाढत असल्याने, महामंडळ दरवर्षी हंगामी भाडेवाड करते. आज १५ एप्रिलपासून प्रवास भाड्यामध्ये दहा टक्के वाढ करण्यात आली आहे. मध्यरात्री १२ वाजल्यानंतर नवीन दरानुसार तिकीट आकारली जात आहे. पुढील दोन महिने, म्हणजे १५ जूनपर्यंत प्रवाशांकडून नवीन दरानुसार तिकीट आकारले जाणार आहे.

**लाडक्या बहिणींना भुर्दंड-** महिलांसाठी अर्धी तिकीट ही योजना लागू असली तरी, दरवाढीचा फटका



लाडक्या बहिणींनाही बसणार आहे. वाढलेल्या दरानुसार महिलांकडून अर्धी तिकीट आकारली जाणार आहे. सर्वच प्रकारच्या बसमधून प्रवास करणा-या नागरिकांना जादा भाड्याचा भुर्दंड बसणार आहे. मात्र भाडेवाढीमुळे प्रवासी संताप व्यक्त करत असून, ते भाडेवाडीमुळे दूर जाणार नाही याची दक्षता घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

**बस अस्वच्छ, तरीही स्वच्छता अधिभार-**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस, बसस्थानक, बसस्थानकाचा परिसर कायम अस्वच्छ असतो. यापुढे हा परिसरस्वच्छ राहावा, यासाठी प्रवाशांकडून ⇨(पान २ वर)

# महिला आरक्षणाला विरोधकांचा पाठिंबा, पण सीमांकनाला विरोध

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लोकसभेतील जागा वाढवण्याच्या केंद्र सरकारच्या प्रस्तावाला विरोधी पक्ष विरोध करतील. बुधवारी विरोधी पक्षनेत्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी हे विधान केले. ही बैठक खरगे यांच्या निवासस्थानी झाली, ज्यात राहुल गांधी आणि टीएमसी, आरजेडी, शिवसेना (यूबीटी), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद गट) आणि आपचे नेते उपस्थित होते.



खरगे म्हणाले की, आम्ही महिला आरक्षणाच्या विरोधात नसलो तरी, सरकार विरोधी पक्षांचा आवाज दाबण्यासाठी राजकीय कारणास्तव हे विधेयक पुढे रेटत आहे. त्यामुळे, आम्ही सीमांकन विधेयकाला विरोध करण्याचा निर्णय घेतला आहे. संपूर्ण विरोधी पक्ष या विधेयकाच्या विरोधात मतदान करेल. सरकार १६, १७ आणि १८ एप्रिल रोजी संसदेच्या विशेष अधिवेशनात तीन विधेयके सादर करणार आहे. यामध्ये संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, परिसीमन विधेयक (दुरुस्ती) आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक, २०२६ यांचा समावेश आहे. सरकार लोकसभेच्या जागांची संख्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव ठेवत आहे, ज्यापैकी सुमारे २७३ जागा महिलांसाठी राखीव असतील.

**विरोधी पक्षांच्या बैठकीतील दोन महत्त्वाचे मुद्दे:** महिलांना एक-तृतीयांश आरक्षण दिले पाहिजे. सध्याच्या ५४३ लोकसभा जागांच्या आधारावर, याची अंमलबजावणी २०२९ च्या निवडणुकांपासून केली पाहिजे.सर्व विरोधी पक्ष मतदारसंघ पुनर्रचनेच्या तरतुदींच्या पूर्णपणे विरोधात आहेत. ते लोकसभा आणि राज्यसभेच्या चर्चेत सहभागी होउन याला विरोध करतील.सीमांकन प्रक्रियेवर एडच पक्षाची भूमिका अगदी स्पष्ट आणि मजबूत आहे. आमचे कार्यकारी अध्यक्ष, KTR, २०२२ पासून सातत्याने हेच सांगत आहेत की या संपूर्ण प्रक्रियेत दक्षिण भारतीय राज्यांच्या हितांचे रक्षण केले पाहिजे. सध्या, संसदेत दक्षिण भारतीय राज्यांचे प्रतिनिधित्व २४% आहे. TVK अध्यक्ष विजय म्हणाले, 'सीमांकन हे केंद्र सरकारने उचललेले एक पक्षपाती पाउल आहे. आमचा पक्ष महिलांसाठी ३३% आरक्षणाची तरतूद करणा-या विधेयकाचे स्वागत ⇨(पान २ वर)

# महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा द्या

## फडणवीसांचे राज्यातील सर्व खासदारांना पत्र



**मुंबई :** महिला आरक्षण विधेयकाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभा आणि राज्यसभेतील महाराष्ट्रातील सर्व खासदारांना पत्र पाठवून या विधेयकाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. या पत्रामध्ये उद्धव ठाकरे, हर्षवर्धन सपकाळ, शशिकांत शिंदे आणि सुनील तटकरे यांच्यासह विविध राजकीय नेत्यांचा समावेश आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या पत्रातून महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा द्या आणि या ऐतिहासिक निर्णयाचे साक्षीदार व्हा, असे आवाहन केले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी ही पत्रे संबंधित नेत्यांना पाठवण्यात आली आहेत. दरम्यान, केंद्र सरकारने महिला आरक्षण विधेयक लवकरात लवकर लागू करण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ⇨(पान २ वर)

# नाशिक TCS कांड: लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक शोषण

## मुख्य आरोपी दानिश शेख दोन मुलांचा बाप

**नाशिक/प्रतिनिधी :** TCS च्या नाशिक युनिटमध्ये समोर आलेल्या धक्कादायक लैंगिक छळ आणि धर्मांतर प्रकरणाने संपूर्ण देश हादरला आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी दानिश शेख (३४) याच्याबाबत तपासात खळबळजनक माहिती समोर आली आहे. लग्नाचे आमिष दाखवून एका सहकारी महिलेवर बलात्कार करणा-या दानिशने आपले लग्न झाले असून तो दोन मुलांचा पिता असल्याची बाब पीडितेपासून लपवून ठेवली होती. नाशिकच्या देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या पहिल्या एफआयआरनुसार दानिश शेखने पीडित महिलेला लग्नाचे वचन दिले होते. या आमिषापोटी त्याने पीडितेशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. मात्र, फेब्रुवारी २०२६ मध्ये दानिशच्या पत्नीने स्वतः पीडितेला मेसेज करून दानिश विवाहित असून त्याला दोन मुले असल्याचे सांगितले. हे सत्य समोर आल्यानंतर पीडितेने पोलिसांत धाव घेतली.

**धर्मांतरासाठी दबाव आणि छळवणुकीचे गंभीर आरोप**


दानिश शेखवर केवळ बलात्काराचाच नाही, तर धार्मिक भावना दुखावल्याचा आणि धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचाही आरोप आहे. पीडितेने तक्रारीत नमूद केले आहे की, दानिशने तिला त्याचे धर्म पाळण्यासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला, तिला मांसाहार करण्यासाठी आणि इस्लामिक पद्धती अवलंबण्यासाठी सक्ती करण्यात आली याशिवाय इतर आरोपींसोबत मिळून हिंदू देवदेवतांविषयी अपमानास्पद टिप्पणी केल्याचाही आरोप त्याच्यावर आहे. नाशिकमधील या प्रकरणात आतापर्यंत ९ गुन्हे दाखल झाले असून ७ जणांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात केवळ दानिशच नाही, तर तौसीफ अत्तार, रजा मेमन, शाहरूख कुरेशी, शफी शेख आणि आसिफ आफताब अंसारी या टीम लीडर्ससह एचआर मॅनेजर अश्विनी चैनानी यांनाही अटक झाली आहे. ⇨(पान २ वर)



# अचलपूर बाजार समिती सभागृहात शेतकरी वर्गासाठी एसआरटी तंत्रावर मेळावा व चर्चा सत्र

## कृषी भूषण व SRT तंत्रज्ञानाचे जनक चंद्रशेखर भडसावळे आणि आ.प्रवीण तायडे राहणार उपस्थितीत

**अचलपूर/प्रतिनिधीः-** भात पिकात नव्हे तर कापूस ,सोयाबीन , मका,तूर, हरभरा , गहू,भाजीपाला अशा अन्य पिकात शेतकरी वर्गासाठी फायदेशीर ठरलेली एसआरटी (SRT) तंत्रज्ञानाचे सगुणा रूरल फाऊंडेशन नेरळ (जिल्हा रायपूर ) अंतर्गत आज १५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृहात शेतकरी मेळावा व चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे .यावेळी या कार्यक्रमाला कृषी भूषण ,कृषी रत्न आणि एसआरटी तंत्रज्ञानाचे जनक चंद्रशेखर भडसावळे ,अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे,कृषी विभागाचे जिल्हा अधीक्षक राहुल सातपुते,प्रफुल सातव उपविभागीय कृषी अधिकारी अचलपूर ,अक्षय क्षीरसागर तालुका कृषी अधिकारी अचलपूर यांची प्रमुख उपस्थितीती राहणार आहे .तसेच एसआरटी चे स्टार प्रचारक अनिल निवळकर ,मयुर बन्नोरे,विठ्ठल वैद्य (जालना ),रावसाहेब मोरे (छत्रपती संभाजीनगर ) सुद्धा उपस्थितीत राहणार आहे. नांगरणी आणि इतर मशागत न करताही चांगले पीक उत्पादन घेता येत असल्याचे कृषी रत्न,कृषी भूषण म्हणून संपूर्ण राज्यात नव्हे तर देशात परिचित असलेले चंद्रशेखर भडसावळे यांच्या एसआरटी तंत्राने भातशेतीत दाखवून दिले.तसेच भात पिकात नव्हे तर कापूस ,सोयाबीन , मका,तूर, हरभरा , गहू,भाजीपाला अशा



अन्य पिकात शेतकरी वर्गासाठी एसआरटी तंत्र फायदेशीर ठरलेली आहे .यामुळे केंद्र व राज्य शासन कडून अनेक वेळी शेती क्षेत्रात क्रांती घडवून आणणारी एसआरटी तंत्रज्ञानाचे जनक चंद्रशेखर भडसावळे यांचा अनेकवेळी विविध पुरस्काराने मान्यवरांनी सन्मानित केले .मराठवाडा ,खानदेश , विदर्भ सह अनेक ठिकाणी त्यांनी असंख्य शेतकरी बांधवांना एसआरटी तंत्राबाबत चंद्रशेखर भडसावळे यांनी शेतकरी मेळावा व चर्चा सत्राचे माध्यमातून मार्गदर्शन केले .यामुळे अचलपूर तालुक्यासह आजू बाजूला असलेल्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सुद्धा एसआरटी शून्य मशागत शेती का ? आणि कशासाठी ? यावर आज १६ एप्रिल रोजी अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृहात सकाळी ११ वाजता भव्य दिव्य शेतकरी मेळावा व चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मान्यवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहे .यामुळे अचलपूर मतदार संघातील शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थितीत राहून या मेळाव्याचा लाभ घेण्याचे आव्हान आयोजकांनी केले आहे .या तंत्रामुळे शेतीसह मशागतीचा खर्च वाचतो. सोबतच सेंद्रिय कर्ब वाढून, गांडुळे आणि अन्य सूक्ष्मजीवांची संख्या वाढते. बदलत्या हवामानावर मात करण्यासाठी या शून्य मशागत पद्धतीस शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद पाहायला मिळत आहे.यावेळी शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थितीत राहण्याचे आव्हान संदीप भागवत, (SRT प्रशिक्षक), प्रा. डॉ. राजकुमार वाटाणे ( अभ्यासक ), देवेंद्र तायडे ( SRT शेतकरी), जयकृष्ण तायडे ,विरेन्द्र ठाकरे ,प्रा. माधव महल्ले , प्रा. जगदिश कुंबलकर यांनी केले आहे

# अक्षय्य तृतीयेला बालविवाह केल्यास थेट तुरुंगवास

## - जिल्हा प्रशासनाचा इशारा

**अमरावती/प्रतिनिधीः-**

येत्या अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर जिल्ह्यात बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेता, जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. बालविवाह लावल्यास थेट कारावासाची कारवाई करण्यात येणार आहे, असा स्पष्ट इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. तसेच बालविवाहासाठी संपूर्ण जिल्ह्यात विशेष जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे.

जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयातर्फे शहर आणि ग्रामीण भागात मोहिम राबवली जात आहे. बालविवाह ही केवळ सामाजिक कुप्रथा नसून तो एक गंभीर आणि दखलपात्र गुन्हा आहे, याची जाणीव समाजात



निर्माण करण्यासाठी ही मोहिम राबविण्यात येणार आहे. बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ नुसार १८ वर्षाखालील मुलगी आणि २१ वर्षाखालील मुलगा यांचा विवाह लावणे हा दंडनीय गुन्हा आहे. अशा विवाहात सहभागी होणारे पालक, आयोजक, भटजी (गुरुजी) आणि इतर सर्व व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, पोलीस पाटील, शाळा प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून विशेष देखरेख ठेवली जाणार आहे. ग्रामीण व शहरी भागात प्रशासनाने यंत्रणेला हाय अलर्टवर राहण्याचे निर्देश दिले आहेत. कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास नागरिकांनी त्वरीत चाइल्ड हेल्पलाईन १०९८ वर संपर्क साधावा किंवा स्थानिक प्रशासनाला कळवावे. माहिती देणाऱ्याची ओळख पूर्णतः गोपनीय ठेवली जाईल, अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय गट यांनी दिली आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### राजधानीचे इंजिन ऐन प्रवासात

विस्कळीत झाला. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी प्रवाशांना विशेष त्रास सहन करावा लागला. माहितीचा अभाव आणि विलंब यामुळे काही प्रवाशांनी रेल्वे प्रशासनावर नाराजी व्यक्त केली.

मालगाडी इंजिनची मदत-घटनेची माहिती मिळताच मध्य रेल्वेच्या नागपूर येथील नियंत्रण कक्षाने तातडीने हालचाली सुरू केल्या. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेउन पर्यायी इंजिनची व्यवस्था करण्यात आली. जवळच्या स्थानकावरून मालगाडीचे इंजिन पाठवण्यात आले आणि ते राजधानी एक्स्प्रेसला जोडण्यात आले. त्यानंतर गाडी हळूहळू नागपूरकडे मार्गस्थ करण्यात आली. अखेर उशिराने का होईना, गाडी नागपूरला पोहोचली.

### दुष्काळात तेरावा ! १० टक्के

स्वच्छता अधिभार वसूल केला जाणार आहे. प्रत्येक तिकिटामागे प्रवाशाकडून अतिरिक्त दोन रुपये घेतले जाणार आहे. या माध्यमातून एसटीच्या तिजोरीत स्वच्छतेच्या नावाखाली कोट्यवधी रुपये जमा होणार आहे. आतापर्यंत स्वच्छतेची कामे कंत्राटदारांच्या माध्यमातून करून एसटी महामंडळाकडून पैसे चुकते केले जात होते. आता मात्र, यासाठी प्रवाशांकडून अधिभाराच्या नावाखाली रक्कम घेतली जात आहे. मात्र बस अस्वच्छ असताना स्वच्छता अधिभार कसला घेता, म्हणून प्रवाशी संताप व्यक्त करत होते.

### महिला आरक्षणाला विरोधकांचा

करतो. याव्यतिरिक्त, जर 'संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, २०२६' मंजूर झाले, तर दक्षिण आणि उत्तर राज्यांमधील प्रतिनिधित्वातील आनुपातिक फरक खूप वाढेल.

राज्यसभा खासदार कपिल सिब्बल- सरकार हे सर्व २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत राजकीय फायदा मिळवण्याच्या उद्देशाने करत आहे. जर सरकारला महिलांना ३३ऽ आरक्षण द्यायचे असेल, तर ते सध्याच्या ५४३ जागांमध्येच लागू केले जाउ शकते. जागांच्या पुनर्वितरणामुळे उत्तर भारताला जास्त फायदा होईल.तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी पंतप्रधान मोदींना पत्र लिहिले- संसदेत जी ३ विधेयके आणली जाणार आहेत, त्याबद्दल संभ्रम पसरवला जात आहे. काँग्रेसची भूमिका स्पष्ट आहे. ती महिला आरक्षण विधेयकाचे समर्थन करते, परंतु लोकसंख्येच्या आधारावर लोकसभेच्या जागा ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव दक्षिणेकडील राज्यांसाठी स्वीकारार्ह नाही. यामुळे देशासाठी गंभीर धोका निर्माण होउ शकतो.मल्लिकार्जुन खरगे- काँग्रेस महिला आरक्षणाच्या विरोधात नाही. सरकार राजकीय कारणांमुळे ते पुढे ढकलत आहे.केसी वेणुगोपाल- महिला आरक्षणाच्या नावाखाली चुकीचे परिसीमन (डिलिमिटेशन) आणले जात आहे.

### नाशिक व्क्च कांडः लग्नाचे

या सर्वांवर महिला कर्मचा-यांचा विनयभंग, पाठलाग करणे, अश्लील शेरेबाजी आणि धार्मिक सक्ती केल्याचे आरोप आहेत. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेउन नाशिक पोलिसांनी विशेष तपास पथकाची (SIT) स्थापना केली आहे. दुसरीकडे, टाटा समूहाचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी या घटनेबद्दल तीव्र संताप व्यक्त केला असून, टीसीएसच्या मुख्य परिचालन अधिकारी (क्ग्र) आरती सुब्रमण्यम यांच्या नेतृत्वाखाली अंतर्गत चौकशी समिती नेमली आहे. कंपनीने सर्व आरोपी कर्मचा-यांना तात्काळ निलंबित केले आहे. हा केवळ एका नात्याचा विषय नसून, कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेचा आणि धार्मिक सौहार्दाचा भंग करणारा प्रकार आहे. आम्ही या प्रकरणाच्या मुळाशी जाउन तपास करत आहोत, असे पोलीस अधिका-यांनी स्पष्ट केले आहे.

### महिला आरक्षण विधेयकाला

१६ ते १८ एप्रिल दरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले असून, त्यामध्ये या विधेयकावर चर्चा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील सर्व पक्षांनी एकमताने हे विधेयक मंजूर करावे, असे आवाहन केले आहे. त्यामुळे या अधिवेशनाकडे देशभराचे लक्ष लागले आहे.महिला आरक्षणाशी संबंधित नारी शक्ती वंदन कायदा २०२३ मध्ये मंजूर झाला होता. आता त्यामध्ये काही सुधारणा करून तो २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी लागू करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या नव्या विधेयकात लोकसभेच्या जागांची संख्या वाढवण्याची तरतूद करण्यात आली आहे. प्रस्तावानुसार, लोकसभेच्या एकूण जागा ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्यात येणार असून, त्यापैकी ८१५ जागा राज्यांसाठी आणि ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी असतील.तसेच या विधेयकात मतदारसंघांच्या सीमांचे पुनर्रचना (डिलिमिटेशन) करण्याचाही विचार करण्यात आला आहे. महिलांना लोकसभा आणि विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण देणे हा या विधेयकाचा मुख्य उद्देश आहे. या प्रक्रियेला गती देण्यासाठी केंद्र सरकार तीन वेगवेगळी विधेयके सादर करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, काँग्रेसने या संपूर्ण प्रक्रियेवर टीका केली आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी विशेष अधिवेशन घाईघाईने बोलावल्याचा आरोप केला आहे.

### अचलपूर-परतवाडा येथील

अधिकारी डॉ.शुभम कुमार यांना पथकाचे प्रमुख करण्यात आले. या पथकात सत्तेचाळीस पोलिसांचा समावेश असुन गुन्ह्याचा तपास प्रभावीत होऊ नये याकरीता परतवाडा पोलिस स्टेशन येथील एपीआय सलीम शेख ,अब्दुल नाजीम अब्दुल कलीम, शुभम वर्मा, मयुर गुरव व अचलपूर येथील पुरुषोत्तम बावनेर, मोहन वावरे यांची तत्काळ अमरावती नियंत्रण कक्षात तात्पुरती बदली करण्यात आली आहे.


### दारूच्या अतिसेवनामुळे वृद्धाचा

दिली. माहिती मिळताच पोलीस तिथे पोहचले, त्यांनी ज्ञानेश्वर यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले, जिथे डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. पोलीस उपनिरीक्षक राजेश वाकडे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला.

### तीन अपत्य असणाऱ्या एमआयएम

महानगरपालिकेमध्ये करण्यात आली होती. दोन पेक्षा अधिक मुलं असणाऱ्यांना निवडणूक लढविण्याचा अधिकार नाही. अशात त्यांना तीन अपत्य असूनही त्यांनी निवडणूक लढविली आणि विजयी झाल्या. त्यांच्या विरोधात तक्रार दाखल झाल्यानंतर नगर विकास विभागाच्या वतीने त्यांना नोटीस पाठवून खुलासा मागितला आहे. एमआयएमच्या त्या दुसऱ्या नगरसेविका ठरणार आहे ज्यांना अपात्रतेची नोटीस देण्यात आली आहे. यापूर्वीही मनपा मध्ये तीन अपत्य असल्याचे प्रकरण समोर आले होते. त्यावेळी संबंधित नगरसेवकाने आपला राजीनामा दिला होता. आता या प्रकरणात काय होणार हे पाहणे महत्त्वाचे आहे.

# सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये मानेतील मोठ्या गाठीची जटिल शस्त्रक्रिया यशस्वी




'हा ट्यूमर आकाराने मोठा आणि अत्यंत संवेदनशील भागात असल्यामुळे शस्त्रक्रिया खूप आव्हानात्मक होती. श्वासनलिकेवर गंभीर दाब येत होता. योग्य वेळेत शस्त्रक्रिया केल्यामुळे रुग्णाचा जीव वाचवता आला.'

**-डॉ.रणजीत मांडवे** : कॅन्सर तज्ञ (ओंको सर्जन)

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय( सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल)मध्ये अमरावती येथील ६५ वर्षीय महिलेच्या मानेतील सुमारे 10×13 सेमी आकाराची मोठी व तब्बल दीड किलो वजनाची गाठ यशस्वीरित्या काढण्यात आली.ही गाठ मानेच्या मध्यभागी असून श्वासनलिकेवर (ट्रॅकिआ) दाब टाकत होती, त्यामुळे रुग्णाला श्वास घेण्यास अडचण निर्माण होण्याची तसेच श्वासनलिका अचानक बंद पडण्याचा धोका होता.ही शस्त्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची आणि उच्च जोखमीची होती. शस्त्रक्रियेच्या वेळी श्वासनलिका, प्रमुख रक्तवाहिन्या आणि आसपासच्या नसांना इजा न पोहोचवता गाठ काढणे हे मोठे आव्हान होते. मात्र रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांच्या टीमने अत्यंत काळजीपूर्वक ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. गाठ पूर्णपणे काढून टाकून श्वासनलिकेची रचना पूर्ववत करण्यात आली आणि रुग्णाचा जीव वाचवण्यात आला.ही जीवनरक्षक शस्त्रक्रिया आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत विनामूल्य करण्यात आली.या शस्त्रक्रियेसाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे आणि विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅन्सर तज्ञ डॉ. रणजीत मांडवे, भूलतज्ञ डॉ. राखी वानखडे, डॉ. माधुरी गाडेकर, समाजसेवा अधीक्षक शीतल बोंडे, तसेच डॉ. पायल रोकडे, डॉ. दिव्यानी मुंदाने आणि अधीसेविका चंदा खोडके यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर बिल्कीस शेख, ज्योत्स्ना मुंदाने, जया वाघमारे, वंदना जाधव, आजित, पायल, स्वप्निल, शंकर झटाले, सागर गणोरकर, लक्ष्मी सोनवणे, आदी कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

# नांदगाव बाजार समितीचे सभापती प्रभात ढेपे यांचा राजीनामा

नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः- स्थानिक नांदगाव खंडेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रभात पाटील ढेपे यांनी आपल्या पदाचा राजीनामा १० एप्रिल रोजी जिल्हा उपनिबंधक कार्यालय ,(सहकारी संस्था) यांच्याकडे सादर केला. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने १३ एप्रिल रोजी या राजीनाम्याला मंजुरात दिली व १४ एप्रिल पासून पद रिक्त झाल्याने पुढील नियमानुसार कार्यवाही करिता सहाय्यक निबंधक कार्यालय (सहकारी संस्था) नांदगाव खंडेश्वर यांना उपजिल्हा निबंध कार्यालयाकडून सूचना देण्यात आली असल्याचे अधिकृत सहाय्यक निबंधक कार्यालयाकडून समजते. या बाजार समितीवर सहकार नेते अभिजीत पाटील ढेपे यांच्या गटाचे अनेक वर्षापासून वर्चस्व आहे. बाजार समितीच्या संचालक पदासाठी झालेल्या निवडणुकीनंतर सभापती व उपसभापती पदासाठी ढेपे गटात अनेक दावेदार होते. तेव्हा यावर तोडगा म्हणून प्रथम अडीच वर्ष सभापतीपदी प्रभात ढेपे तर दुसऱ्या अडीच वर्षाच्या कालावधीसाठी डॉ. राजेंद्र पांडे



यांचे नाव ठरले असल्याचे अधिकृत चर्चेवरून समजते. त्यामुळे प्रभात ढेपे यांनी १० एप्रिल रोजी सभापती पदाचा राजीनामा जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे सादर केला. यानंतर ठरल्याप्रमाणे बाजार समितीच्या उपसभापती पदामध्ये सुद्धा बदल होण्याची जोरदार राजकीय चर्चा असून ठरल्यानुसार दुसऱ्या अडीच वर्षाच्या कालावधीसाठी उपसभापती पदासाठी प्रमोद ठाकरे यांच्या नावाची चर्चा आहे. बाजार समितीच्या या राजकीय घडामोडीत सभापती व उपसभापती पदासाठी दुसऱ्या अडीच वर्षाकरिता ठरल्याप्रमाणे फेरबदलाची प्रक्रिया पार पडते की वेळेवर नवीनच राजकीय समीकरण तयार होते काय हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा

कारण त्यामुळे शरीरातील पाण्याची कमतरता वाढू शकते. लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. जनावरांना सावलीत ठेवावे व त्यांना पुरेसे स्वच्छ पाणी द्यावे. उष्माघाताची लक्षणे (डोकेदुखी, चक्कर येणे, मळमळ, जास्त घाम येणे) जाणवली तर त्वरित सावलीत विश्रांती घ्यावी व आवश्यक असल्यास वैद्यकीय मदत घ्यावी. नागरिकांनी सतर्क राहून हवामान विभागाच्या पुढील सूचना व अद्ययावत माहितीकडे लक्ष द्यावे,असे आवाहन करण्यात आले.

### सीबीएसई दहावीचा निकाल जाहीर

आपल्या या यशाचे श्रेय तिने तिचे वडील ज्ञानेश्वर पानझाडे, आई पौर्णिमा पानझाडे, शाळेचे शिक्षक आणि मार्गदर्शकांना दिले आहे. शालेय स्तरापासूनच अभ्यासात सातत्य आणि नियोजनामुळे हे यश साध्य करता आले, अशी भावना अक्षराने व्यक्त केली.

स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या निंभोरा खुर्द शाखेच्या वतीने अक्षराच्या या यशाचे अभिनंदन करण्यात आले असून, तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. अक्षराच्या या कामगिरीमुळे पानझाडे कुटुंबासह शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

### कार ट्रकवर धडकल्याने चिमुकलीसह

माहिती नुसार आदिलाबादचे गोडगुल्ला हे कुटुंब मंगळवारी घाटंजी येथील सिद्धार्थ रामटेके यांच्याकडे पाहुणे म्हणून आले होते. रात्री चारचाकी वाहनाने क्र. टीजी ०३ बी ७५२४ परतीच्या प्रवासाला निघाले होते. साईकिरण गोडगुल्ला कार चालवत होते. साखरा गावाजवळ नियंत्रण सुटल्याने कार पांढरकवडाकडून येत असलेल्या बोअरवेलच्या ट्रकवर क्र. केए ०१ एमजी ३९८७ जाऊन आदळली. माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. कारमधील तिघांनाही त्यांनी घाटंजी येथील ग्रामीण रुग्णालयात हलविले. डॉक्टरांनी चिमुकली हंसिका आणि तिचे वडील साईकिरण गोडगुल्ला यांना मृत घोषित केले, तर अनुष्का साईकिरण गोडगुल्ला यांना प्राथमिक उपचारानंतर यवतमाळ येथे रवाना केले. अपघात एवढा भीषण होता की कारच्या समोरच्या भागाचा पूर्ण चेंदामेंदा झाला आहे.

### आरोपी अयान अहमदच्या

घटनेच्या निषेधार्थ आज अचलपुर आणि परतवाडा पूर्णतः बंद राहिला. व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून घटनेचा निषेध केला. या घटनेवरून आक्रोश व्यक्त करण्यात येत आहे. माहिती नुसार आरोपी अयान अहमद याने अल्पवयीन मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे लैंगिक शोषण केले आणि व्हिडिओ सोशल मीडियावर वारल केले. ही घटना समोर आल्यानंतर आरोपी कुटुंबीयांसह फरार झाला होता पण पोलिसांनी त्यांना पकडले. त्याचे इतर तीन साथीदारांनाही पकडण्यात आले आहे. त्यांच्याकडून विचारपूस केली जात आहे. तर दुसरीकडे आरोपीच्या घरावर आज बुलडोझर चालविण्यात आला. कारवाई दरम्यान भाजपचे आमदार प्रवीण तायडे स्वत: हजर होते. मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता आणि नागरिकांची देखील मोठी गर्दी झाली होती.

विशेष तपास पथकात ४७ अधिकाऱ्यांची फौज-

या प्रकरणातील गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी आणि तपासात कोणतीही कसर न सोडण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षकांनी विशेष तपास पथकाची 'एसआयटी'ची घोषणा केली आहे. तब्बल ४७ अनुभवी पोलीस अधिकारी आणि अंमलदारांची फौज या एका प्रकरणाच्या तपासासाठी तैनात करण्यात आली आहे. सहायक पोलीस अधीक्षक तथा आयपीएस डॉ. शुभम कुमार यांच्या नेतृत्वाखाली हे पथक काम करणार आहे. विशेष म्हणजे, या पथकात सायबर सेल, स्थानिक गुन्हे शाखा आणि विविध पोलीस ठाण्यातील तज्ज्ञ कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. यात तीन पोलिस निरीक्षक, चार सहायक पोलिस निरीक्षक व तीन पोलिस उपनिरीक्षकांचा समावेश आहे. यामध्ये परतवाडाचे ठाणेदार व सुरेश म्हस्के, गुन्हे शाखेचे निरीक्षक किरण वानखडे व साईबरचे पीआई अशोक लांडे, एपीआई अनूप वाकडे, गौतम इंगले, एपीआई प्रियंका भोयर, संतोष गुर्जर, पीएसआई वीणा पंडे,पीएसआई स्नेहल आडे, सागर हटवार, एएसआई प्रभाकर बोदडे, सुधीर काले पोहेकॉं दीपक राऊत, नीलेश काले, पल्लवी खांडे, रवींद्र बावने, बलवंत दाभणे, भूषण पेठे,पंकज फाटे, सचिन मिश्रा, विजय राठोड, अमोल लवणकर, शैलेश तिवारी, मंजू ढगे, शीतल वाकोडे, राजेंद्र कंकाले,सारिका अठूर, सचिन होले, सुधीर राऊत, पुरुषोत्तम बावनेर, श्रीकांत वाघ, सुचिता इंगले, सुधा बेलसरे, सचिन भोंबे, नापोकॉं अजीत राठोड, पोकॉं प्रवीण बाखडे, आशीष मुंढे, पवन ढोके, संदीप जुगनाके, शिवा शिरसाट, शुभम शर्मा, सचिन कोफने, राहुल खर्सान,नितिन कलमटे व अक्षय मोहोड आदींचा सहभाग आहे. परतवाडा मध्ये समोर आलेल्या लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपी विरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी आमदार प्रवीण तायडे यांनी पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. अल्पवयीन मुलींना फसवून आणि त्यांच्यावर दबाव टाकून त्यांचे लैंगिक शोषण करण्यात आले. अश्लील व्हिडिओ तयार करून ते विविध माध्यमांवर प्रसारित केले आहे. यामुळे पिडितांचा सन्मान गोपनीयता व मूलभूत अधिकारांचे गंभीर उल्लंघन झाले आहे. या घटनेमुळे समाजात संताप व असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. हे प्रकरण केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नसून यामागे इतरही व्यक्ती ,सहकारी व संघटित स्वरूपाचे जाळे कार्यरत असण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील आरोपींवर कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी आमदार तायडे यांनी केली आहे.

### महिला पत्रकाराचा अपमान

पत्रकार के सन्मान में महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मैदान मे, मुर्दाबाद मुर्दाबाद प्रवीण तोगडिया मुर्दाबाद, पत्रकार एकजुटीचा विजय असो च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता.

अमरावती शहरात आंतरराष्ट्रीय विश्व हिंदू परिषद तथा राष्ट्रीय बजरंग दलाचे प्रमुख प्रवीण तोगडिया यांनी पत्रकार परिषदेत महिला पत्रकारास जात विचारून तिचा अपमान केला. ही घटना अत्यंत निंदनीय असून पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर तसेच महिला सन्मानावर आघात करणारी असल्याचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष नयन मोंढे यांनी प्रसिद्धी माध्यमांना सांगितले. लोकशाही व्यवस्थेत पत्रकार समाजाचा चौथा स्तंभ मानला जातो. अशा परिस्थितीत पत्रकारांशी विशेषता महिला पत्रकारांशी अपमानास्पद भेदभाव पूर्ण वर्तन करणे हे असहय असून समाजात चुकीचा संदेश देणारे आहे. त्या अनुषंगाने प्रवीण तोगडिया यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी, महिला पत्रकारांच्या सन्मान व सुरक्षेसाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी कडक मार्गदर्शक तत्वे जाहीर करावी. कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा जिल्हाध्यक्ष प्रवीण शेगोकार यांनी यावेळी दिला.

आंदोलनात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष नयन मोंढे, जिल्हाध्यक्ष प्रवीण शेगोकार, जिल्हा संघटक विनोद इंगळे, स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष सुनील घटाळे, डिजिटल मीडिया जिल्हाध्यक्ष मनीष गुडधे, योगिनी अर्डक, महिला अध्यक्ष अर्चना रक्षे, जया मेहरा, योगेश मोहकर, प्रशांत सुने, विशाल तायडे, अमोल खडसे, बंडू कुमार धवणे, सुरेश तायडे, समीर अहमद, सिद्धार्थ दामोदरे, आदेश मेटांगे, मोरेश्वर पवार, अमोल तायडे, निलेश आहेर, अरविंद नगराळे, छत्रपती बांबोडे, तुळशीदास मेश्राम, विनोद मुळे पाटील, धनराज खर्चान, अजय श्रृंगारे, गजानन खोपे, विक्रम ढोके, उज्वल भालेकर यांच्यासह बहुसंख्येने विविध पत्रकार संघटनेचे पत्रकार आंदोलनात सहभागी झाले होते.

### एकविरा देवी संस्थानची

शेकडो वर्षापुर्वीचे आहे. मंदीराच्या स्थापनेमागे पौराणिक मान्यता आहे. संस्थानच्या वतीने अन्न छत्र, होमिओपॅथिक रुग्णालयातून सेवा दिली जाते. नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत वर्षासाठी नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली आहे. यामध्ये अध्यक्ष राजेंद्र टेंभे, उपाध्यक्ष अविनाश श्रॉफ, सचिव सीए योगेश राठी, कोषाध्यक्ष चंद्रशेखर उर्फ शेखर कुलकर्णी, सह कोषाध्यक्ष राजेश हेडा, सहसचिव एड. रवींद्र मराठे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ट्रस्टी मध्ये चंद्रशेखर भोंदू, गजानन बपोरीकर ,शैलेश वानखडे आणि दीपक सब्जीवाले यांचा समावेश आहे. विदर्भाची कुलदैवत म्हणून आई अंबा - एकविरा देवीची ओळख आहे. नवरात्री उत्सव येथे उत्साहाने साजरा करण्यात येते. लाखो भाविकांची गर्दी दर्शनासाठी उसळते. गेल्या तेरा वर्षांपासून इथे अन्न सेवा सुरू करण्यात आली आहे. संस्थानचे मंगल कार्यालय आणि होमिओपॅथी रुग्णालयही संचालित आहे. नवनिर्वाचित कार्यकारिणीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### पेट्रोलपंपाच्या बाजुलाच आगीचा

छायाचित्रांसह धोक्याची जाणीव करून दिली असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, या गंभीर बाबीकडे महावितरणने दुर्लक्ष केल्याने अखेर आज या निष्काळजीपणाचा परिणाम म्हणून आग लागल्याची घटना घडल्याचा आरोप यावले यांनी केला आहे.

टनेच्या वेळी पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. त्यांनी तत्काळ प्रसंगावधान राखत आग नियंत्रणात आणली. अन्यथा पेट्रोल पंपाजवळील ही आग मोठ्या दुर्घटनेत रूपांतरित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

**तक्रारींकडे दुर्लक्ष-** गेल्या दीड ते दोन वर्षांपासून डीपीजवळील धोकादायक परिस्थितीबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. मात्र आज दुपारच्या सुमारास डीपीवर स्पार्किंगमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात आग लागली.वारंवार सूचना, तक्रारी आणि पुरावे देऊनही महावितरणने याकडे सातत्याने दुर्लक्ष केल्यामुळेच हा प्रकार घडला. त्यामुळे संबंधित महावितरणचे कनिष्ठ अभियंता व उपकार्यकारी अभियंता यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे.

**-भूषण यावले, संचालक, कृष्णाजी पेट्रोल पंप, तिवसा**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, १६ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# पंकजपाल महाराजांच्या समाज प्रबोधनपर किर्तनाने श्रोते मंत्रमुग्ध

## महापुरुषांच्या विचारांचा जागर आणि मनोरंजनाचा तडका..!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांचा १९९ वा जयंती उत्सव तसेच द्विशताब्दी जन्मोत्सवी वर्षानिमित्त आयोजित प्रबोधन कार्यक्रमात प्रख्यात आधुनिक किर्तनकार पंकजपाल महाराज यांनी समाज जीवनातील सर्वच बाबींवर प्रकाश टाकत आपल्या प्रभावी आणि प्रबोधनात्मक किर्तनातून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.



क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाच्या पहिल्या दिवशी दि. १० एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक परिसर येथे सत्यपाल महाराज यांचे शिष्य असलेले आधुनिक किर्तनकार पंकजपाल महाराज, रुई गोस्ता यांच्या किर्तनाचा कार्यक्रम पार पडला. सर्वप्रथम पंकजपाल महाराज यांच्या हस्ते फुले स्मारकाला हारार्पण करण्यात आले. यावेळी बालरोगतज्ज्ञ डॉ. विजय कानडे यांनी पंकजपाल महाराज व त्यांच्या ग्रुपचा फुले दाम्पत्यांची प्रतिमा आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी किर्तनातून पंकजपाल महाराज यांनी व्यसनाधीनता, बुवाबाजी, अंधश्रद्धा, महिलांचे प्रश्न, शिक्षण प्रश्न, बेरोजगारी, येणाऱ्या पिढीवरील संस्कार आदी विषयांवर विविध दाखले देऊन मार्मिक शब्दांमध्ये प्रबोधन केले. आपल्याला जन्म देणाऱ्या आई-वडिलांची प्रत्येक मुलाने वृद्धापकाळात काळजी घ्यावी. सुनेने सुद्धा आपल्या सासूला आईप्रमाणे सांभाळावे.

आजचा युवक व्यसनाधीनतेकडे वळत आहे. व्यसनामुळे आयुष्य बरबाद होते. त्यामुळे वेळीच व्यसनाला आवर घालावा असा संदेश त्यांनी उदाहरण उदाहरणे देऊन दिला. येणारा काळ हा प्रचंड स्पर्धेचा काळ आहे. या स्पर्धेत टिकण्यासाठी आजच्या युवकांनी प्रचंड मेहनत घ्यावी. स्पर्धा परीक्षांची कास धरावी. तसेच उद्योग, व्यवसायाकडे वळावे. लहान मुलांना मोबाईल पासून दूर ठेवावे आणि त्यांच्यावर चांगले संस्कार द्यावे. महापुरुष व संतांच्या विचारांनी आपल्याला न्याय, हक्क मिळवून दिले आहेत. त्यामुळे त्यांच्या विचारांची सातत्याने जाणीव ठेवावी. असे आवाहन पंकजपाल महाराज यांनी केले. आपल्या मनोरंजनात्मक किर्तनाच्या शैलीतून पंकजपाल महाराज यांनी तब्बल दोन तास श्रोत्यांना खिळवून ठेवत प्रभावी कीर्तन केले.

# मंगरुळपीर पंचायत समितीत विविध विकासकामांचा आढावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी आज (दि.१५) मंगरुळपीर पंचायत समिती येथे बैठक घेऊन विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला.



यावेळी जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोन्द्रे, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी धैर्यशील पाटील तसेच गटविकास अधिकारी सारिका कारले -हिंगे, सहाय्यक गट विकास अधिकारी बाळकृष्ण अवगण, अविनाश ठाकूर यांची उपस्थिती होती.

या बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना, राज्य पुरस्कृत आवास योजना, महाराष्ट्र ग्रामीण जीवन्नोन्नती अभियान (MSRLM), तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वैयक्तिक व सार्वजनिक शौचालय बांधकाम,

### सीईओ अर्पित चौहान यांची आढावा सभा

सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन (SLWM), ODF Plus मॉडेल व्हिलेज, प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेंट, गोबरधन प्रकल्प व फिकल स्लज मॅनेजमेंट (FSM) यासंदर्भात आढावा घेण्यात आला.

तसेच पंचायत विभागातील १५ व्या वित्त आयोगाच्या निधीचा वापर, ग्रामपंचायत स्तरावरील कर वसुली, महिला व बालकल्याण तसेच दिव्यांग घटकांसाठीच्या खर्चाचा आढावा घेण्यात आला. मनरेगा अंतर्गत कामांची प्रगती, अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत निर्देश, आधार आधारित देयके व वेळेत देयके देण्याबाबतही चर्चा झाली.

समाजकल्याण विभागांतर्गत दलित वस्ती विकास, महिला व बालकल्याण विभागातील पोषण ट्रॅकर, कुपोषण स्थिती, विविध योजना, तसेच शिक्षण, आरोग्य, पशुसंवर्धन, बांधकाम, जलसंधारण व ग्रामीण पाणीपुरवठा विभागांच्या कामकाजाचाही आढावा घेण्यात आला. बैठकीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या तसेच शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भीमजयंती साजरी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील अडोळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रीय प्राथमिक शाळेत दि.१४ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बहुजन रत्न पुरस्कार प्राप्त राजकुमार पडघान होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून शाळा व्यवस्थापन समिती सदस्य बंडू पडघान,के.डी जाधव होते.प्रसंगी सुरूवातीला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.नंतर कार्यक्रमांचे प्रमुख असलेले राजकुमार पडघान यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र मेहनत करून आंधारात असलेल्या सर्वच समाजाला प्रकाशाकडे नेवून माणूस म्हणून जीवन जगण्याचा मार्ग दिला.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा क्रांतदर्शी विचार प्रमाण म्हणून कवी, लेखकांनी लेखन करावे - डॉ.अशोक इंगळे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा क्रांतदर्शी विचार प्रमाण म्हणून कवी, लेखकांनी लेखन केले, तरच क्रांतदर्शित्व समाज निर्माण होऊ शकतो, असे प्रतिपादन आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून समीक्षक, विचारवंत,ज्येष्ठ कवी, डॉ.अशोक इंगळे यांनी प्रतिपादन केले. सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपाचा बदल घडवून येण्यासाठी आजच्या विपरीत परिस्थितीत कवी, लेखकांनी आपली लेखणी परजली पाहिजे.आंबेडकरनिष्ठ असा शब्दप्रयोग मी जाणीवपूर्वक करतो. निष्ठेशिवाय मानवी जगण्याला अर्थ नसतो. असे अध्यक्षीय भाष्य इंगळे यांनी केले.साहित्य संमेलनाचे उद्घाटन यावेळी ज्येष्ठ कवी, लोकनाथ यशवंत लोकनाथ यांनी केले. शोषित, पिढीतांचे प्रश्न. आपल्या कवितेचा विषय झाले



पाहिजे. सामान्य माणसांचं जगणं हा जागतिक कवितेचा विषय व्हावा, असे मत त्यांनी व्यक्त केले. साहित्य संमेलनाच्या प्रारंभी, सकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यापासून संविधान फेरीने प्रारंभ झाला. यावेळी आंबेडकरी कलावंतांनी विविध रचना सादर केल्या आणि संविधान फेरीमध्ये ऊर्जा वाढवली. यावेळी प्रज्ञाविचार मंचावर आंबेडकरी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष, ज्येष्ठ समाजसेवक,अनंतकुमार केशवराव जुमडे होते. प्रमुख उपस्थिती प्रसिद्ध उद्योजक,पद्मकुमार धोंडोपंत राऊत, अर्बन बँकेचे संचालक, तेजराव वानखेडे,समाजपुढारी,दौलतराव हिवराळे, वाशीम पोलीस स्टेशनच्या ठाणेदार श्रीदेवी पाटील, पनवेल येथून आलेले ज्येष्ठ साहित्यिक, नागनाथ डोलारे आदींची उपस्थिती होती.

यावेळी 'वत्सगुल्मी' या मीनाक्षी नगराळे यांनी संपादित केलेल्या कवितासंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्वागतगीत,शाहीर ,धम्मानंद इंगोले इंगोले,भास्कर गायकवाड, यांनी सादर करुन संमेलनात रंगत आणली. प्रास्ताविक,ग.ना. कांबळे यांनी केले. संमेलनाची भूमिका कवी, अनिल कांबळे यांनी मांडली.

# आंबेडकरी कविता समष्टीला मूल्यभान देणारी - प्रशांत वंजारे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

उदात्त जीवनमूल्यांची जपणूक आणि रुजवणूक साहित्य करत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रदान केलेल्या पर्यायी संस्कृतीचे अधिष्ठान आपल्या एकूणच साहित्य कृतीला आहे. ही संस्कृती माणसाला मूल्यवान जगण्याची दिक्षा देते. माणसाचे व्यक्तिगत आणि सामाजिक जीवन सकारार्थाने प्रभावित करते. त्यामुळे आंबेडकरी साहित्य संस्कृतीचे साधन असलेली आंबेडकरी कविता समष्टीला मूल्यभान देत असल्याचे प्रतिपादन समिक्षक प्रशांत वंजारे यांनी केले. ते प्रज्ञा साहित्य संघाद्वारे आयोजित आंबेडकरी साहित्य संमेलनातील



परिसंवादात प्रमूख वक्ते म्हणून बोलत होते. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी शेषराव धांडे होते. प्रशांत वंजारे म्हणाले, आंबेडकरी चळवळ आणि साहित्य या अभिन्न बाबी आहेत. जेव्हा आंबेडकरी चळवळ भरात असते तेव्हा तेव्हा साहित्य सुद्धा विशेषतः आंबेडकरी कविता भरात असल्याचा इतिहास आहे. त्यामुळे चळवळीचा उत्कर्ष हा साहित्याचा सुद्धा उत्कर्ष असतो. चळवळीच्या बांधिलकीतूनच

### आंबेडकरी साहित्य संमेलनात विचारमंथन

जीवंत साहित्याचे सर्जन होऊ शकते.

परिसंवादाचे अध्यक्ष कवी शेषराव धांडे म्हणाले आंबेडकरी कविता आंबेडकरी चळवळीचा आरसा आहे. आंबेडकरी चळवळ शब्दबद्ध करण्याचे ऐतिहासिक कार्य आंबेडकरी कवींनी केले आहे.

यावेळी महेंद्र ताजणे, संजय घरडे यांनी सुद्धा विषयाच्या अनुषंगाने आपले विचार व्यक्त केले. सुत्रसंचलन कवी दिपक ढोले यांनी तर आभारप्रदर्शन शालिक वानखडे यांनी केले. परिसंवादाचे संयोजन अनिल कांबळे, गना कांबळे यांनी केले.

# भीम जयंती दिनी अभिवादन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय संतोषी माता नगर वाशीम येथे दि.१४ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार होते तर भारसागळे, विश्वनाथ पडघान, अशोक अडागळे दादाराव इंगोले सावके सर यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरूवातीला उपस्थित मान्यवरांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.नतर कार्यक्रमांचे अध्यक्ष समाधान अवचार यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.तर कार्यक्रमांचे सूत्रसंचालन राहूल सोमटकर यांनी केले तर आभार प्रदर्शन अजय अवचार यांनी केले.कार्यक्रमाला परिसरातील महिला, पुरुष यांची उपस्थिती होती.

# पोलीस कर्मचाऱ्याने परत केली सोन्याची बॅग

■ प्रतिनिधी | वाशिम ■

समाजात पोलीस दलाबद्दलचा विश्वास अधिक दृढ करणारी, प्रेरणादायी आणि अभिमानास्पद घटना दि. १४ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजे दरम्यान पाटणी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गावर घडली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने सुरू असलेल्या मिरवणुकीदरम्यान कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचारी अश्फाक बेनिवाले यांनी दाखवलेल्या प्रामाणिकपणामुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पाटणी चौक ते शिवाजी महाराज चौक या मार्गावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक सुरू असताना वाशिम येथील रेखा प्रल्हाद चव्हाण यांची एक बॅग हातातून नकळत खाली पडली. या बॅगमध्ये सुमारे एक तोळा सोन्याचे दागिने तसेच काही रुपये व इतर महत्त्वाची कागदपत्रे आणि वस्तू होत्या.



ड्युटीवर असताना ही बाब अश्फाक बेनिवाले यांच्या त्वरित लक्षात आली. दरम्यान, एका मोटारसायकलस्वाराने ती बॅग उचलून घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रसंगावधान राखत बेनिवाले यांनी तत्काळ त्याचा पाठलाग करून त्याला पकडले आणि बॅग सुरक्षितरीत्या परत मिळवली. ही कृती त्यांच्या तत्परतेचे आणि सजगतेचे द्योतक ठरली. दरम्यान, बॅग हरविल्याचे लक्षात न आल्याने संबंधित दांपत्य पुढे निघून गेले होते. मात्र, संबंधित व्यक्ती परत येतील, याची

### प्रामाणिकपणाची जिवंत साक्ष

खात्री असल्याने अश्फाक बेनिवाले हे त्या ठिकाणीच बॅग हातात घेऊन थांबून राहिले. काही वेळानंतर ते दांपत्य परत आले आणि बॅग आपली असल्याचे सांगताच बेनिवाले यांनी बॅगमधील सर्व वस्तूंची शहानिशा करून खात्री केली व ती बॅग त्यांच्या ताब्यात दिली. या घटनेतून अश्फाक बेनिवाले यांनी केवळ आपले कर्तव्यच पार पाडले नाही, तर प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि समाजाप्रती असलेली निष्ठा यांचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले आहे. पोलीस कर्मचारी अश्फाक बेनिवाले हे सुरकंडी येथील रहिवासी असून शहर पोलीस स्टेशन येथे कार्यरत आहेत. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या पोलीस दलाच्या ब्रीदवाक्याला त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून साकार केले आहे. या उल्लेखनीय कार्याबद्दल शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार संजय चौधरी यांनीही त्यांचे कौतुक केले.

# अंतिम प्रवासातही मानवतेचा दीप स्व. पुंजाजी यादव आसोले यांचे नेत्रदान



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम तालुक्यातील वाई येथील स्व. पुंजाजी यादव आसोले (वय ८१) यांचे दि.८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार असून, आसोले कुटुंबातील आधारस्तंभ, सर्वांना सोबत घेऊन चालणारे आणि समाजकार्याची विशेष आवड असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. मृत्यूनंतर नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त केली. देशमुख यांच्याकडे ही इच्छा नोंदविल्यानंतर तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालय, वाशिम येथील वैद्यकीय पथकाने कार्यवाही केली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, डॉ. अविनाश पुरी, डॉ. आशिष बेदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. महाले, ज्ञानेश्वर पोटफोडे व रमेश ठाकरे यांनी पाठविण्यात आले.

# प्रभाग क्रमांक १ मध्ये पाणपोईचा स्तुत्य पुढाकार

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहरात वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे नागरिकांची तहान भागविण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतल्याचे पाहायला मिळत आहे.दि.१४ एप्रिल रोजी प्रभाग क्रमांक १ येथील पाण्याच्या टाकीसमोरील गुरुमाऊली मेडिकल समोर सामाजिक कार्यकर्ते अजय घुगे व



संजय दहात्रे यांनी समस्त नागरिकांसाठी पिण्याच्या थंड पाण्याची पाणपोई सुरू केली सध्या उन्हाचा पारा मोठ्या प्रमाणात वाढला असून रस्त्याने ये-जा करणारे नागरिक,प्रवासी तसेच कामगार यांना मोठा दिलासा मिळावा या उद्देशाने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे या पाणपोईमुळे नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत असून सामाजिक कार्यकर्त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी किशोर शिंदे,संजय दहात्रे,सामाजिक कार्यकर्ता अजय घुगे,आकाश घुगे,दिपक नागरगोजे,जयराम आंधळे, प्रतिक राजुरकर,यश आंधळे, आदी मान्यवर उपस्थित होते उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सेवेसाठी उभारण्यात आलेली ही पाणपोई सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरत असून,अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## जाहीरनामा

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार श्री. दिलीप साहेबराव पोले रा. भोयता ता.जि. वाशिम यांची मौजे सोयता येथिल गट नं. ४० मधिल १.१५ हे आर जमीन आहे. सदर जमिनीच्या ७/१२ वर आज रोजी गैरअर्जदार पांडु हैबती यांचे साधे कुळाची नोंद कमी करून मिळणे बाबत वादपत्र या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी सदर प्रकरणात मौजे सोयता येथिल गट नं. ४० मधिल १.१५ हे आर जमीन आहे. सदर जमिनीच्या ७/१२ वर आज रोजी गैरअर्जदार पांडु हैबती यांचे साधे कुळाची नोंद कमी करून मिळणे बाबत प्रकरणात कोणाचे आक्षेप व हरकती असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून १५ दिवसाचे आत सादर करावेत मुदतीत प्राप्त न झालेल्या आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व प्रकरणात योग्य तो आदेश पारित करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक- ६.३.२०२६
ठिकाण- वाशिम

शिक्का

तहसिलदार,
वाशिम

# फुले-आंबेडकर संयुक्त जयंतीनिमित्त भव्य लोकजागर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील ग्राम उमरा शमशोद्दीन येथे शनिवार, ११ एप्रिल रोजी शाहीर संतोष खडसे यांच्या शेतामध्ये क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त भव्य लोकजागर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई, महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण कला क्रीडा व आरोग्य बहुउद्देशीय संस्था उमरा शम. तसेच प्रेरणा अल्पसंख्याक महिला बाल युवक कल्याण सांस्कृतिक कला बहुउद्देशीय संस्था पांगरी धनकुटे यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.

कार्यक्रमात महापुरुषांच्या विचारांचा लोकजागर करण्यात आला. तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण व राष्ट्रपिता महात्मा गांधी



राज्यस्तरीय व्यसनमुक्ती पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा शाल व भारतीय संविधान देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य दिगांबर खोरणे यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी परिवर्तन कला महासंघाचे जिल्हाध्यक्ष शेषराव मेश्राम होते. प्रमुख पाहुणे तथा सत्कार मुर्ती म्हणून जिल्हा बाल संरक्षण अधिकारी भगवान ढोले, डॉ. बाबासाहेब समाजभूषण पुरस्कार प्राप्त अरुणाताई बबन ताजने, शाहीर रतन हाडे, राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती पुरस्कारप्राप्त सदानंद इंगोले तसेच बबन ताजने, सुभाष रोकडे, गोविंद बुंदे, भीमराव खडसे यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

लोकजागर सांस्कृतिक कार्यक्रमात वाशिम, यवतमाळ, हिंगोली व बुलढाणा जिल्ह्यातील विविध कलावंतांनी सहभाग घेतला. यामध्ये वंदना गायकवाड, शिवाजी गायकवाड, शंकर गायकवाड, लोकशाहीर कविनंद गायकवाड, विश्रांती गायकवाड, भास्कर गायकवाड, सींथ वादक शाहीर भगवान कांबळे, पांडुरंग मनवर, तान्हाबाई कांबळे, सविता कांबळे, काजळांबा, मदन भगत, यशवंता खडसे, उत्तम भगत, उमरा कापसे, कमलबाई भगत, धम्मपाल भगत (हनवतखेडा), साहेबराव भालेराव, कोंडजी इंगोले, विलास इंगोले, रेखाबाई भालेराव, देवकाबाई इंगोले, पंचशीला इंगोले, प्रज्ञा इंगोले, ब्राम्हणगाव येथील सुलोचना इंगोले, पद्मिना इंगोले, आनिताबाई भगत, नंदाबाई इंगोले, शर्मिला कांबळे, भारतबाई भगत, लिलाबाई भगत, भिवाजी भगत, भीकाजी भगत, मच्छिंद्र इंगोले, प्रल्हाद इंगोले, भगवान भगत, वशिष्ठ भगत, संतोष कांबळे, ह.भ.प. सुरेश गजभार (पार्डी आसरा), शाहीर

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १३९ ■ गुरुवार, १६ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# जनावरांचे स्थलांतरण थांबविण्यासाठी कायमस्वरूपी छावण्या लावण्याबाबत प्रयत्न करणार- पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

## -पशुपालक व शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत बैठक

**वर्धा जनमाध्यम :** उन्हाळ्याच्या झळांनी होरपळलेल्या वर्धा जिल्ह्यात पाणी व चाऱ्याच्या टंचाईमुळे पशुधनाचे स्थलांतर ही जणू नित्याची वेदना बनली आहे. या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी स्थलांतर थांबविण्यासाठी गावाशेजारीच कायमस्वरूपी पाणी व चारा उपलब्ध करून देणाऱ्या छावण्या उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पशुपालक व शेतकऱ्यांच्या समस्यांवरील आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

उन्हाळ्यातील कठीण परिस्थितीत जनावरांसाठी सुरक्षित आसरा निर्माण करणे अत्यावश्यक असल्याचे नमूद करताना मुंडे म्हणाल्या की, 'ज्या भागांत मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होते, तेथेच पाण्याची सोय असलेल्या ठिकाणी कायमस्वरूपी छावण्या उभारल्या, तर पशुपालकांना गाव सोडण्याची वेळ येणार नाही.' या उपाययोजनांमुळे पशुधन टिकून राहण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



बैठकीत गाई व शेळ्यांच्या क्लस्टर विकासावरही भर देण्यात आला. विशिष्ट वातावरणातच काही जातींची वाढ चांगली होते, हे लक्षात घेऊन जिल्ह्यात क्लस्टर पद्धतीने विकास करण्याचे निर्देश देण्यात आले. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास चालना मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, गवळाऊ या स्थानिक देशी गाईंच्या घटत्या संख्येबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी या गाईंच्या संवर्धनासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज अधोरेखित केली. यासाठी स्वतंत्र बैठक घेऊन ठोस धोरण आखण्याचे आश्वासन मुंडे यांनी दिले. कारंजा तालुक्यातील हेटीकुंडी येथे विकसित होत असलेल्या ग्रासलॅन्ड स्कूलसारख्या उपक्रमांचेही त्यांनी कौतुक केले. याशिवाय, पशुसंवर्धन विभागाच्या नव्या दवाखान्यांवर सोलर ऊर्जा प्रकल्प बसविण्याचे निर्देश देत पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा उभारण्यावरही भर देण्यात आला. जुन्या इमारतींवरही सोलर बसविण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत प्रयत्न करण्याचे सांगण्यात आले. बैठकीच्या निमित्ताने दिव्यांग विद्यार्थिनींना किसान विकास पत्राचे वितरण करण्यात आले.

तसेच सेसफंड योजनेतून स्कुटी वाटप करून त्यांच्या स्वावलंबनाला बळ देण्यात आले. या उपक्रमांमुळे प्रशासनाची सामाजिक बांधिलकीही अधोरेखित झाली. एकूणच, या बैठकीतून पशुपालकांच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्याचा सरकारचा प्रयत्न दिसून आला. स्थलांतराच्या वेदनेतून मुक्ती मिळवून देण्यासाठी कायमस्वरूपी उपायांचा मार्ग शोधण्याची ही सुरुवात ठरणार का, याकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# सीबीएसई दहावीचा निकाल जाहीर; यथार्थ जनईकर जिल्ह्यात अव्वल

**वर्धा जनमाध्यम :** सीबीएसई दहावीचा निकाल बुधवारी (१५ एप्रिल) दुपारी जाहीर झाला असून वर्धा जिल्ह्याचा निकाल समाधानकारक लागला आहे. निकाल जाहीर होताच विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपले गुण तपासले. यंदाही गुणवंत विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन करत जिल्ह्याची शैक्षणिक परंपरा कायम राखली.



हिंगणघाट येथील भारतीय विद्या भवन गिरधरदास मोहता विद्या मंदिरचा विद्यार्थी यथार्थ कौस्तुभ जनईकर याने ९९.४० टक्के गुण मिळवत जिल्ह्यात अव्वल स्थान पटकावले. त्याने चार विषयांत १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. त्याच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

भुगाव येथील भवन्स लॉयड्स विद्या निकेतनचा पियूष चौधरी (९८.८%) आणि सूर्या भजभुजे (९८.६%) यांनी अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान मिळवले.

वर्ध्यातील स्कूल ऑफ स्कॉलर्सचा निकाल ९६.८ टक्के लागला. ९४ विद्यार्थ्यांपैकी ९१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून तीन विद्यार्थ्यांना कंपार्टमेंट मिळाले आहे. आर्वी येथील तपस्या पब्लिक स्कूलचा देवांशू प्रमोद गाठे (९६%) हा तालुक्यात अव्वल ठरला.

म्हसाळा येथील अग्रगामी कॉन्व्हेंट, कारंजा (घा.) येथील एआरसी पब्लिक स्कूल आणि वर्ध्यातील गांधी सिटी पब्लिक स्कूल यांचा निकाल १०० टक्के लागला. अग्रगामी कॉन्व्हेंटची अमृता कुलकर्णी (९८.२%) आणि गांधी सिटी पब्लिक स्कूलची भूमी पालीवाल (९५३) यांनी उल्लेखनीय यश मिळवले.


केंद्रीय विद्यालय, पुलगावचा निकालही १०० टक्के लागला. येथील आदित्य तिवस्कर (९७.२%), आर्यन चिचाटे (९६%) आणि तुषार पाल (९३.४%) यांनी उत्तम कामगिरी केली.

एकूणच, यंदाच्या निकालात वर्धा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी करत गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

# सेलूकरांच्या जिवाशी खेळ कोणाचा? 'त्या' ठेकेदारामागे नेमका आशीर्वाद कुणाचा

## -दीड महिन्यांपासून काम ठप्प; रस्ते उखडलेले, नागरिक त्रस्त

**सेलू जनमाध्यम :** शहराला स्वच्छ पाणीपुरवठा करण्याच्या नावाखाली सुरू असलेली कोट्यवधींची योजना आता नागरिकांसाठी डोकेदुखी ठरू लागली आहे. ठेकेदाराच्या कथित निष्काळजीपणामुळे गेल्या दीड महिन्यांपासून काम पूर्णपणे ठप्प असून, उघड्या चॅनेलमुळे नागरिकांचा जीव अक्षरशः धोक्यात आला आहे.



मेडिकल चौक ते मटन मार्केट मार्गे घोराड रस्त्यावर पाईपलाईन टाकण्यासाठी मोठे चर खोदून ठेवण्यात आले आहेत. मात्र काम अर्धवट सोडून दिल्याने रस्ते धोकादायक बनले आहेत. वाहनचालकांना कसरत करत मार्ग काढावा लागत असून, दुचाकीस्वार व पादचाऱ्यांच्या अपघातांची संख्या वाढू लागली आहे.

नगरपंचायतीचे मुख्याधिकारी अनुप अग्रवाल यांनी परप्रांतीय मजूर गावी गेल्याने काम थांबल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. परंतु, एवढ्या मोठ्या प्रकल्पासाठी पर्यायी व्यवस्था न ठेवणे ही ठेकेदाराची जबाबदारी टाळण्याची पद्धत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. मजुरांच्या नावाखाली शहराला वेठीस धरण्याचा हा प्रकार आहे, असा संतप्त सूर उमटत आहे.

उखडलेल्या रस्त्यांमुळे वाहतुकीचा खोळंबा होत असून, बाजारपेठेतील व्यवसायावरही मोठा परिणाम झाला आहे. दुकानदारांना आर्थिक फटका बसत आहे. रोजच्या प्रवासात नागरिकांना धूळ, चिखल आणि अपघाताच्या भीतीचा सामना करावा लागत आहे.

मुख्याधिकाऱ्यांनी १० ते १२ दिवसांत काम सुरू करण्याचे आश्वासन दिले असले, तरी 'तारीख पे तारीख' देण्यापेक्षा ठेकेदारावर कारवाई का होत नाही, असा सवाल उपस्थित होत आहे. शहराचे रस्ते उद्ध्वस्त करून नागरिकांचे हाल करणाऱ्या ठेकेदाराला तात्काळ काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, या ठेकेदारामागे नेमका कुणाचा आशीर्वाद आहे, असा संशयही व्यक्त केला जात आहे. प्रशासनाने तातडीने कठोर भूमिका घेतली नाही, तर नागरिकांचा रोष उफाळून येण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# विकासाच्या नावाखाली जनता वेठीस; यशवंत चौक 'भकास' अवस्थेत

**सेलू जनमाध्यम :** शहरातील अत्यंत वर्दळीचा यशवंत चौक सध्या रखडलेल्या कामामुळे नागरिकांसाठी डोकेदुखी ठरला आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आणि कंत्राटदाराच्या कामचुकारपणामुळे हा परिसर 'विकासाऐवजी भकास' झाल्याची संतप्त भावना नागरिक व्यक्त करत आहेत.



दीड-दोन वर्षांपूर्वी वाहतुकीला अडथळा ठरत असल्याचे कारण देत लाखो रुपये खर्चून उभारलेला उड्डाणपूल पाडण्यात आला. मात्र त्यानंतर रस्ता व सौंदर्यीकरणाचे काम आजतागायत पूर्ण झालेले नाही. परिणामी, नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. संपूर्ण रस्ता उकरून ठेवल्याने परिसरात धुळीचे लोट उसळत आहेत. पाणी शिंपडण्याचे कामही केवळ औपचारिक राहिले आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना डोळ्यांचे विकार, तर दुचाकीस्वारांना श्वसनाचे त्रास होत आहेत. उड्डाणपूल पाडल्यानंतर वाहतुकीचा पूर्णपणे बोजवारा उडाला असून दिशादर्शक फलकांचा अभाव आहे. त्यामुळे येथे अपघाताचा धोका वाढला आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून वाहनांचे नुकसान होत आहे.

कंत्राटदाराने अद्याप पर्यायी सर्व्हिस रोड तयार केलेला नाही. तसेच नाल्यांच्या बांधकामाच्या दर्जावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्गही उपलब्ध नाही. या सर्व प्रकारामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. प्रशासनाने तातडीने काम पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

# दुरंतो थांब्यावरून श्रेयवाद पेटला : रेल्वे स्थानकावर 'राजकीय हायजॅक'चा आरोप

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा रेल्वे स्थानकावर १२२९० दुरंतो एक्सप्रेसला १५ एप्रिलपासून थांबा मिळाल्यानंतर श्रेयवादाची ठिणगी पेटली आहे. या थांब्याचे खरे श्रेय चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला जात असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जात असताना, याचे श्रेय मात्र भाजपकडून घेतले जात असल्याचे चित्र आज स्थानकावर दिसून आले.



दुरंतो एक्सप्रेसचे रात्री ८.५७ वाजता आगमन होताच, अंबादास जानवे, पालकमंत्री पंकज भोयर, खासदार अमर काळे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून गाडी पुढे रवाना करण्यात आली.

यावेळी खासदार अमर काळे यांनी वर्धा जिल्ह्याच्या दळणवळणाच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण असून भविष्यात आणखी सुविधा मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरूच राहतील असे यांनी यावेळी सांगितले,

या कार्यक्रमादरम्यान रेल्वे स्थानक परिसरात भारतीय जनता पक्षाचे झेंडे लावण्यात आले होते, तसेच मोठा स्टेज उभारण्यात आल्याने कार्यक्रमाला मात्र नागरिकांची उपस्थिती कमी होती, स्पष्टपणे राजकीय रंग चढल्याचे दिसून आले.

याशिवाय, भाजपचे माजी खासदार रामदास तडस आणि पक्ष कार्यकर्ते या थांब्याचे श्रेय स्वतःकडे घेत असल्याचे आरोपही उपस्थित करण्यात आले. यामुळे स्थानिक पातळीवर नाराजी व्यक्त होत असून, जनतेच्या सुविधेच्या निर्णयावर राजकारण का असा प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, प्रवाशांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या या थांब्यामुळे वर्धा जिल्ह्याला मोठा दिलासा मिळाला आहे. तरी या निर्णयाभोवती सुरू झालेल्या श्रेयवादाच्या राजकारणामुळे वातावरण तापल्याचे चित्र आहे.

# वर्धा तापला- ४५ अंशांचा कहर; ३०८१ शाळा-अंगणवाड्यांना आज सुट्टी

**वर्धा जनमाध्यम :** आभाळातून जणू आगच बरसतेय अंगाची लाही लाही करणाऱ्या उष्णतेने वर्धा जिल्ह्याला अक्षरशः वेठीस धरले आहे. भारत हवामान विभाग च्या नागपूर वेधशाळेने दिलेल्या हिट अलर्टनंतर गुरुवार, १६ एप्रिल रोजी तापमान थेट ४५ अंश सेल्सिअसपर्यंत झेपावण्याचा इशारा देण्यात आला आहे. या भीषण परिस्थितीची दखल घेत जिल्हा प्रशासनाने तातडीने निर्णय घेत जिल्ह्यातील सर्व शाळा आणि अंगणवाड्या बंद ठेवण्याचे आदेश जारी केले. त्यामुळे तब्बल १४५४ शाळा आणि १६२७ अंगणवाड्या एकूण ३०८१ शिक्षण केंद्रांना गुरुवारी टाळे लागणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून वर्ध्यातील तापमानाने विक्रमी झेप घेतली आहे. १३ एप्रिलला ४३.०१ अंश सेल्सिअसवर पोहोचलेले तापमान १४ एप्रिलला ४३.०५ अंशांवर गेले. बुधवारीही ४३.०९ अंशावर उन्हाचा कहर कायम राहिल्याने नागरिकांचे अक्षरशः हाल झाले. दुपारच्या वेळी रस्ते ओस पडले, तर सावलीच्या शोधात लोकांची धावपळ सुरू आहे. उष्णतेची ही लाट आता जीवघेणी ठरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

हवामान विभागाचा इशारा मिळताच प्रशासन खडबडून जागे झाले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी सर्वप्रथम अंगणवाड्या बंद ठेवण्याचे आदेश दिले. त्यानंतर जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनीही परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्व शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. लहान मुलांच्या आरोग्याशी कुठलीही तडजोड केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे.

**वर्ध्याच्या इतिहासात ३० एप्रिल १९९६ रोजी ४६.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. सध्याची परिस्थिती पाहता हा विक्रम धोक्यात येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

**तापमानाचा चढता आलेख (गेल्या वर्षांचा उच्चांक)**

| | |
|---|---|
| २०१६ | ४५.००°C |
| २०१७ | ४५.०२°C |
| २०१८ | ४५.०८°C |
| २०१९ | ४६.००°C |
| २०२० | ४२.०९°C |
| २०२१ | ४३.०४°C |
| २०२२ | ४५.०५°C |
| २०२३ | ४३.००°C |
| २०२४ | ४२.०५°C |
| २०२५ | ४४.०७°C |

# वर्धा शहर प्लास्टिकमुक्त करणार: नगराध्यक्ष सुधीर पांगुळ

## १०० दिवसांत विकासाचा रोडमॅप जाहीर

**वर्धा, जनमाध्यम :** शहरातील वाढत्या प्लास्टिक कचऱ्याच्या समस्येवर निर्णायक तोडगा काढत वर्धा शहर प्लास्टिकमुक्त करण्याचा संकल्प नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांनी व्यक्त केला. पदाच्या १०० दिवसांच्या कार्यकाळाचा आढावा देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी विविध महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती दिली.



शहरातील घनकचऱ्यात सर्वाधिक प्रमाण प्लास्टिकचे असल्याचे निदर्शनास आल्याने नगरपालिका प्रशासनाने यावर ठोस उपाययोजना करण्याचे ठरवले आहे. पर्यावरणपूरक शहर उभारणीसाठी व्यापक जनजागृती आणि कठोर अंमलबजावणी यावर भर दिला जाणार असल्याचे पांगुळ यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी सांगितले की, पदभार स्वीकारण्यापूर्वी महावितरणचे सुमारे ४ कोटी रुपयांचे वीज बिल थकीत होते. मात्र, केवळ १०० दिवसांत ३ कोटी रुपये अदा करून थकबाकी १ कोटीवर आणण्यात यश आले. तसेच पवणार पाणीपुरवठा योजनेवरील दरमहा ११ ते १२ लाख रुपयांचा खर्च कमी करण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सुमारे ६ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पातून दरवर्षी सुमारे ६० लाखांची बचत अपेक्षित आहे. शहरातील पथदिव्यांवर दरमहा होणारा २५ लाखांचा खर्च कमी करण्यासाठी स्मशानभूमी परिसरातील ५ एकर जागेवर सोलर प्लांट उभारण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. यामुळे ऊर्जा बचत आणि आर्थिक शिस्त या दोन्ही बाबींना चालना मिळणार आहे.

# राष्ट्रपतीं द्रौपदी मूर्मू यांच्या आगमनाने वर्धा सज्ज

## सुरक्षा व वाहतुकीवर कडक नियंत्रण

**वर्धा जनमाध्यम :** देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आज गुरुवार, १६ एप्रिल रोजी वर्धा येथे आगमन होत असून, या पार्श्वभूमीवर संपूर्ण जिल्हा प्रशासन हाय अलर्टवर आहे. शहरात ठिकठिकाणी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, नागरिकांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

राष्ट्रपतींच्या दौऱ्याची सुरुवात सेवाग्राम आश्रम येथील बापूकुटीला भेट देऊन होणार आहे. त्यानंतर त्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ येथे आयोजित सहाव्या दीक्षांत समारंभात सहभागी होतील. सकाळी १०.५० वाजता त्यांचा ताफा सेवाग्राम येथे दाखल होईल, तर ११.२५ वाजता विद्यापीठात आगमन अपेक्षित आहे. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर वर्धा शहरासह परिसरात व्यापक सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली आहे. सीमावर्ती भागात तपासणी नाके उभारण्यात आले असून, संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त पोलीस तैनात करण्यात आले आहेत. सेवाग्राम ते हिंदी विद्यापीठ मार्गावर विशेष लक्ष ठेवण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

माझी पक्षकार सौ. लता शामराव सेलोकर या मौजा सेलू काटे, ता. व जि. वर्धा येथील, ग्रामपंचायत सेलू काटे हद्दीतील, गावठाण मालमत्ता अनुक्रमांक १७, वॉर्ड क्र. ३ मधील मालमत्ता क्र. १७, क्षेत्रफळ १२०.८२ चौ. मी. (१३००.०० चौ. फूट) असलेल्या तसेच त्यावर बांधकाम केलेले घर, बांधकाम क्षेत्रफळ ६४०.०० चौ. फूट असलेल्या मालमत्तेच्या मालक आहेत.

सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत:

पूर्व: श्री. सेलोकर यांचे घर

पश्चिम: श्री. वाणी व पांढरकर यांचे घर, उत्तर: रस्ता

दक्षिण: श्री. पिसुड्डे यांचे घर

तसेच, ग्रामपंचायत सेलू काटे यांनी दिनांक २५/०२/२०२६ रोजी दिलेल्या फेरफार प्रमाणपत्रानुसार सौ. लता शामराव सेलोकर या सदर मालमत्तेचा १३ वर्षांपासून ताबा धारण करून आहेत.

आता सौ. लता शामराव सेलोकर या वरील नमूद मालमत्ता श्री. जगदीश शामरावजी सेलोकर यांच्या नावे भेटपत्र (गिफ्ट डिड ) द्वारे हस्तांतरित करणार आहेत.

माझ्या पक्षकारांनी जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

म्हणून सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमूद व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड.आर.आर.तिवारी,**
**रामनगर, वर्धा.**
**मो.९९२२४२६१६८**

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार सौ. कंचन सचिन सरोदे व श्री. सचिन रमेश सरोदे हे मौजा ओल्ड धामणगाव , ता. धामणगाव(रेल्वे) असे, जि. अमरावती येथील, ग्रामपंचायत ओल्ड धामणगाव (रेल्वे) हद्दीतील फील्ड सर्व्हे क्र. ५३/१अ व ५३/१बी अंतर्गत वैभवलक्ष्मी नगरी भाग २ येथील प्लॉट क्र. १८, मालमत्ता क्र. ५०३४, क्षेत्रफळ ४९.८० चौ. मी. (५३५.८४ चौ. फूट) असलेल्या मालमत्तेचे मालक आहेत.सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत:

पूर्व: ९ मी. लेआउट रोड

पश्चिम: प्लॉट क्र. १५अ,

उत्तर: प्लॉट क्र. १७,

दक्षिण: प्लॉट क्र. १९,

तसेच, कौसर जहाँ मोहम्मद नईम, नूरजहाँ खलीलकान पठाण, सलीमखान खलीलकान पठाण, कलीमखान खलीलकान पठाण व अलीम खलीलकान पठाण यांनी वरील नमूद प्लॉट क्र. १८, मालमत्ता क्र. ५०३४, क्षेत्रफळ ४९.८० चौ. मी. (५३५.८४ चौ. फूट) ही मालमत्ता दिनांक २३/१२/२०२५ रोजी दस्त क्र. २९९९/२०२५ अन्वये सौ. कंचन सचिन सरोदे व श्री. सचिन रमेश सरोदे यांच्या नावे विक्रीपत्राद्वारे हस्तांतरित केली असून त्यांची नोंद संबंधित मालमत्तेवर करण्यात आलेली आहे.

तसेच, माझ्या पक्षकारांकडून मूळ लिंक विक्रीपत्र दिनांक २१/०४/२०१४, दस्त क्र. ६०१/२०१४ हरवलेले आहे.

सौ. कंचन सचिन सरोदे व श्री. सचिन रमेश सरोदे यांनी मुथूट हाउसिंग फायनान्स कंपनी लिमिटेड येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

म्हणून सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमूद व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास किंवा वरील मूळ लिंक विक्रीपत्र कोणास आढळल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा

**ॲड.आर.आर.तिवारी,**
**रामनगर, वर्धा.**
**मो.९९२२४२६१६८**

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

क्र.प्रस्तु-१/कावी-६९/२०२६ दिनांक : १३ /०४/२०२६

बाचाः-१. सार्व, आरोग्य विभाग शासन निर्णय क्र./ जमूनों-२५२५/ (ई. ऑ.९९१९८२)/ प्र.क्र.२२/कु.क./मंत्रालय मुंबई दिनांकः १२ मार्च २०२५

२. मा. जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र. एमएजी/डे-२७/अका/जन्म-मृत्यु नोंदी/कावि-४०४/ २०२५ दि.०४/०७/२०२५

### -: जाहीरनामा :-

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, श्री/श्रीमती साना फिरदोस मोहम्मद अयाज रा./ ता. आंर्वी जि. वर्धा यांनी ग्रामपंचायत/नगर परिषद शेघाट ता. वरुड जि. अमरावती यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म/मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी आई नामेः रजीया बानो मोहम्मद यूसुफ रा. रा./ ता. आर्वी. जि. वर्धा यांचे (जन्म/मृत्यु दि.२५/१२/१९७२) नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यु चे नोंद घ्यावी या करीता सदरहु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार व सुधारणा अधिनियम २०२३ अन्वये विलंबाने जन्म/मृत्युची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिदध झाल्यापासून ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखल करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी दि.१३/०४/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले

**सही**
**तहसीलदार, वरुड**

# बुलडोजर कारवाईत भेदभाव का? यशोमती ठाकूर यांचा सरकारला सवाल

## ◆ भोंदूबाबा खरातच्या घरावरही बुलडोजर चालवा
## ◆ खरात कोणा-कोणाच्या घरात याचा शोध घ्या

**अमरावती-** राज्यात गेल्या काही दिवसांपासून महिलांवरील अत्याचाराच्या घटनांनी खळबळ उडालेली असतानाच, आता या प्रकरणांमधील कारवाईवरून राजकारण तापले आहे. अचलपूर येथील लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपी अयान अहमद याच्या घरावर बुधवारी (दि.१५) प्रशासनाने 'बुलडोजर' चालवल्यानंतर, काँग्रेस नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. 'जर अचलपूरच्या आरोपीवर बुलडोजर चालवला जातो, तर नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात याला अभय का?' असा सवाल करत त्यांनी सरकारच्या दुहेरी भूमिकेवर तिखट शब्दांत प्रहार केला.



परतवाडा येथील मुलींचे लैंगिक शोषण करून त्यांचे व्हिडिओ व्हायरल करणाऱ्या अयान अहमदच्या घरावर आज प्रशासनाने कारवाई केली. या कारवाईचे स्वागत करतानाच यशोमती ठाकूर यांनी सरकारला आरसा दाखवला. त्या म्हणाल्या की, गुन्हेगार हा फक्त गुन्हेगार असतो, त्याला जाती-धर्माच्या चष्म्यातून पाहू नका. नाशिकमध्ये अनेक महिलांची फसवणूक करणाऱ्या अशोक खरातचे घर अद्याप सुरक्षित कसे? त्याच्यावरही अशीच 'बुलडोजर' कारवाई का होत नाही? असा सवाल त्यांनी सरकारला केला. यशोमती ठाकूर यांनी राज्याच्या गृहविभागावर गंभीर आरोप केले आहेत. त्या म्हणाल्या, 'पुरोगामी महाराष्ट्रात महिलांचे अश्लील व्हिडिओ सर्रास व्हायरल होत आहेत, हे राज्यासाठी भूषणावह नाही. गृहमंत्रालयाचा गुन्हेगारांवर कोणताही धाक उरलेला नाही. सायबर विभाग नेमके काय करत आहे? गुन्ह्यांना धार्मिक रंग देऊन मूळ प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जात आहे.' नाशिकच्या प्रकरणावर बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, अशोक खरातची पत्नी अद्याप फरार आहे. तिला तातडीने शोधून काढावे. खरातने कोणाकोणाची फसवणूक केली आणि त्याचे 'नेटवर्क' कुठेपर्यंत पसरले आहे, याचा छडा लावणे गरजेचे आहे. या प्रकरणातील एजंट लोकांवरही कारवाई झाली पाहिजे. खरात कुणाकुणाच्या घरात गेला, हेही शोधले पाहिजे.



**काँग्रेस शिष्टमंडळाचे पोलिसांना निवेदन-** आज अमरावती येथे आमदार भाई जगताप, खासदार बळवंत वानखडे, यशोमती ठाकूर आणि जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या एका शिष्टमंडळाने पोलीस प्रशासनाची भेट घेतली. विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे आणि ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांना निवेदन दिले. केवळ मुख्य आरोपीच नाही, तर या गुन्ह्यात त्याला मदत करणाऱ्या सर्व साथीदारांना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर असून प्रशासनाने या प्रकरणाचा तपास जलद गतीने करावा, अन्यथा काँग्रेसतर्फे लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा उपस्थित नेत्यांनी यावेळी दिला आहे.

# खरात प्रकरणाचे कनेक्शन थेट मंत्रालयापर्यंत

## अंजली दमानियांनी केला गौप्यस्फोट

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाचे धागेदोरे थेट प्रशासकीय अधिका-यांपर्यंत पोहोचले आहेत. अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषदेत बड्या अधिका-यांची नावे जाहीर करत खळबळजनक गौप्यस्फोट केले आहेत. भोंदू अशोक खरात प्रकरणाचे कनेक्शन थेट मंत्रालयापर्यंत, नावासह कोणाचे किती कॉल अंजली दमानियांनी सर्वच सांगितले. नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी दररोज नवनवीन खुलासे होताना दिसत आहेत. आता अशोक खरात प्रकरणाचे धागेदोरे प्रशासकीय वर्तुळापर्यंत पोहोचले आहेत. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आता याप्रकरणी एक धक्कादायक खुलासा केला आहे. अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषद घेत अशोक खरात याला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणा-या बड्या अधिका-यांची नावे जाहीर केली आहेत. या सर्वांवर कठोर कारवाई करा, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे.

अंजली दमानिया यांनी नुकतीच पत्रकार परिषद घेत अनेक मोठे खुलासे केले आहेत. त्यांनी विविध फोटो पोस्ट करत मोठमोठे खुलासे केले आहेत. अशोक खरातला जिल्हाधिका-यासह तहसीलदार, उपजिल्हाधिकारी आणि पोलिस अधिका-यांनी शेकडो वेळा दूरध्वनीवरून संवाद साधला, असे क?ल डिटेल्समधून समोर आले आहे. या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या सर्वांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे.

अशोक खरातला ज्यांनी मदत केली याची माहिती समोर आणणे फार गरजेचे आहे. यात एक जिल्हाधिकारी आहेत ज्यांनी त्यांना खूप मदत केली होती. ते मुंबईत कार्यरत आहेत. आता मी त्यांचे नाव घेउन सांगते अभिजीत भांडे पाटील असे त्यांचे नाव असून ते एसआरएमध्ये होते. त्यांना एसआरएमधूनही पदमुक्त करून त्यांना पुन्हा त्यांच्या पूर्वीच्या ठिकाणी आणले आहे. यांना खरेतर पदमुक्त करणे गरजेचे आहे. त्यांना काढून टाकणे गरजेचे आहे, असे अंजली दमानिया म्हणाल्या.

**खरातांना मदत करण्यासाठी हा माणूस फार पुढे-** अभिजीत भांडे पाटील हे केसरकर आणि अशोक खरात यांच्यासोबत दिसत आहेत. त्यांचे दोन फोन आहेत. एका फोनवरून त्यांनी खरातांशी १४३ वेळा संभाषण केले. दुस-या फोनवरून ५३ वेळा त्यांनी फोन केला आहे. आतापर्यंत मला जी माहिती मिळाली आहे, त्यानुसार कल्पना खरात, हर्षवर्धन खरात, तृप्ती खरात, सृष्टी खरात हे फरार आहेत. दोन्ही मुलींबद्दल मला काही माहिती नाही. पण हे दोघे जण जे फरार आहेत, त्यांना आता कुठेतरी यांनी संरक्षण दिले आहे. म्हणून मी विनंती करते की यांना तात्काळ डिटेन करण्यात यावे. कारण सर्व ठिकाणाहून खरातांना मदत करण्यासाठी हा माणूस



फार पुढे आहे, असा आरोपही अंजली दमानिया यांनी केला.

**हे लोक खरातांना फोन का करायचे?-** दीपक लोंढे हे जवळचे होते. हे केसरकरांच्याही जवळचे आहेत. त्यांचे १८९ कॉल आहेत. बाळासाहेब बोराडे यांचे १५६ कॉल आहेत. नंदकिशोर काठोरे हे डॉक्टर आहेत. १०६ कॉल आहेत. त्यांचा रोल बोलता येत नाही. पण विचित्र रोल आहे. सचिन सुंबाळे १७७ कॉल्स आहेत. मंगेश नव्हाळे ११० कॉल्स आहे. राहुल देशमुख, अविनाश पोटे, महेंद्र शेळके पाटील यांचाही रोल तपासला पाहिजे, असा खुलासा अंजली दमानिया यांनी केला.धक्कादायक बाब म्हणजे जवळजवळ तहसीलदार, उपजिल्हाधिकारी, पीआय आणि एपीआय असे सात अधिकारी, दोन आरटीओ त्यात निमसे नावाचा व्यक्ती आहे. हे लोक खरातांना फोन का करायचे, शेकडो क?ल का केले, असा सवालही त्यांनी केला आहे.सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी भोंदूबाबा अशोक खरातच्या संपर्कात असलेल्या राजकारण्यांची, पीए, उच्च पदस्थ अधिका-यांची नावेच जाहीर केली.नाशिकचे आमदार नितीन पवार, चंद्रकांत पाटील, चंद्रकांत पाटलांचे पीए मंगेश देशपांडे, उदय सांगळे सिन्नरहून उभे होते. पराभूत झाले. तेही भेटले. विधान परिषद आमदार शिवाजी शहाणे, पद्मश्री पोपटराव पवार, रामदास खेडकर (दादा भुसेंचे पीए), दीपक केसरकर यांचा आधीचा नंबर सापडला नाही. ट्रू कॉलर्सवरून नंबर शोधल्यावर केसरकरांचा नंबर मिळाला. त्यावरून १९ फोन झाले होते. राहुल कोतडे ओएसडी विखे पाटलांचे, प्रभाकर काळे, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेही कॉल डिटेल्स त्यांनी समोर आणले. तर या यदीत नवीन नाव म्हणजे राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांचे आहे. हे नाव वाचून मला दुःख झाले. त्यांच्याकडून अशी अपेक्षा नव्हती. अशा बाबांकडे भविष्य विचारायला कोण घेउन गेले माहीत नाही. कदाचित मी राँग असेल. मला ती व्यक्ती आतापर्यंत चांगली वाटायची, असे अंजली दमानिया म्हणाल्या.

# तुमचे पण व्हिडीओ व्हायरल करेन

## चाकणकरांनी नेत्यांना धमकी दिल्याचा रूपाली ठोंबरे यांचा दावा

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) नेत्या रूपाली ठोंबरे पाटील यांनी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर अत्यंत गंभीर आणि थेट आरोप केले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात लिंगपिसाट अशोक खरात हे प्रकरण चांगलेच चर्चेत आहे. या प्रकरणी दिवसेंदिवस नवनवीन खुलासे होताना दिसत आहे. अशोक खरातची सध्या SIT चौकशी सुरु आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) नेत्या रूपाली ठोंबरे पाटील यांनी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर अत्यंत गंभीर आणि थेट आरोप केले आहेत. नाशिक येथील भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात यांच्या लैंगिक शोषण आणि सेक्स रॅकेट प्रकरणात चाकणकरांच्या माध्यमातून महिलांवर थेट लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप केला आहे.



रूपाली ठोंबरे यांनी चाकणकरांवर आरोप करत म्हटले की, दहावी नापास कोंबडी चोराच्या भोंदू बाबाच्या ट्रस्ट वरती तुम्ही आहात. तुमच्या माध्यमातून महिलांवरती लैंगिक अत्याचार झाले. तुम्हाला अटक झाली पाहिजे, का अटक होत नाही? ज्यांना चाकणकर यांनी पूजेला नेलं ते चाकणकरला वाचवत आहेत. तुमचे पण व्हिडीओ व्हायरल करेन अशा धमक्या चाकणकर यांनी ज्यांनी ज्यांनी करंगळ्या कापल्या त्यांना दिल्या आहेत. त्यामुळे ते चाकणकरला वाचवत आहेत.पुढे रुपाली ठोंबरे म्हणाल्या, रूपाली चाकणकरला कायदा कळत नाही संविधान कळत नाही. वागण्याच्या रीती रिवाज कळत नाही. ज्यांना महिला आयोगाच्या पदाची गरिमा कळली नाही त्यांनी २८ दिवसांनी बोलू द्या किंवा २८० दिवसांनी बोलू द्या त्यांच्याकडे बोलायला काही नाही. रूपाली चाकणकरने पुरावे देउन बोलावं. पोलीस चाकणकर आणि चाकणकरच्या परिवाराला वाचवत आहेत. शेवटी रुपाली ठोंबरे यांनी रूपाली चाकणकरच्या टोळी मधल्या ज्या ज्या महिला आहेत त्यांच्यावरती सुद्धा कारवाई झाली पाहिजे अशी मागणी केली आहे. नाशिकमध्ये अशोक खरातवर महिलांचे लैंगिक शोषण, ब्लॅकमेलिंग आणि अश्लील व्हिडीओ बनवल्याचे आरोप आहेत. या प्रकरणात खरात यांना अटक झाली असून, एसआयटी मार्फत चौकशी सुरू आहे. या प्रकरणात रूपाली चाकणकर यांचे खरातशी निकटचे संबंध असल्याचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाले होते, ज्यामुळे चाकणकर यांना महिला आयोग आणि पक्षातील पद सोडावे लागले होते. ठोंबरे पाटील यांनी या प्रकरणासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले असून, रूपाली चाकणकर यांना तातडीने अटक करण्याची आणि त्यांना सहआरोपी म्हणून तपासात समाविष्ट करण्याची मागणी केली आहे. रूपाली ठोंबरे पाटील यांच्या या आरोपांमुळे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. रूपाली ठोंबरे आणि रुपाली चाकणकर एकाच पक्षातील असल्याने हा वाद आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षांतर्गत संघर्षाचे रूप घेत असल्याचे दिसते.

# स्मार्ट मीटरचा कहर!

## 2 युनिट वापराचे आले 2000 बिल; दाद मागणा-याची वीजच कापली

**वाराणसी/वृत्तसंस्था :** स्मार्ट मीटरच्या माध्यमातून पारदर्शक कारभाराचा दावा करणा-या वीज विभागाचा भोंगळ कारभार वाराणसीच्या ग्रामीण भागात चव्हाट्यावर आला आहे. मीटरच्या अव्वाच्या सव्वा बिलांमुळे सामान्य ग्राहकांचे शोषण सुरू असून, तक्रार करणा-



खालिसपूर येथील व्यावसायिक अंजनी पांडेय यांची ही कहाणी संतापजनक आहे. दोन महिन्यांपूर्वी त्यांच्या दुकानात जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवण्यात आले. मंदीमुळे दुकान बहुतांश काळ बंद असतानाही, संपूर्ण महिन्यात केवळ २ युनिट वीज वापर झाला. मात्र, वीज विभागाने त्यांना २,००० रुपयांचे बिल पाठवून दिले. मार्च महिन्यातही हाच प्रकार घडला.पांडेय यांनी या प्रकरणाचा व्हिडिओ पुराव्यासह अधिका-यांना पाठवला आणि तक्रार केली. मात्र, बिल दुरुस्त करण्याऐवजी मंगळवारी त्यांच्या दुकानाची वीजच तोडण्यात आली.

**कनेक्शन कापले तरी बिल ५ हजारांवर!**

असाच अनुभव मानापूरचे संतोष बेनबंशी यांना आला. ४,००० रुपयांच्या थकीत बिलामुळे त्यांचे कनेक्शन आधीच कापण्यात आले होते. तरीही त्यांचे बिल वाढून ५,००० रुपये आले आहे. कोणताही अधिकारी त्यांचे म्हणणे ऐकण्यास तयार नसल्याचा आरोप ग्राहकांनी केला आहे.

**अधिका-यांची अजब सारवासारव**

या प्रकरणावर एसडीओ प्रशांत शुक्ला यांनी अजब उत्तर दिले आहे. त्यांच्या मते, 'स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना उत्तम सेवा मिळत आहे. वीजपुरवठा खंडित केल्यानंतरही स्मार्ट मीटरचे दररोज १० रुपये भाडे लागते, ज्यामुळे बिल वाढते.' लवकरच या संदर्भात जागरूकता अभियान राबवणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र, वापराविना हजारो रुपयांचे बिल कसे येते, याचे ठोस उत्तर विभागाकडे नाही.

## इराणचे जहाज अचानक गुजरातच्या किना-यावर!

# भारतीय रिफायनरींचा तेल खरेदीस नकार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराणचे २० लाख बॅरल कच्चे तेल घेउन जाणारे 'डेर्या' हे अतिविशाल जहाज गुजरातच्या किना-यावर दाखल झाले आहे. मात्र, अमेरिकेच्या निर्बंधांमधील तांत्रिक अटींमुळे भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यांनी हा माल स्वीकारण्यास नकार दिला आहे. २० मार्चनंतर या जहाजात तेल भरण्यात आल्याने हा पेच निर्माण झाला आहे. ट्रम्प प्रशासनाने २० मार्च रोजी ३० दिवसांची विशेष सवलत जाहीर केली होती. या सवलतीनुसार, २० मार्चपूर्वी जहाजावर भरलेल्या तेलाची विक्री १९ एप्रिलपर्यंत करण्यास परवानगी होती. मात्र, 'केप्लर'च्या ट्रॅकिंग डेटानुसार, 'डेर्या' जहाजात२८ मार्च रोजी तेल भरले. ही तारीख सवलतीच्या मर्यादेबाहेर असल्याने, हे तेल खरेदी केल्यास भारतीय कंपन्यांवर अमेरिकेच्या निर्बंधांची टांगती तलवार असेल.२० मार्च रोजी, ट्रम्प प्रशासनाने जागतिक उर्जा पुरवठ्यावरील दबाव कमी करण्याच्या उद्देशाने, समुद्रात अडकलेल्या इराणी तेलाच्या विक्रीला परवानगी देणारी ३०-दिवसांची निर्बंधमाफी जारी केली. अमेरिकेच्या ट्रेझरी डिपार्टमेंटच्या परवान्यानुसार, या माफीमुळे २० मार्च ते १९ एप्रिल दरम्यान जहाजांवर



आधीच भरलेल्या इराणी कच्च्या तेलाच्या आणि पेट्रोलियम उत्पादनांच्या विक्रीला परवानगी मिळाली.सवलतीअंतर्गत अंतिम मुदतीनंतर भरलेला माल स्वीकारल्यास खरेदीदारांना अमेरिकेच्या निर्बंधांना सामोरे जावे लागू शकते, यामुळे भारतीय रिफायनर्सकडून तो माल स्वीकारण्याची शक्यता कमी होते.

**अमेरिका ही सूट वाढवणार नाही-** मिळालेल्या माहितीनुसार, भारताने काही दिवसापूर्वीच सूट मिळाल्यानंतर इराणकडून काही तेल खरेदी केले, परंतु ही खरेदी विहित मुदतीतच करण्यात आली होती. अमेरिकेनेही निर्बंधांमधील सूट वाढवणार नसल्याचे संकेत दिले आहेत. सोमवारी वाशिंग्टन आणि तेहरान यांच्यातील चर्चा अयशस्वी झाल्यानंतर अमेरिकेच्या नौदलानेही इराणच्या बंदरांची नाकेबंदी सुरू केली आहे.इराणी तेलवाहू जहाज 'डेर्या'ला खरेदीदार शोधण्यात अडचण येउ शकते. जागतिक जहाज वाहतूक डेटाबेसनुसार, या जहाजावर अमेरिकेने निर्बंध लादले आहेत आणि ते इराणच्या 'नॅशनल इराणी टँकर कंपनी'द्वारे चालवले जाते. केप्लरच्या 'मरीनट्रॅफिक' सेवेच्या डेटानुसार, बुधवार दुपारपर्यंत हे जहाज गुजरातजवळच होते. या जहाजमधील तेल खरेदी करण्यास भारतीय रिफयनरी कंपन्यांनी नकार दिला आहे. अमेरिकेने दिलेल्या सवलतीनंतर, इराणचे तेल घेउन जाणारे किमान दोन टँकर आणि एलपीजी घेउन जाणारा एक टँकर गेल्या काही दिवसांत भारतीय बंदरांवर दाखल झाले. जवळपास सात वर्षांनंतर इराणकडून भारताला झालेला हा अशा प्रकारचा पहिलाच उर्जा पुरवठा आहे.

# प्रशिक्षणावेळी हिंदू देवतांविषयी अपमानजनक टिप्पणी करायचे

**नाशिक/प्रतिनिधी :** आयटी क्षेत्रातील दिग्गज कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या नाशिक शाखेत धर्मांतराचा प्रयत्न आणि लैंगिक छळाच्या एका प्रकरणामुळे खळबळ उडाली आहे. कार्यालयात काम करणा-या अनेक अधिका-यांना अटक करण्यात आली असून, पोलीस एचआर मॅनेजरच्या शोधात आहेत. एक विशेष तपास पथक या प्रकरणाचा तपास करत आहे. केवळ कर्मचारीच नव्हे, तर वरिष्ठ एचआर मॅनेजर्सचाही समावेश असलेले एक संपूर्ण नेटवर्क उघडकीस आले आहे. आरोपींनी प्रशिक्षणादरम्यान हिंदू देवतांबद्दल अपमानजनक टिप्पणीही केली होती, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. आरोपी प्रशिक्षण पथकाचा भाग होते आणि त्यांच्याकडे नवीन कर्मचा-यांची संपूर्ण माहिती होती. ते आर्थिकदृष्ट्या दुर्बळ किंवा कौटुंबिक समस्या असलेल्यांना लक्ष्य करत होते. प्रशिक्षणादरम्यानही आरोपींनी हिंदू देवतांबद्दल अपमानकारक टिप्पणी केली होती असे समोर आले आहे. जेव्हा एखादा कर्मचारी नाराज व्हायचा, तेव्हा एचआर मॅनेजर निदा खान त्यांच्याशी संपर्क साधून हळूहळू त्यांचा विश्वास संपादन करायची. यानंतर, त्या कर्मचा-याला त्यांची जीवनशैली आणि पेहरावाच्या सवयी बदलण्यास सांगितले जायचे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींच्या निशाण्यावर असलेली ती कर्मचारी त्यांच्या प्रभावाखाली इतकी आली होती की, तिने घरातून हिंदू देवतांचे सर्व फोटो काढून टाकले, कुटुंबातील सदस्यांशी भांडण केले. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या काही आरोपींमध्ये शफी शेख, आसिफ अन्सारी, शाहरुख कुरेशी इत्यादींचा समावेश आहे. तपासादरम्यान, पोलिसांना एक व्हाट्सएप ग्रुप देखील सापडला, यामध्ये आरोपी त्यांच्या मिशनबाबत चर्चा करत होते. याशिवाय, लैंगिक छळ आणि धर्मांतरण प्रकरणात अटक केलेल्या आरोपींनी त्यांच्या बेकायदेशीर कृत्यांसाठी पैसे घेतले होते का, हे तपासण्यासाठी त्यांच्या बँक खात्यांची तपासणी केली जात असल्याची माहिती समोर आली आहे.



# जपानी मेंदूज्वराविरोधात महाराष्ट्र सतर्क; लसीकरण मोहिमेला वेग

**मुंबई/प्रतिनिधी :** जपानी मेंदूज्वरासारख्या संसर्गजन्य आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, लसीकरण आणि जनजागृती यावर विशेष भर दिला जात आहे. जपानी मेंदूज्वर आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासन सतर्क असून लसीकरण मोहिमेला वेग देण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. सार्वजनिक आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने काम करून या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. २०१५-१६ दरम्यान देशातील इतर राज्यांत जपानी मेंदूज्वरावरील लसीकरण मोहीम सुरू झाली होती. याच दरम्यान विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये जपानी मेंदूज्वराचे रुग्ण आढळले. मात्र, महाराष्ट्रात त्याची सुरुवात झाली नव्हती. ही बाब तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आली. त्यांनी त्यावेळी केंद्र सरकारला विशेष विनंती केली आणि जपानी मेंदूज्वर आजारांवरील लसीकरण मोहीमेला राज्यात सुरुवात केली. या प्रयत्नांमुळे आज रुग्णसंख्या जवळपास शून्यावर आली आहे.

**जपानी मेंदूज्वराची वैशिष्ट्ये आणि धोका-** महाराष्ट्रात जपानी मेंदूज्वर या आजाराबाबत आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून लसीकरण व नियंत्रण उपाययोजनांना गती देण्यात आली आहे. हा आजार प्रामुख्याने डासांद्वारे पसरतो आणि मेंदूवर परिणाम करून गंभीर गुंतागुंत, झटके तसेच मृत्यू होण्याची शक्यता निर्माण करतो. या आजाराचा मृत्यूदर जास्त असून वाचलेल्या रुग्णांमध्ये न्यूरोल?जिकल समस्या उद्भवू शकतात. राज्यात २०२१ ते मार्च २०२६ या कालावधीत रुग्णसंख्या तुलनेने कमी असली तरी काही जिल्ह्यांमध्ये काही प्रकरणे आढळली आहेत. २०२२ मध्ये २ रुग्ण, २०२३ मध्ये ५ रुग्ण, २०२४ मध्ये ५ रुग्ण व २ मृत्यू, २०२५ मध्ये ७ रुग्ण व १ मृत्यू नोंदविण्यात आले, तर २०२६ च्या मार्चपर्यंत एकही रुग्ण आढळलेला नाही. नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या विदर्भातील जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने रुग्ण आढळले आहेत.

**लसीकरण मोहिमेची प्रगती-** एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान लसीकरण मोहिमेत राज्याने लक्षणीय प्रगती केली आहे. पहिल्या डोसचे एकूण कव्हरेज ८९.२६ टक्के तर दुस-या डोसचे ७८.६८ टक्के आहे. धाराशिव (९९.५९ टक्के), लातूर (९७.८४ टक्के) आणि सोलापूर (९५ टक्के पेक्षा जास्त) जिल्ह्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मात्र रायगड ५५ टक्के पहिला डोस व ४८ टक्के दुसरा डोस, पुणे आणि पीसीएमसी भागात दुस-या डोसचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे दिसून आले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर टूर सर्किटला राज्यभरातून प्रतिसाद

## पर्यटन विभागाच्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद- पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून १३ व १४ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला ड?. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्किट सहलीचा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. या टूर सर्किटला राज्यभरातून प्रतिसाद मिळाला अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई यांनी दिली.पर्यटन मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, ही केवळ एक पर्यटन संकल्पना नसून, भारताच्या लोकशाहीचा पाया घालणा-या महामानवाच्या विचारांना अभिवादन आहे. त्यांच्या जीवनातील क्रांतिकारी कार्य, संघर्ष आणि आदर्श या परिपथाच्या माध्यमातून भावी पिढीपर्यंत पोहोचला. महाराष्ट्र पर्यटन विभागाने हाती घेतलेला हा उपक्रम, इतिहास, संस्कृती आणि सामाजिक परिवर्तन यांना जोडणारा प्रेरणादायी प्रवास होता. या परिपथामुळे अनुयायी, पर्यटकांना बाबासाहेबांच्या महत्त्वाच्या स्थळांना भेट देण्याची आणि त्यांच्या विचारसंपदेचा जवळून अनुभव घेण्याची संधी मिळाली. हा केवळ प्रवास नसून, समानता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या मूल्यांची अनुभूती होती.डॉ.बाबासाहेब आंबेडकर पर्यटन टूर सर्किट सहल मुंबई, नागपूर, नाशिक येथे आयोजित करण्यात आली. सोमवारी, १३ एप्रिल २०२६ रोजी टूर सर्किटचा शुभारंभ झाला. यावेळी पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, महाराष्ट्र पर्यटनाच्या युवा दूत नवेली देशमुख उपस्थित होत्या. मान्यवरांनी हिरवा झेंडा दाखवून टूर सर्किट उपक्रमाची सुरुवात केली.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रेरणादायी महान कार्य, त्यांचे जीवनचरित्र, विचार सगळ्या स्तरांतील पर्यटक तसेच नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा स्तुत्य उपक्रम महाराष्ट्र पर्यटन विभाग करते आहे, मात्र



युवकांनीही यात सहभाग घेउन हे काम यशस्वी केले, त्याबद्दल युवकांचे कौतुक अशी प्रतिक्रिया नवेली यांनी दिली.मुंबई, नाशिक आणि नागपूर येथे भेट देणारे पर्यटक तसेच अनुयायींसाठी हे टूर सर्किट निःशुल्क होती. दोन दिवसीय टूर सर्किटमध्ये प्रत्येक वयोगटातील पर्यटक, नागरिकांनी सहभाग घेतला होता. या टूर सर्किटमध्ये मुंबईतील दादरमधील चैत्यभूमी, राजगृह, प्रिटींग प्रेस, परळ येथील बी.आय.टी चाळ, वडाळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, फोर्ट येथील सिद्धार्थ महाविद्यालय या स्थळांचा समावेश होता. तर नाशिकमधील मुक्तीभूमी, त्रिरश्मी लेणी आणि काळाराम मंदिर ही स्थळे पाहण्यासाठी पर्यटक, अनुयायांनी गर्दी केली. तसेच नागपूर येथील दिक्षाभूमी, चिंचोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय, कामठी येथील ड्रॅगन पॅलेस आदी स्थळांना पर्यटकांनी भेट दिली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली स्थळे आणि त्यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास याची माहिती सहल मार्गदर्शकांनी पर्यटकांना दिली. पर्यटन विभागाच्या या उपक्रमाला पर्यटकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## पर्जन्यात घट

या वर्षी प्रशांत महासागरात 'अल निनो'ची स्थिती निर्माण होण्याची शक्यता असून यामुळे देशात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. याखेरीज जगभरातील हवामान अभ्यासकांच्या अंदाजांचे आकलन केले असता सर्वांचा सूर मान्सून कमी बरसणार असाच आहे. ही बाब काळजी वाढवणारी आहे. याचे कारण केवळ अर्थकारण नाही, तर प्रचंड मोठी लोकसंख्या हेही आहे. भारतीय हवामान विभागाकडून दरवर्षी सादर केल्या जाणाऱ्या मान्सून अंदाजांना कृषी, व्यापार, उद्योग, व्यवसाय, बँकिंग यांसह एकंदरीत अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. यातील प्रत्येक घटक भविष्यातील उद्दिष्टांची, धोरणांची आखणी करताना या अंदाजांचा आधार घेत असतो. भारतीय शेती पर्जन्याधारित असल्यामुळे पेरणी, काढणी, साठवणूक, ऋणव्यवस्था, कौटुंबिक निर्णय यांसह सर्वच बाबतीत अन्नदाता शेतकरी मान्सूनवरच अवलंबून असतो. उद्योग, व्यापारी, व्यावसायिक यांना मागणी, विस्तार, कर्जाऊ भांडवल यांसह अनेक निर्णय घेताना मान्सूनचे चित्र कसे आहे, हे पाहणे अनिवार्य ठरते. बँकिंग व्यवस्थेला कर्ज वाटप आणि थकिताची वसुली याअनुषंगाने पावसाळा कसा राहील, याचा विचार करावा लागतो. या अर्थाने मान्सून हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. गेल्या काही वर्षांमध्ये 'स्कायमेट' या खासगी हवामान संस्थेच्या मान्सून अंदाजांचा विचार राष्ट्रीय स्तरावर होत आहे. यंदा सुरुवातीलाच अल निनो सक्रिय होऊन मान्सूनचे प्रमाण कमी होण्याची शक्यता स्कायमेटने व्यक्त केली आहे. त्यापाठोपाठ भारतीय हवामान खात्यानेही पहिला दीर्घकालीन अंदाज व्यक्त केला असून त्यातूनही यंदा महाराष्ट्रासह देशाला पर्जन्यतुटीचा आणि पर्यायाने पाणीटंचाईचा सामना करावा लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. १४० कोटींहून अधिक लोकसंख्येला पिण्यासाठी आणि दैनंदिन गरजांसाठी मुबलक पाणी नाही, किमान पुरेशा प्रमाणात तरी ते मिळणे ही जगण्याची गरज आहे. यासाठी मान्सूनचा पाऊस समाधानकारक पडणे ही प्राथमिक आणि अनिवार्य अट आहे; पण 'स्कायमेट'ने सहा टक्के, तर 'आयएमडी'ने आठ टक्क्यांपर्यंत पावसाची घट होण्याचा अंदाज वर्तवल्याने चिंतेची लकेर उमटली आहे. आधीच आखातातील संघर्षामुळे खनिज तेल आणि गॅस टंचाईचा व भाववाढीचा सामना करावा लागल्याने आम आदमी कमालीचा त्रस्त झाला आहे. तशातच आता मान्सूनकडून असणाऱ्या अपेक्षांवरही पाणी फिरल्याने सर्वसामान्यांचे उरलेसुरले अवसानही गळून जाणार आहे. गेल्या १०० वर्षांतील बहुतांश भीषण दुष्काळ हे अल निनोच्या वर्षांतच पडले आहेत. २००२ मध्ये अल निनोमुळे पावसाचे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक घटल्यामुळे देशातील १३ राज्यांमध्ये भीषण दुष्काळ जाहीर करावा लागला होता. २०१५ मध्ये जलसाठ्यांनी तळ गाठल्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी लातूर भागाला रेल्वेने पाणीपुरवठा करण्याची वेळ आली होती. कोरोना काळात लॉकडाऊनमुळे हवेतील कार्बनचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटल्यामुळे हवामान बदलांची तीव्रता कमी झाली होती. २०२० ते २०२५ या पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने ला निना स्थिती विकसित होत गेल्यामुळे सबंध देशाने पावसाचा हाहाकार पाहिला. अल निनो सक्रिय झाला की, नेहमीच भारतात दुष्काळ पडतो असे नाही. काही वेळा इतर हवामान घटक त्याचा परिणाम कमी करू शकतात. उदाहरणार्थ, 'इंडियन ओशन डायपोल' (आयओडी) ही घटना मान्सूनला काही प्रमाणात बळकटी देऊ शकते. हिंदी महासागराचा पश्चिम भाग पूर्वेच्या तुलनेत अधिक उबदार होतो, तेव्हा त्याला 'सकारात्मक आयओडी' म्हणतात. यामुळे अरबी समुद्रात ढगांची निर्मिती होऊन भारताकडे बाष्पयुक्त वारे अधिक वेगाने वाहतात. १९९७ हे विसाव्या शतकातील सर्वात शक्तिशाली अल निनो वर्ष असूनही भारतात त्यावर्षी पाऊस सरासरीपेक्षा जास्त झाला होता. याचे कारण 'सकारात्मक आयओडी'ची निर्मिती हेच होते. २०१९ मध्ये अल निनोचे सावट असूनही सकारात्मक आयओडीमुळे भारतात ऑक्टोबरपर्यंत दमदार पाऊस झाला. गेल्या वर्षीही देशभरात समाधानकारक आणि काही भागात अतिपर्जन्यवृष्टी झाली. याचा परिणाम म्हणजे, एप्रिलच्या मध्यावर पोहोचूनही देशातील प्रमुख १६६ जलाशयांमध्ये सध्या एकूण क्षमतेच्या सुमारे ४४.७१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. महाराष्ट्रातील धरणांमध्ये साधारणपणे ४५ ते ५३ टक्क्यांदरम्यान पाणीसाठा आहे. पश्चिम महाराष्ट्रातील स्थिती तुलनेने स्थिर असली, तरी मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत ही पातळी ३० टक्क्यांच्या खाली गेली आहे. येणाऱ्या काळात तापमान वाढत जाणार असल्याने या पाण्याचे नियोजन आतापासूनच काटेकोर करणे गरजेचे आहे. शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार पावसाच्या कमतरतेचा सर्वाधिक फटका जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये बसू शकतो. हा काळ खरीप पिकांच्या वाढीसाठी महत्त्वाचा असतो. या काळात पावसाने ओढ दिल्यास भात शेतीला आणि सोयाबीन, मका पिकांच्या उत्पादनाला मोठा फटका बसू शकतो. उत्पादन घटल्यास अन्नधान्याच्या किमती गगनाला भिडण्याची शक्यता असून, याचा थेट परिणाम सामान्यांच्या खिशावर होईल. कमी पावसाच्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना कमी पाण्यात येणाऱ्या प्रगत पिकांकडे वळवण्यासाठी जागरूक करणे ही काळाची गरज आहे. पीक विविधीकरणासाठी अनुदान वाढवणे आणि शेतकऱ्यांना सुधारित बियाणे स्वस्त दरात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. बाजरी, ज्वारी, कडधान्ये आणि गळीत धान्ये यासारख्या कमी पाण्यात चांगले उत्पादन देणाऱ्या पिकांना प्राधान्य द्यावे लागेल. शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी थेट आर्थिक मदत, हमीभावाची खात्री आणि बियाण्यांची सुलभ उपलब्धता करून द्यावी लागेल. शेतकऱ्याला कमी पाण्याची पिकेही चांगले उत्पन्न मिळवून देतील, याची खात्री पटत नाही तोपर्यंत हा बदल शक्य नाही. तो जेवढ्या लवकर होईल, तेवढे ते देशाच्या जलसंपत्तीसाठी आणि कृषी अर्थव्यवस्थेसाठी हिताचे ठरेल. मनरेगासारख्या योजनांचा वापर करून गावागावांत तलाव, चेक डॅम आणि पर्जन्य जलसंचय संरचना निर्माण केल्यास सिंचन क्षमता वाढेल. अंतराळ संशोधनामध्ये विकसित देशांच्या पंक्तीत जाऊन बसणारा भारत पडणाऱ्या पावसापैकी केवळ २० ते ३० टक्के पाणीच साठवून ठेवतो. ही स्थिती बदलत नाही तोवर पर्जन्यटंचाईचा काळ आव्हानात्मकच राहणार आहे.

# ट्रम्प यांचा क्युबावर डोळा

**अमेरिकेने दोन महिन्यांपूवी व्हेनेझुएलावर हल्ला करून सत्ता उलथवून टाकली. यानंतर विक्षिप्त डोनाल्ड ट्रम्प यांनी क्युबाला इशारा दिला आहे. दुसऱ्या सार्वभौम देशावर हल्ला करून ताबा मिळवायचा आणि आपला हेतू सिद्ध करायचा, त्याच वेळी लोकशाहीचा पुरस्कार केल्याचे दाखवायचे, हा अमेरिकेचा पाखंडीपणा आहे.**



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची इराण आणि व्हेनेझुएलानंतर आता क्युबाच्या संदर्भात आक्रमक भूमिका पाहायला मिळते. प्रश्न असा आहे, की की क्युबावर लक्ष केंद्रित करण्यामागे नेमका उद्देश काय आहे आणि या सर्व प्रक्रियेत अमेरिका कोणाला शह देऊ पाहते? क्युबा हा देश भौगोलिकदृष्ट्या अमेरिकेच्या अगदी जवळ असला तरी राजकीयदृष्ट्या अनेक दशकांपासून अमेरिकेच्या विरोधात उभा राहिला. फिडेल कॅस्ट्रो यांच्या नेतृत्वाखालील क्रांतीनंतर क्युबाने समाजवादी मार्ग स्वीकारला आणि अमेरिकेचा वरचष्मा नाकारला. परिणामी, शीतयुद्धाच्या काळात क्युबा हा सोव्हिएत युनियनचा महत्त्वाचा सहयोगी बनला. ही ऐतिहासिक पार्श्वभूमी आजही अमेरिकेच्या धोरणांवर प्रभाव टाकताना दिसते. आजच्या घडीला क्युबा हा केवळ एक लहान देश नाही, तर अमेरिकेसाठी एक प्रतिकात्मक आणि रणनीतिक आव्हान आहे. लॅटिन अमेरिकेतील इतर देशांवर प्रभाव राखण्यासाठी क्युबामध्ये सत्तांतर घडवून आणणे हे अमेरिकेसाठी एक महत्त्वाचे साधन ठरू शकते. क्युबातील विद्यमान व्यवस्थेला कमकुवत करून अमेरिकेस अनुकूल सरकार आणल्यास हा देशच नव्हे, तर संपूर्ण लॅटिन अमेरिकेत अमेरिकेचा प्रभाव पुन्हा मजबूत होऊ शकतो. कदाचित म्हणूनच आता अमेरिकेचा क्युबावर डोळा आहे. याच संदर्भात व्हेनेझुएलाचा विचार केल्यास निकोलस मादुरो यांच्या सरकारविरोधात अमेरिकेने उघड भूमिका घेतली होती. आर्थिक निर्बंध, राजकीय दबाव आणि या देशाला आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी करण्याचे प्रयत्न हे त्याचे स्पष्ट उदाहरण आहे. त्याचप्रमाणे इराणवरही अमेरिकेने हल्ला केला. या सर्व कारवायांचा एकत्रित विचार केला, तर स्पष्ट होते, की अमेरिका अशा देशांना लक्ष्य करते आहे, जे तिच्या धोरणांशी विसंगत भूमिका घेतात; मात्र या सर्व प्रक्रियेच्या मागे केवळ प्रादेशिक राजकारण नाही, तर जागतिक शक्ती संतुलनाचाही मोठा भाग आहे. क्युबा हा रशिया आणि चीन या दोन्ही देशांसाठी एक महत्त्वाचा भागीदार ठरत आहे. त्यामुळे क्युबामध्ये अमेरिकेला अनुकूल सत्तांतर घडवून आणणे म्हणजे अप्रत्यक्षपणे रशिया आणि चीनच्या प्रभावाला मर्यादा घालणे होय.

अमेरिकेच्या दृष्टीने पाहता ही एक व्यापक रणनीती आहे. त्यात प्रतिस्पर्धी महासत्तांना त्यांच्या प्रभावक्षेत्रातून दूर ठेवणे आणि स्वतःचे वर्चस्व टिकवून ठेवणे हा उद्देश आहे. विशेषतः व्लादीमिर पुतीन आणि शी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखाली रशिया आणि चीन अधिक आक्रमक आणि आत्मविश्वासपूर्ण भूमिका घेताना दिसत आहेत. आजघडीला क्युबामध्ये सत्तांतर घडवून आणण्याचा अमेरिकेचा कोणताही प्रयत्न स्थानिक असंतोष, आंतरराष्ट्रीय टीका आणि प्रादेशिक अस्थिरता निर्माण करू शकतो. इतिहासाकडे पाहिले असता बाह्य हस्तक्षेपामुळे अनेकदा परिस्थिती जास्त बिघडलेली दिसते. क्युबावर लक्ष केंद्रित करणे हे केवळ एका देशाविरोधातील कारवाई नाही; तर ती एक व्यापक भू-राजकीय खेळ आहे. इराण, व्हेनेझुएला आणि आता क्युबा या सर्व घटनांमधून अमेरिकेची एकच भूमिका स्पष्ट होते, ती म्हणजे आपल्या जागतिक वर्चस्वाला आव्हान देणाऱ्या शक्तींना रोखणे आणि या प्रक्रियेत रशिया आणि चीन हे निश्चितच अप्रत्यक्षपणे अमेरिकेच्या निशाण्यावर आहेत. नवीन वर्षाच्या सुरुवातीला कॅरिबियन प्रदेशात मोठा तणाव निर्माण झाला आहे. ट्रम्प यांच्या आदेशानुसार, अमेरिकेच्या तिन्ही सशस्त्र दलांनी एकाच वेळी व्हेनेझुएलावर मोठा हल्ला चढवला. या अचानक आणि मोठ्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यास व्हेनेझुएला असमर्थ ठरला. या हल्ल्यानंतरची सर्वात धक्कादायक बातमी म्हणजे व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ताब्यात घेऊन अमेरिकेत नेण्यात आले. या घडामोडीमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भूकंप झाला. व्हेनेझुएलावरील या हल्ल्यानंतर क्युबा सर्वात मोठ्या धोक्याचा सामना करत आहे. खरे तर, ट्रम्प यांनी गेल्या वर्षभरात क्युबाला किमान दहा वेळा धमकी दिली. ट्रम्प यांनी पुन्हा एकदा तीच भावना व्यक्त केली. त्यांनी म्हटले आहे, की व्हेनेझुएलानंतर क्युबाचा नंबर लागू शकतो. क्युबाचे अध्यक्ष मिगुएल डियाझ कॅनेल यांनी देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करत असल्याचा दावा करत या धमक्यांना प्रत्त्युत्तर दिले. ट्रम्प यांचे हे वक्तव्य अशा वेळी आले, जेव्हा क्युबा गंभीर आर्थिक संकटाशी झुंज देत आहे.

व्हेनेझुएलाकडून होणारा तेलपुरवठा थांबल्याने येथे इंधनाची तीव्र टंचाई निर्माण झाली. मादुरो यांच्या अटकेनंतर क्युबाचा प्रमुख ऊर्जा पुरवठा पूर्णपणे खंडित झाला. अमेरिकेचे क्युबासोबतचे वैर सुमारे ६७वर्षे जुने आहे. १९५९ मध्ये कॅस्ट्रोने क्युबामध्ये क्रांती घडवून सत्ता काबीज केली, तेव्हा अमेरिकन कंपन्यांकडून जमिनी आणि कारखाने जप्त केले आणि सोव्हिएत युनियनशी युती केली. मात्र अमेरिका डगमगली नाही. तिने क्युबावर आर्थिक नाकेबंदी लादली. अमेरिकेने अनेक वेळा कॅस्ट्रो यांच्या हत्येचे प्रयत्न केले; पण ते अयशस्वी ठरले. १९६२ मध्ये क्युबन क्षेपणास्त्र संकट उद्भवले. रशियाने क्युबामध्ये अण्वस्त्रे तैनात केली. त्यामुळे जग अणुयुद्धाच्या उंबरठ्यावर आले. तेव्हापासून अमेरिका क्युबाला साम्यवादी धोका मानत आहे.

ट्रम्प यांचा आरोप आहे, की क्युबाचे संबंध नेहमीच रशिया, चीन आणि इराणशी राहिले असून हा देश दहशतवाद्यांना पाठिंबा देत आहे. यामुळेच ट्रम्प वारंवार क्युबावर हल्ला करण्याची धमकी देतात. २९ जानेवारी रोजी ट्रम्प यांनी क्युबा हा अमेरिकेसाठी धोका असल्याचे वर्णन करत क्युबासंबंधी एका कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली. व्हेनेझुएला क्युबाला ऊर्जा पुरवत होता. अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या कारवाईपासून क्युबा ऊर्जासंकटाचा सामना करत असून १६ मार्च रोजी वीजपुरवठा खंडित झाला. गेल्या चार महिन्यांमध्ये तीन प्रमुख वीज प्रकल्पांमध्ये हे संकट गडद झाले. व्हेनेझुएलाकडून मिळणाऱ्या तेल पुरवठ्यात ३० टक्के घट झाल्यामुळे क्युबा या संकटाचा सामना करत आहे. क्युबाची अर्थव्यवस्था सुमारे १५ टक्क्यांनी घसरली आहे. इंधन संकटाचा परिणाम वाहतूक आणि उद्योगावर होत आहे. क्युवा बऱ्याच काळापासून तेलाच्या बदल्यात डॉक्टर आणि वैद्यकीय मदत पाठवत आला आहे; परंतु आता हे संतुलन बिघडले आहे. व्हेनेझुएलावरील हल्ला आणि क्युबाबाबतच्या त्याच्या आक्रमक भूमिकेमुळे संपूर्ण लॅटिन अमेरिकेत अस्थिरता वाढली आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाला ताजा तणाव एका मोठ्या लष्करी संघर्षात बदलू शकतो, अशी चिंता वाटत आहे. व्हेनेझुएलानंतर क्युबाविरुद्ध संभाव्य कारवाईच्या संकेतांनी जागतिक राजकारणात नवीन तणाव निर्माण केला आहे. येत्या काही दिवसांमध्ये अमेरिकेची रणनीती आणि क्युबाची प्रतिक्रिया या संकटाची दिशा ठरवेल.

**प्रा. जयसिंग यादव**

# प्रधानमंत्री मातृ वंदना योजना

**माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने गर्भवती महिला व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करून त्यांचा आरोग्यात सुधारणा व्हावी या महत्त्वपूर्ण उद्देशाने देशात पर्यायाने राज्यात प्रधानमंत्री मातृ वंदना योजना सुरू केली. या हितकारी योजनेबद्दल ही माहिती..**

भारतासारख्या विशाल आणि वैविध्यपूर्ण देशात मातृ आरोग्य हे नेहमीच एक मोठे आव्हान राहिले आहे. गरोदरपणात आणि बाळंतपणात लाखो महिलांना आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागतो. कुपोषण, रक्तक्षय, योग्य आरोग्य तपासणीचा अभाव, संस्थात्मक प्रसूतीचा अभाव आणि सामाजिक-आर्थिक कारणे यामुळे माता आणि अर्भक मृत्यूचे प्रमाण दीर्घ काळापासून चिंताजनक आहे. या समस्या लक्षात घेऊन भारत सरकारने १ जानेवारी २०१७ रोजी 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना' (पीएमएमव्हीवाय) सुरू केली. ही योजना महिलांना केवळ आर्थिक सहाय्यच देत नाही तर मातृत्वाचे महत्त्वही ओळखते.

योजनेची पार्श्वभूमी-मातृत्व लाभाची संकल्पना भारतात नवीन नाही. घटनेच्या कलम ४२ मध्ये सरकारला प्रसूती दिलासा सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार २०१३ मध्ये काही निवडक जिल्ह्यांमध्ये 'इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना' सुरू करण्यात आली. नंतर अनुभवांच्या आधारे या योजनेचा विस्तार संपूर्ण देशात करण्यात आला आणि प्रधानमंत्री मातृ वंदना योजना म्हणून लागू करण्यात आली.

योजनेचा उद्देश-प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेची मुख्य उद्दिष्टे आहेत: १. गर्भवती आणि स्तनदा महिलांच्या पोषण स्थितीत सुधारणा. २. जन्मपूर्व आणि प्रसवोत्तर काळजी सुनिश्चित करणे. ३. संस्थात्मक प्रसूतीला प्रोत्साहन देणे आणि घरपोच प्रसूतीचा धोका कमी करणे. ४. नवजात आणि माता मृत्यू दर (आयएमआर आणि एमएमआर) दोन्ही कमी करणे. ५. महिलांना आरोग्य तपासणी आणि लसीकरणाबाबत जागरूक करणे. ६. मातृत्वाला सामाजिक मान देणे.

पात्रता आणि लाभार्थी- पहिल्या जीवित बाळापर्यंतच्या गरोदर महिला आणि स्तनदा माता या योजनेंतर्गत लाभ घेऊ शकतात. सरकारी आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये काम करणाऱ्या महिलांना हा लाभ दिला जात नाही कारण त्या आधीच पगारी प्रसूती रजेसाठी पात्र आहेत. आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास पार्श्वभूमी असलेल्या महिलांनाही या योजनेचा लाभ घेता येईल.

आर्थिक मदत-या योजनेत महिलांना एकूण रु. ५,००० ची आर्थिक मदत दिली जाते. पहिला हप्ता - रु. १,००० गर्भधारणेच्या वेळी नोंदणी केल्यावर. दुसरा हप्ता - रु. २,००० कमीतकमी एक जन्मपूर्व तपासणी (एएनसी) नंतर. तिसरा हप्ता - २,००० रुपये, अर्भकाची जन्म नोंदणी आणि प्रथम लसीकरण (बीसीजी, ओपीव्ही, डीपीटी/डीपीटी/डीपीटी) हिपॅटायटीस बी) नंतर. याव्यतिरिक्त, जननी सुरक्षा योजना (जेएसवाय) संस्थात्मक प्रसूतीवर स्वतंत्र प्रोत्साहन देते.

अर्ज करण्याची प्रक्रिया- लाभार्थी महिलांना योजनेत सामील होण्यासाठी खालील प्रक्रिया पाळावी लागेल: १. नोंदणी - जवळच्या अंगणवाडी केंद्र किंवा आरोग्य केंद्रात. २. आवश्यक कागदपत्रे -आधार कार्ड, बँक खात्याचे पासबुक, गर्भधारणा नोंदणी प्रमाणपत्र, ओळखपत्र आणि निवास प्रमाणपत्र ३. ऑनलाइन पोर्टल - महिला आणि बाल विकास मंत्रालयाद्वारे संचालित पीएमएमव्हीवाय-सीएएस (कॉमन ॲप्लिकेशन सॉफ्ट वेअर) द्वारे. ४. डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (डीबीटी) - नफा थेट बँक खात्यात पाठविला जातो. योजनेची अंमलबजावणी नोडल मंत्रालय: महिला आणि बाल विकास मंत्रालय तळागाळातील जबाबदाऱ्या: अंगणवाडी सेविका, आशा सेविका आणि आरोग्य विभाग. देखरेख प्रणाली : जिल्हा व राज्य पातळीवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. डिजिटल पारदर्शकता: सर्व देयके पीएफएमएस (सार्वजनिक वित्त) आहेत. योजनेची कामगिरी-१. लाभार्थ्यांची संख्या : आतापर्यंत लाखो महिलांना याचा लाभ झाला आहे. २. संस्थात्मक प्रसूतींमध्ये वाढ : सरकारी रुग्णालयांमध्ये आता अधिक महिला प्रसूती करत आहेत. ३. पौष्टिक पातळीत सुधारणा : गर्भवती महिलांनी पौष्टिक आहार आणि औषधांवर रक्कम खर्च केली. ४. सामाजिक जागृती : मातृत्वाला कुटुंबात आणि समाजात एक नवी ओळख मिळाली आहे.

भविष्यातील दिशा-प्रधानमंत्री मातृ वंदना योजना केवळ आर्थिक मदतीपुरती मर्यादित न ठेवता सर्वसमावेशक मातृत्व पोषण अभियान बनवता येऊ शकते. यात समाविष्ट आहे- दुसऱ्या आणि तिसऱ्या अपत्यासाठी लाभाचा विस्तार. आरोग्य विमा आणि पोषण किटशी दुवा साधणे. खासगी रुग्णालयांना त्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे. डिजिटल प्लॅटफॉर्मवर सुलभ नोंदणीची सुविधा ग्रामीण महिलांसाठी विशेष जनजागृती मोहीम. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना हे भारतात मातृत्वाला आदर आणि संरक्षण देण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल आहे. या योजनेमुळे गरोदर महिलांना आर्थिक सहाय्य तर मिळालेच आहे, पण समाजात मातृत्वाची प्रतिष्ठाही वाढली आहे. आव्हाने आहेत, मात्र जर ती दूर झाली तर ही योजना नव्या भारताच्या निरोगी भविष्याचा आधार ठरेल.

**अनिल आलुरकर**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
अमरावती.

# नव्या भारताचा नवा संकल्प: नारी शक्ती वंदन अधिनियम

भारताच्या २१ व्या शतकातील प्रवासात महिलांचे योगदान 'चूल आणि मूलं' पुरते मर्यादित नसून महिला पुरुषांच्या खांद्याला खांदे लावून प्रत्येक क्षेत्रामध्ये अग्रेसर भूमिका निभावत आहेत. त्यामुळेच ते राष्ट्रनिर्मितीचे मुख्य केंद्र बनले आहे. सध्या संपूर्ण देशाचे लक्ष आज १६ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या बजेट सत्राच्या विशेष सत्राकडे लागले आहे. पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांनी घोषित केल्याप्रमाणे 'नारी शक्ती वंदन' अधिनियम या विशेष अधिवेशनात मांडला जाणार असून, त्यानिमित्ताने त्यांनी देशाला संबोधित करताना विज्ञान भवनात पार पडलेल्या 'नारी शक्ती वंदन' कार्यक्रमात या ऐतिहासिक निर्णयाचे विस्तृत वर्णन केले. त्यांनी 'भारत अशा एका निर्णयाच्या उंबरठ्यावर असून जो खऱ्या अर्थाने 'नारी शक्ती'ला समर्पित असेल.' असे सांगून हा अधिनियम केवळ एक कायदा नसून महिलांना लोकशाहीच्या सर्वोच्च सभागृहात संसद आणि विधानसभांमध्ये त्यांचे हक्काचे स्थान मिळवून देणारा एक घटनात्मक मार्ग असल्याचे सांगितले. या कायद्यांतर्गत लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित केल्या जाणार आहेत, ज्यामुळे संसदेत महिला खासदारांची संख्या लक्षणीयरीत्या वाढेल.

महाराष्ट्रासारख्या राज्याने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आधी ३३ आणि नंतर ५०% प्रतिनिधित्व देऊन एक आदर्श घालून दिला आहे. आता थेट विधानसभा व संसदेतही महिलांना निश्चित स्थान मिळणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला नेतृत्वाचे महत्त्व पंतप्रधानांनी अधोरेखित करतांना सांगितले की आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १४ लाखांहून अधिक महिला यशस्वीपणे जनसेवेची धुरा सांभाळत असून जवळपास २१ राज्यांमध्ये हा सहभाग ५० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. वर्षानुवर्षे कार्यरत असलेल्या या लाखो महिलांकडे नेतृत्वाचा दांडगा अनुभव असून त्या भविष्यातील मोठ्या भूमिकांसाठी सज्ज आहेत. महिलांच्या सहभागामुळे पाणी, शिक्षण, आरोग्य आणि पोषण यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर अधिक संवेदनशीलतेने काम झाले आहे, त्यामुळेच संसदेतील जास्तीत जास्त महिलांच्या सहभागामुळे लोकशाही अधिक बळकट आणि कार्यक्षम होईल. म्हणूनच, हा कायदा 'पंचायतीपासून संसदेपर्यंतचा प्रवास' अधिक सुखकर करणारा ठरेल. मोदीजीं च्या मते, याचा उद्देश केवळ राजकीय आरक्षण देणे नसून 'सामाजिक न्याय' प्रस्थापित करणे आणि महिलांना केवळ मतदार म्हणून नव्हे, तर 'निर्णयकर्त्या' म्हणून समोर आणणे हा आहे. स्वातंत्र्यसंग्रामापासून ते संविधान सभेपर्यंत महिलांच्या योगदानाचा उल्लेख करत पंतप्रधानांनी स्वतंत्र भारताचा पाया रचण्यात नारी शक्तीच्या महत्वाच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. ज्या महिलांना प्रतिनिधित्वाची संधी मिळाली त्यांनी राष्ट्रासाठी उत्कृष्ट कार्य केले आहे. २०१४ पासून सरकारने 'नारी तू नारायणी' या संकल्पासह 'बेटी बचाओ-बेटी पढाओ', 'सुकन्या समृद्धी' आणि 'मातृ वंदन' यांसारख्या योजनांद्वारे महिलांना मोठा आधार दिला आहे. २०१४ मध्ये कोट्यवधी ज्या महिलांनी कधी बँकेचा दरवाजाही पाहिला नव्हता. त्यांच्यासाठी ३२ कोटींहून अधिक जन धन खाती, मुद्रा योजनेतील ६० टक्के कर्जवाटप, उज्वला गॅस कनेक्शन, स्वच्छ भारत अंतर्गत ११ कोटी शौचालये आणि जल जीवन मिशनद्वारे घराघरात नळाचे पाणी पोहोचवून सरकारने महिलांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. इतकेच नव्हे तर, सैनिकी शाळा आणि एनडीएचे दरवाजे मुलींसाठी उघडून संरक्षण क्षेत्रातही मुलींना पहिल्यांदा संधी उपलब्ध करून दिली. महिलांच्या सुरक्षिततेसाठी 'भारतीय न्याय संहिते'त करण्यात आलेल्या सुधारणांमुळे कोणत्याही ठिकाणाहून ई-एफआयआर किंवा झिरो-एफआयआर नोंदविण्याच्या सुविधेमुळे आणि पीडितांचे जबाब ऑडिओ-व्हिडिओ माध्यमाद्वारे रेकॉर्ड करण्याची तरतूद करण्यात आल्यामुळे महिलांना अधिक संरक्षण प्राप्त झाले आहे. २०२३ मध्ये नवीन संसद भवनात हा अधिनियम सर्वसंमतीने मंजूर झाला होता आणि २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुका पासून त्याची पूर्ण अंमलबजावणी करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. २०२९ च्या लोकसभा आणि विविध राज्यांतील विधानसभा निवडणुका महिला आरक्षणासह होणार, हे तर सरकारच्या तयारीमुळे निश्चितच वाटत आहे. आगामी संसद सत्रात खासदारांची संख्या परिसीमनानंतर वाढणारी संभाव्य संख्या ८१६ करण्याच्या तरतुदीकडेही सर्वांचे लक्ष असून, या संविधान दुरुस्तीमुळे देशातील ५० टक्के असलेल्या लोकसंख्येला त्यांचा निश्चित हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी 'महिलांच्या नेतृत्वाखालील विकास' हाच मुख्य कणा ठरणार आहे.

संसदेत या अधिनियमावर सरकार तर्फे चर्चेची जोरदार तयारी दिसून येत आहे. प्रत्येक महिला आपल्या शक्तीबद्दल जागरूक व्हावी त्यासाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून गावागावात प्रत्येक महिलेपर्यंत या अधिनियमाची चर्चा पोहोचवावी असे आवाहन सुद्धा पंतप्रधानांनी देशातील महिलांना केले आहे. सोबतच हा कोणत्याही एका पक्षाचा विजय नसून संपूर्ण देशाच्या नारी शक्तीचा सन्मान असल्याचे सांगून राजकारणाच्या पलीकडे जाऊन सर्व पक्षांनी या ऐतिहासिक बदलाला पाठिंबा देण्याचे आवाहन सुद्धा सर्व राजकीय पक्षांना केले आहे. येणाऱ्या काळात या अधिनियमाच्या अंमलब जावणीतून जे क्रांतिकारी बदल घडतील, ते पाहणे औत्सुक्याचे ठरेल. या ऐतिहासिक निर्णयाची फलश्रुती संपूर्ण देशाला नवी दिशा देणारी असून, या 'नारी शक्ती'च्या उत्थानामुळे आपला देश एका नव्या उत्सवाला सामोरे जाईल, असा विश्वास नक्कीच वाटतो. हा उत्सव केवळ राजकीय नसून तो नव्या भारताच्या सामर्थ्याचा आणि आत्मसन्मानाचा असेल.

**वैभव बावनकर,**
नागपूर
मो.९५४५७४५५८०

# यवतमाळ जिल्ह्यात 816 अन्न प्रक्रिया उद्योगांची उभारणी

## पीएमएफएमई योजनेतून प्रकल्पांना बळ, उद्योगांना शासनाचे 35 टक्के अनुदान, महिलांच्या सक्षमीकरणाला गती



थोडक्यात आढावा (२०२०-२१ ते २०२५-२६): एकूण प्रकल्प संख्या:८१६ एकूण गुंतवणूक (मूल्य): ₹२७४५ लाख वितरित अनुदान: ₹१०५२ लाख निर्माण झालेला रोजगार : १९७२ गेल्या पाच वर्षांतील ही आकडेवारी स्पष्ट करते की, यवतमाळ जिल्हा आता 'प्रक्रिया उद्योगांचे केंद्र' म्हणून नावारूपास येत आहे. मसाला आणि गहू प्रक्रिया उद्योगांमधील भरघोस वाढ जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा देणारी ठरणारी आहे. "पीएमएफएमई योजनेच्या माध्यमातून आम्ही प्रत्येक लाभार्थ्याला तांत्रिक प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाचा भक्कम आधार देत आहोत. जिल्ह्यातील अन्न प्रक्रिया उद्योग उभारणी आणि रोजगार निर्मिती हे सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे." **– जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे**

"पीएमएफएमई योजना ही जिल्ह्याच्या आर्थिक परिवर्तनाचे साधन बनत आहे. यवतमाळमधील ८१६ प्रकल्पांनी हे सिद्ध केले आहे की, येथील तरुण आणि महिला वर्ग आता नोकरी शोधण्याऐवजी नोकरी देणारे बनत आहेत. जिल्ह्याला 'अन्न प्रक्रिया हब' बनवण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे." **– जिल्हाधिकारी विकास मीना**

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - जिल्ह्यात कृषी आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी 'प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग' (पीएमएफएमई) योजना 'गेम चेंजर' ठरत आहे. सन २०२०-२१ ते २०२५-२६ या पाच वर्षांच्या कालावधीत जिल्ह्याने या योजनेत उल्लेखनिय प्रगती केली असून, आतापर्यंत ८१६ प्रकल्पांची यशस्वी उभारणी झाली आहे. विशेष म्हणजे, या उद्योगांच्या माध्यमातून जिल्ह्यात १९७२ नवीन रोजगार निर्माण झाले आहेत. या योजनेच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणाला गती दिली जात आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे एकूण मूल्य २७४५ लाख रुपयांवर पोहोचले आहे. यामध्ये शासनाने खंबीर साथ देत आतापर्यंत १०५२ लाख रुपयांचे अनुदान थेट लाभार्थ्यांना देण्यात आले आहे. यामुळे ग्रामीण भागातील लघुउद्योजकांना हक्काचे भांडवल उपलब्ध झाले असून त्यांच्या आर्थिक सक्षमतेला शासनाचा आधार मिळाला आहे.

जिल्ह्यातील उद्योगांचे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, स्थानिक उपलब्ध कच्च्या मालावर आधारित प्रक्रिया उद्योगांकडे युवकांचा आणि महिलांचा कल अधिक आहे. त्यामध्ये सर्वाधिक ४५८ मसाला उद्योग प्रकल्प कार्यान्वित असून त्यातून ९२३ जणांना रोजगार मिळाला आहे. ११५ गहू प्रक्रिया प्रकल्पांच्या माध्यमातून १८५ जणांच्या हाताला काम मिळाले आहे. जिल्ह्यात कडधान्यावर आधारित १०६ उद्योगातून २२६ जणांना रोजगार मिळाला आहे. ३६ दुग्ध प्रक्रिया उद्योग प्रकल्प यशस्वीपणे सुरू असून ९४ जणांना रोजगार मिळाला आहे. आरोग्यदायी संकल्पनेवर आधारित २५ तेलघाणा प्रकल्पांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण त्यातून ६२ जणांना तर ७६ इतर उद्योगातून ४८२ जणांना रोजगार प्राप्त झाला आहे. पीएमएफएमई योजनेचा मुख्य उद्देश ही सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना तांत्रिक आणि वित्तीय बळ देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हा आहे. यवतमाळ जिल्ह्याच्या शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागात या योजनेमुळे स्वयंरोजगाराचे मोठे जाळे विणले जात आहे.

# नेरमध्ये जयंती मिरवणुकीत अल्पवयीन मुलाचा खून

## जुन्या वादाचा सूड, हिंसक प्रवृत्तीवर गंभीर प्रश्न




**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - जिल्ह्यातील नेर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या उत्सवी वातावरणात घडलेली अल्पवयीन मुलाची निर्घृण हत्या ही केवळ एक गुन्हेगारी घटना नसून समाजातील वाढत्या सूडभावना आणि हिंसक प्रवृत्तीचे भयावह चित्र समोर आणणारी आहे. मिरवणुकीतील किरकोळ धक्काबुक्की हे केवळ निमित्त ठरले असून, जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी आरोपीने नियोजनपूर्वक हल्ला केल्याचा संशय बळावला आहे.

या प्रकरणात विधी संघर्ष बालकाचा सहभाग असल्याने त्याचे नाव गोपनीय ठेवण्यात आले आहे. घटनेदरम्यान आरोपीने संतापाच्या भरात धारदार शस्त्राने १६ वर्षीय मुलावर जीवघेणा वार केला. गंभीर जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेने गावासह संपूर्ण परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही घटना अधिक धक्कादायक यासाठी आहे की, लहान वयातील मुलांमध्येही सूड, द्वेष आणि हिंसक मानसिकता वाढताना दिसत आहे. ग्रामीण भाग, जो पारंपरिकदृष्ट्या शांत आणि सुसंवादी मानला जातो, तिथे अशा प्रकारचे गुन्हे घडणे ही चिंतनाची गंभीर बाब ठरत आहे. केवळ कायदेशीर कारवाई पुरेशी नाही, तर सामाजिक आणि मानसिक पातळीवर हस्तक्षेपाची गरज अधोरेखित होते. पोलीस प्रशासनाने अशा संवेदनशील घटनांकडे केवळ गुन्हा म्हणून न पाहता प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. गावपातळीवर व्यसनमुक्ती अभियान, युवकांसाठी समुपदेशन, तसेच शाळा-स्तरावर नैतिक मूल्यांचे शिक्षण यांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. युवकांना सकारात्मक दिशेने वळवण्यासाठी क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम वाढविणेही तितकेच महत्त्वाचे ठरेल. ही घटना समाजाला जागे करणारी आहे. आजच ठोस पावले उचलली नाहीत तर उद्या अशा घटना आणखी भीषण रूप धारण करू शकतात. पुढील तपास पोलीस स्टेशन नेरचे ठाणेदार अनिल बेहरानी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाश आडे पोलीस उपनिरीक्षक करीत आहे.

# डॉ. विनोदकुमार आदे यांना माळी समाज भूषण पुरस्कार २०२६ प्रदान

**जनमाध्यम प्रतिनिधी**



वणी - क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त माळी समाज संघटना वणी च्या वतीने प्रतिष्ठित 'माळी समाज भूषण पुरस्कार' साहित्यिक, संपादक आणि कलावंत डॉ. विनोदकुमार आदे यांना प्रदान करण्यात आला.

त्यांच्या साहित्य आणि कला क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल हा सन्मान देण्यात आला असून, समाजाकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.मंचावर आमदार संजय देरकर,माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार, काँगेस नेते संजय खाडे, नगराध्यक्षा विद्याताई आत्राम, माजी नगराध्यक्ष सुरेश रायपुरे,काँग्रेस नेते प्रमोद निकुरे, माजी सभापती संजय पिंपरशेंडे, संस्थेचे अध्यक्ष प्रवीण निकुरे यांसह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याचे अनावरण,समाज प्रबोधन पार पडला. डॉ.विनोदकुमार आदे यांना यापूर्वी नागपूर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्य छत्रिय कोसळे माळी समाज (विदर्भ)नागपूर संस्थेच्या वतीने त्यांना माळी समाज भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. दुसऱ्यांदा त्यांच्या कर्मभूमीत (वणी) समाजातून पुरस्कार मिळाल्याने हा त्यांचा निस्वार्थ कार्य,कठोर परिश्रम आणि योगदानाची सामाजिक पोचपावती आहे.

# • वेचक



## भाग्यश्री खानोदे ठरली 'यवतमाळ आयडॉल'ची मानकरी

यवतमाळ - शहरातील 'समता पर्व-2026' अंतर्गत आयोजित 'यवतमाळ आयडॉल' या भव्य संगीत स्पर्धेचा सुरेल समारोप सोमवारी (दि. 13) उत्साहात पार पडला. नवोदित गायकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या स्पर्धेत भाग्यश्री पूर्णाजी खानोदे हिने आपल्या सुमधुर आवाजाने आणि प्रभावी सादरीकरणाने प्रथम क्रमांक पटकावत मानकरी ठरली. संभाजीनगर येथील प्रेम परमेश्वर तेलंग याने द्वितीय, तर यवतमाळच्या स्वरांगिनी कुडमेथे हिने तृतीय क्रमांक मिळविला. सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाची निर्मिती झाली असून, गेल्या २२ वर्षांपासून सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या 'समता पर्वा'ने यंदा संगीत क्षेत्रातही नवे चैतन्य निर्माण केले. दि. 9 ते 13 एप्रिलदरम्यान झालेल्या या स्पर्धेत ग्रामीण व शहरी भागातील अनेक स्पर्धकांनी दर्जेदार सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली. विशाखा खोब्रागडे, लावण्या वखरे, शुभम वीरुटकर, पवन नागपुरे व अंश फुलमाळी यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. परीक्षक म्हणून धीरेंद्र गावंडे व शीला गायकवाड यांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचे संचालन काजल तायडे यांनी केले, तर संयोजनाची धुरा इंजि. धर्मपाल भितकर यांनी सांभाळली. या स्पर्धेच्या यशासाठी नारायण थूल, सुमेध देवतळे, डॉ. विलास कनाके, प्रा. अंकुश वाकडे आदींसह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे जिल्ह्याच्या सांस्कृतिक वैभवात भर पडली असून, येथील गायक भविष्यात मोठ्या स्तरावर झळकतील, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.



## लहुजी शक्ती सेनेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी!

पुसद - आज पुसद येथे साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्या जवळ प्रभाग क्रमांक 13 च्या नगरसेविका सौ.सविता विशाल घाटे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती निमित्त बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मानवंदना देऊन जयंती साजरी करण्यात आली सदर कार्यक्रमांमध्ये प्रमुख उपस्थिती विशाल घाटे दर्शन जोगदंडे जिल्हा कोर कमिटी जिल्हा अध्यक्ष लहुजी शक्ती सेना, मनोज गजभार युवा जिल्हा संघटक लहुजी शक्ती सेना, राहुल हिवाळे तालुका कार्याध्यक्ष लहुजी शक्ती सेना, संतोष वाघमारे माजी जिल्हा सचिव लहुजी शक्ती सेना, रवि नेटके, अमोल जोगदंडे, पवन गायकवाड, मनोज भिसे, अजय झोडगे, निखिल दशरथे,विशाल साठे, दीपक कदम, सुभाष दोडके, मंगल दोडके, दिलीप सरोदे, अमर एडके, विशाल वाघमारे, प्रवीण तायडे, तसेच असंख्य कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

## नगरसेवक अमोल तिवरंगकर यांच्याकडून अपंगाला तीनचाकी सायकल भेट

उमरखेड : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध कार्यक्रमांचा उत्साह पाहायला मिळत असतानाच, मानवतेचा संदेश देणारा एक प्रेरणादायी उपक्रमही राबविण्यात आला. नगरपरिषदेचे नगरसेवक अमोल तिवरंगकर यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत एका अपंग व्यक्तीस तीन चाकी सायकल भेट देऊन सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. १४ एप्रिल रोजी साजऱ्या झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याच पार्श्वभूमीवर अमोल तिवरंगकर यांनी वाढदिवस साधेपणाने साजरा करत, गरजूंना मदत करण्याचा आदर्श पुढे ठेवला. या उपक्रमांतर्गत त्यांनी एका अपंग व्यक्तीस तीन चाकी सायकल भेट दिली. या सायकलीमुळे संबंधित व्यक्तीस स्वावलंबी जीवन जगण्यास मोठी मदत होणार असून, त्याच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद उपस्थितांसाठी भावूक करणारा ठरला.

# साखरा जवळ भीषण अपघात

## सहा महिन्याच्या मुलीसह वडिल जागीच ठार तर महिला गंभीर जखमी





**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी - तालुक्यातील साखरा (खु.) येथे दि 14/04 /26 रोजी रात्री सुमारे 8.00वाजताच्या दरम्यान पांढकवडा रोडवर एका शिफ्ट डिझायरने बोरवेलच्या ट्रकला जबर धडक दिल्याने एका सहा महिन्याच्या मुलीसह तिच्या वडिलांचा जागीच मृत्यू झाला असून एक महिला म्हणजे त्या गोंडस बाळांची आई गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

सविस्तर वृत्त असे कि,तालुक्यातील साखरा येथे काल भिम जयंती उत्सवाच्या निमित्ताने आदिलाबाद येथील पाहुणे साईकिरण गोडगुल्ला हे सिद्धार्थ रामटेके यांच्याकडे आले होते. भिम जयंतीचा उत्सव चालू असतांना आदिलाबाद येथील पाहुणे साईकिरण गोडगुल्ला परत आपल्या गावी जाण्यासाठी आपल्या परिवारासह निघाले असता गावालगत असलेल्याआश्रम शाळेजवळ,पांढरकवडा रोडच्या वळणावर गाडी नंबर,TG 03,B 7524असलेल्या स्विफ्ट डिझायरच्या ड्रायवरचे (मालकांचा )संतुलन बिघडल्याने पांढरकवडा कडून येणाऱ्या गाडी नंबर KA 01,MG3987 असलेल्या बोअर वेलच्या ट्रकला इतकी जबरदस्त धडक दिली कि त्यातील सहा महिन्याची मुलगी हंशिका गोडगुल्ला आणि तिचे वडिल साईकिरण गोडगुल्ला वय अंदाजे 30 वर्ष यांचा जागीच मृत्यू झाला असून मुलीची आई अनुष्का साई गोडगुल्ला वय अंदाजे 25 वर्ष ही गंभीर जखमी झाली सून तिची प्रकृती अत्यंत गंभीर आहे.भीषण अपघात झाल्याचे समजताच गावाकऱ्यांनी अपघातस्थळी धाव घेतला आणि लगेच ऍम्ब्युलन्स बोलावून तिघांनाही घाटंजी येथील ग्रामीण रुग्णालय येथे पाठविण्यात आले. रुग्णालयात डॉक्टरानी सहा महिन्याच्या मुलीसह तिच्या वडिलांना मृत घोषित केले तर गंभीर जखमी असलेल्या मुलीच्या आईला प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे पाठविण्यात आले. सदर महिलेची प्रकृती गंभीर असून तीचीसुद्धा वाचन्याची शक्यता कमी असल्याची चर्चा परिसरात होत आहे. त्यामुळे परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. साखरा परिसरात सततच्या होणाऱ्या अपघाताने गावातील नागरिकात आणि प्रवाशात भीतीचे वातावरण असून गावातील अपूर्ण असलेल्या रस्त्याचे रुंदीकरण कधी होतील असा सवाल आता गावाकऱ्यांना पडला आहे.

साखरा परिसरात सतत होणाऱ्या अपघाताच्या घटनेने पुन्हा एकदा रस्ता रुंदीकरनाचा प्रश्न चवट्यावरआला आहे. घाटंजी ते पांढरकवडा मार्गांवरील गावातील रस्ता रुंदीकरनाची रखडलेले कामे कधी पुर्ण होतील ?आणि होणारे अपघात कधी टाळता येथील असा सवाल भयभीत झालेल्या गावाकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

# नारीशक्ती वंदन विधेयकाच्या समर्थनार्थ महिलांचा मोर्चा..!

## सक्षमीकरणासाठी जनजागृतीला वेग




**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - नारी शक्ती वंदन विधेयकाच्या समर्थनार्थ शहरात महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत भव्य पदयात्रा काढली. उत्सव मंगल कार्यालयाच्या आवारातून सुरू झालेल्या या मोर्चात विविध महिला संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत शैला मिर्झापुरे यांनी माहिती देताना सांगितले की, महिला सक्षमीकरणाबाबत अनेक वर्षांपासून घोषणा होत असल्या तरी प्रत्यक्षात त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. नारी शक्ती वंदन विधेयक प्रथम १९९६ मध्ये मांडण्यात आले होते, मात्र ते दीर्घकाळ प्रलंबित राहिले. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०२३ पासून या विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न वेगाने सुरू झाले आहेत.१८ एप्रिल रोजी या विधेयकासंदर्भात महत्त्वपूर्ण घोषणा अपेक्षित असल्याचे त्यांनी नमूद केले. याच पार्श्वभूमीवर महिलांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. मिस्ड कॉल मोहिम, सोशल मीडियाद्वारे जनजागृती, तसेच व्हिडिओ संदेशांच्या माध्यमातून महिलांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करण्याचा प्रयत्न सुरु आहे.१८ एप्रिल रोजी विशेष स्वाक्षरी मोहीम आणि भव्य महिला परिषद आयोजित करण्यात येणार असून, त्यामध्ये महिला हक्क, समानता आणि सक्षमीकरण या विषयांवर चर्चा होणार आहे.

या मोहिमेमुळे महिलांमध्ये एकजूट निर्माण होऊन त्यांचा राजकीय व सामाजिक सहभाग वाढेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाला नगरपालिका सदस्य ॲड. प्रियदर्शनी उईके, नगरसेवक कीर्ती राऊत, माया शेरे, रेखा कोठेकर, पुष्पलता सप्रे, निर्मला विनाकरे यांची उपस्थिती होती. मोर्चातून महिला सक्षमीकरणाचा ठोस संदेश देण्यात आला.

# सामाजिक कार्यासाठी पत्रकार सय्यद मतीन यांचा राहत चॅरिटेबल ट्रस्टतर्फे सन्मान

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - पत्रकारितेसोबतच सामाजिक कार्यातही सहभागी असलेले ज्येष्ठ पत्रकार सय्यद मतीन यांचा नुकताच राहत चॅरिटेबल ट्रस्टतर्फे सन्मान करण्यात आला. या प्रदेशातील त्यांचे सातत्यपूर्ण सामाजिक कार्य आणि लोकसेवेप्रती असलेल्या त्यांच्या समर्पणाची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला. हा सन्मान सोहळा राहत चॅरिटेबल क्लिनिकच्या (एलियट पॅलेस) भव्य उद्घाटनप्रसंगी पार पडला. मंचावर उपस्थित मान्यवरांनी सय्यद मतीन यांच्या कार्याची प्रशंसा करत त्यांना स्मृतिचिन्ह आणि शाल प्रदान केली.

या कार्यक्रमात अनेक प्रमुख व्यक्ती उपस्थित होत्या, विशेषतः मौलाना इलियास खान फलाही (सदस्य, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड), हाफिज अनीस (मोहतमिम, जामिया अन्वरुल इस्लाम यवतमाल), साजिद पटेल (नाझिम, वह्दत-ए-इस्लामी हिंद), मोहम्मद नईम (प्रभारी, वैद्यकीय विभाग), मुफ्ती एजाज शम्सी (जिल्हा सचिव, जमियत उलेमा-ए-हिंद), मुफ्ती सोहेल कासमी (मोहतमिम, जामिया इस्लामिया दारुल इमान यवतमाल), मोहम्मद शाकिर (सदस्य) आणि मोहम्मद इरफान उर्फ चांद (सदस्य). याप्रसंगी बोलताना वक्त्यांनी सांगितले की, पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे आणि जेव्हा एखादा पत्रकार आपल्या लेखणीसोबत लोकांच्या मदतीसाठी प्रत्यक्ष जमिनीवर उतरतो, तेव्हा समाजात सकारात्मक बदल घडतो. सय्यद मतीन यांनी वेळोवेळी सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी प्रशासकीय आणि सामाजिक प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रसंगी, सय्यद मतीन यांनी राहत चॅरिटेबल ट्रस्टचे आभार मानले आणि सांगितले की, या सन्मानामुळे त्यांची जबाबदारी अधिक वाढली असून ते भविष्यातही लोककल्याणकारी कामांमध्ये सक्रियपणे सहभागी राहतील. या कार्यक्रमाला शहरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक आणि समाजसेवक उपस्थित होते.

# जल जीवन मिशनच्या निधीअभावी कामबंद

## १ मेपासून पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - जिल्ह्यातील जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांना निधीअभावी गंभीर अडचणी निर्माण झाल्या असून, प्रलंबित देयके व इतर मागण्या तात्काळ पूर्ण न झाल्यास १ मे २०२६ पासून पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा ग्रामीण पाणी पुरवठा कंत्राटदार संघटनेने दिला आहे.

संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांना निवेदन पाठविण्यात आले असून ते जिल्हाधिकारी विकास मिना व मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या मार्फत सादर करण्यात आले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जिल्ह्यातील जल जीवन मिशन योजनांअंतर्गत सुमारे १४० कोटी रुपयांची देयके प्रलंबित आहेत. निधीअभावी अनेक ठिकाणी कामे ठप्प झाली असून कंत्राटदारांवर आर्थिक ताण वाढला आहे. कंत्राटदारांनी मागणी केली आहे की, केंद्र शासनाने दिलेल्या मुदतवाढीनुसार डिसेंबर २०२८ पर्यंत सर्व योजनांना विनादंड मुदतवाढ द्यावी तसेच आकारलेला दंड परत करावा. याशिवाय ५ टक्के सिक्युरिटी डिपॉझिट परत देणे, १० टक्के लोकवर्गणी वजावट थांबविणे, निधी उपलब्ध होईपर्यंत कामासाठी दबाव न टाकणे आणि पूर्ण झालेल्या योजनांचे गावांकडे हस्तांतरण करणे या मागण्या करण्यात आल्या आहेत.तसेच गेल्या दीड वर्षांपासून प्रलंबित असलेली सुधारित प्राकलने शासनस्तरावर तातडीने मंजूर करण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, ३० एप्रिल २०२६ पर्यंत या सर्व मागण्या पूर्ण न झाल्यास १ मेपासून सुरू असलेल्या सर्व पाणीपुरवठा योजना बंद करण्याचा इशारा देण्यात आला असून, यामुळे ग्रामस्थांना होणाऱ्या त्रासाची जबाबदारी प्रशासनावर राहील, असे संघटनेने स्पष्ट केले आहे.

# दहावीच्या निकालात (CBSE) वैदेही बंडू तोडसामची उल्लेखनीय कामगिरी

## 89.33% गुणांसह शानदार यश संपादन करत उत्तीर्ण



**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी - काल लागलेल्या Central Board of Secondary Education(CBSE) अंतर्गत इयत्ता १०वीच्या परीक्षेच्या निकालात Jawahar Navodaya Vidyalaya, बेलोरा येथील विद्यार्थिनी वैदेही बंडू तोडसाम हिने 89.33% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, चोरंबा गावातील अशी कामगिरी करणारी ती पहिली मुलगी ठरली आहे.

वैदेहीच्या या उज्वल यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून तिच्या कुटुंबियांना तिचा सार्थ अभिमान वाटत आहे. तिच्या यशामागे सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे.यामध्ये श्याम मेश्राम यांचे विशेष मार्गदर्शन लाभल्याचेही तिने सांगितले आहे. वैदेहीने आपल्या मेहनतीने आई-वडिलांचे नाव रोशन केले असून तिच्या या यशामुळे गावातील इतर विद्यार्थ्यांना नक्कीच प्रेरणा मिळणार आहे. शाळेच्या शिक्षकवर्गाने आणि मुख्याध्यापकांनी तिचे कौतुक करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गावातील नागरिकांनीही वैदेहीच्या घरी भेट देत तिचा सत्कार केला असून भविष्यात ती आणखी मोठे यश मिळवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.तिच्या यशामुळे तिच्या गावातच नव्हे तर तालुक्यातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# छ. शिवाजी महाराज समाधान शिबिराचा पहिला टप्पा ब्राह्मणगाव मंडळात यशस्वी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत 'समाधान शिबिर' टप्पा-१ अंतर्गत ब्राह्मणगाव मंडळातील शिबिराचे आयोजन १० एप्रिल २०२६ रोजी वसंतराव नाईक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, चिखली येथे उत्साहात पार पडले.

शिबिराची सुरुवात सकाळी प्रभातफेरीने झाली. शाळकरी मुलींच्या लेझीम पथकासह विविध विभागांच्या कर्मचाऱ्यांनी गावातून जनजागृती केली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे औक्षण करून लेझीम सादरीकरण, छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. विद्यार्थिनींनी स्वागत गीत व बंजारा नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. मुख्य शिबिराला सकाळी १०.३० वाजता प्रारंभ झाला. सरपंच सरिता भिसे अध्यक्षस्थानी तर उपविभागीय अधिकारी आशिष बीजवल उद्घाटक होते. नगराध्यक्षा मोहिनी नाईक, तहसीलदार रेखा वाणी, कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, कामगार विभागांसह विविध अधिकारी उपस्थित होते. यावेळी विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली तसेच नागरिकांना विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. उपविभागीय अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या ऐकून तत्काळ निवारण केले. "शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा," असे आवाहन मोहिनी नाईक यांनी केले. शिबिरात महसूल, कृषी, आरोग्य आदी विभागांच्या माध्यमातून अनेक समस्या एकाच छताखाली सोडविण्यात आल्या.

# संयुक्त जयंतीनिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड : क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्यावर आधारित सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन शिक्षक मित्र मंडळ, उमरखेड यांच्या वतीने करण्यात आले होते.

या स्पर्धेला उमरखेड तालुक्यातील तब्बल 62 शाळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये महापुरुषांच्या विचारांची जागृती व्हावी, त्यांच्या कार्याची ओळख व्हावी या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत वर्ग सहावी ते आठवी गटातून प्रथम व द्वितीय क्रमांक, तसेच वर्ग पाचवी गटातून प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आज दिनांक 14 एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात करण्यात आला. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या आदर्शांवर चालत शिक्षणाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन शिक्षक मित्र मंडळ उमरखेड यांनी यशस्वीरीत्या पार पाडले असून, तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ‘त्या’ प्रकरणाच्या निषेधार्थ जुळ्या शहर बंद

## पोलिसांचा जागोजागी तगडा बंदोबस्त

**अचलपूर/वार्ताहर**

समाज माध्यमांद्वारे अल्पवयीन मुलींशी जवळीक साधून त्यांची अश्लील छायाचित्रे आणि व्हिडिओ प्रसारित झाल्याने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे.परतवाडा पोलिसांनी अयान अहमद याला अटक केली पुढील तपास सुरू आहे.या घटनेच्या निषेधार्थ आज १५ एप्रिल रोजी जुळ्या शहरात व्यापाऱ्यांनी स्वयंपूर्ती ने दुकाने बंद ठेवली.





यावेळी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्यासह भाजप पक्षाचे पदाधिकारी ,कार्यकर्ते ,व्यापारी ,विविध पक्षाचे पदाधिकारी अचलपूर नगर परिषद कार्यालयाबाहेर जमा झाले होते .त्यानंतर सर्व उपस्थितीत नागरिक आ.प्रवीण तायडे यांच्या नेतृत्वात अमरावती जिल्हा ग्रामीण पालीस अधीक्षक विशाल आनंद यांना या प्रकरण संदर्भात विविध मागण्याचे निवेदन देण्यासाठी रवाना झाले.अचलपूर शहरातील देवडी, चावलमंडी, गांधीपूल, सराफा लाइन आणि परतवाडा शहरातील जयस्तंभ चौक , सदर बाजार, दुराणी चौक,आठवडी बाजार आदी परिसरात दुकाने बंद असल्याने शुकशुकाट होते .यावेळी अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात सर्व मुख्य चौकात पोलिसांचा तगडा बंदोबस्त पाहायला मिळाले.

अचलपूर नगर परिषद परिसरात जेसीबी असल्याने त्या प्रकरणातील अटक केलेल्या अयान अहमद तरुणाच्या जयस्तंभ चौक परिसरातील घरावर अनधिकृत बांधकाम असलेल्या लोखंडी पायऱ्या वर अचलपूर न.प कडून जेसीबी द्वारे कारवाई करण्यात आली.यावेळी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे,नगरसेवक अभय माथने व अचलपूर नगर परिषद बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.दुसरीकडे आ.प्रवीण तायडे,भाजपा पक्षाचे प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांनी परतवाडा पोलीस स्टेशन चे ठाणेदार सुरेश म्हस्के यांची भेट घेऊन संपूर्ण माहिती घेतली होती .या प्रकरणात आरोपीची शक्यता वाढण्याची शक्यता आहे.या प्रकारांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी नागरिक ,व्यापारी वर्गाने केली आहे. यावेळी आ.प्रवीण तायडे ,प्रमोद कोरडे,अतुल वाठ,मनीष अग्रवाल ,प्रफुल बर्वे,विशाल काकड,राज पाटील ,अभय माथने,अनिल तायडे ,गोविंद सिरोया,सुनील चौधरी,प्रफुल बर्वे,अंकुश जनावरे,सतीश शर्मा,गजानन फिसके,रुपेश ढेपे, सागर वाटाणे ,विलास सोळंकी,मनोज नंदवंशी,महेश कडू,पंकज उमक , अनु महाराज मिश्रा ,राम तिवारी ,अंकुश जवंजाळ, छोटू लाडोळे आदी व्यापारी,दुकानदार ,विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थितीत होते.

# १८० युवतींच्या लैंगिक शोषण प्रकरणी दोषींना फाशीची मागणी

## कठोर कारवाईसाठी निवेदन सादर

**अमरावती/का.प्र.**

परतवाडा येथे उघडकीस आलेल्या धक्कादायक लैंगिक शोषण आणि ब्लॅकमेलिंग प्रकरणात सुमारे १८० हून अधिक युवतींचे शोषण झाल्याची माहिती समोर येताच संतापाची लाट उसळली आहे. मुख्य आरोपी मोहम्मद अयाज याच्यासह सहकाऱ्यांनी शेकडो अश्लील व्हिडिओ तयार करून प्रसारित केल्याच्या पार्श्वभूमीवर दोषींवर कठोरात कठोर कारवाई करून फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी हिंदू जनजागृती समितीने केली आहे. या संदर्भात निवासी उप जिल्हाधिकारी संतोष काकडे व ग्रामीण पोलीस अधीक्षक, विशाल आनंद अमरावती यांना निवेदन सादर करण्यात आले.



या प्रकरणाचा तपास निष्पक्ष व जलद व्हावा यासाठी विशेष तपास पथक नेमण्याची आणि खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवण्याची मागणीही करण्यात आली आहे. तसेच, सायबर गुन्हेगारीच्या अनुषंगाने व्हायरल झालेले सर्व व्हिडिओ तात्काळ हटवून ते प्रसारित करणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.पीडित युवतींची ओळख गुप्त ठेवून त्यांना संपूर्ण संरक्षण द्यावे आणि त्यांचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही हिंदू जनजागृती समितीने दिला आहे. यावेळी वृंदा मुक्तेवार, शहराध्यक्ष शिवसेना बरखा बोज्जे ,बिजेपी विभा चौधरी , पिंकी घटोरीया,देवचंद घटोरीया,सुमित देऊळकर, रमेश वरुडकर, अभय कडुकार, गिरीश कोमेरवार,किरण कोमेरवार, निलेश टवलारे ,रोहन ढोमणे, अर्चना मावळे, जयश्री चौधरी, प्रीती नागपुरे, गजानन सोनटक्के, गिरीश जामोदे आदी उपस्थित होते.

# यावर्षी कमलीवाले बाबांचा उर्स नाही

## दर्गा व्यवस्थापन समितीचा निर्णय

**अमरावती/का.प्र.**

जुनी वस्ती बडनेरा येथील शम्सुद्दीन अल्मास शाह बाबा, जे कमालीवाले बाबा म्हणूनही ओळखले जातात, यांच्या दर्ग्यात दरवर्षी एप्रिल आणि मे महिन्यात मोठ्या थाटामाटात उर्स साजरा केला जातो. यावर्षी, उर्स २६ एप्रिल ते ६ मे या कालावधीत होणार होता आणि या दहा दिवसांत मुशायरा, कव्वाली आणि संदल यांसारखे कार्यक्रम मोठ्या उत्साहात आयोजित केले जाणार होते. तथापि,दरम्यान, ७ एप्रिलच्या रात्री, अकोला महामार्गावरील बेलोरा गावाजवळ, बडनेराच्या जुन्या वस्तीतील अलमास बाबा दर्ग्याजवळ राहणाऱ्या सात तरुणांचा एक भीषण रस्ते अपघात झाला. या अपघातात चार तरुणांचा मृत्यू झाला आणि तीन जण गंभीर जखमी झाले.यामुळे बडनेरा परिसरात शोकाची लाट पसरली आहे. ही बाब लक्षात घेऊन, दर्गा व्यवस्थापन समितीने यावर्षी उर्स न घेण्याचा निर्णय घेतला आहे, अशी घोषणा दर्गा समितीचे उपप्रमुख सत्तार पहलवान यांनी केली आहे.सर्व कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी दर्गा समिती नियमित बैठकाही घेत होती. परंतू अपघातात चार तरुणांचा मृत्यू झाला आणि तीन जण गंभीर जखमी झाल्याने संपूर्ण परिसरात गंभीर वातावरण निर्माण झाले असून, हे लक्षात घेऊन दर्गा समितीने यावर्षी कमलीवाले बाबांचा उर्स उत्सव आयोजित न करण्याचा निर्णय घेतला आहे.

# मान्सूनपूर्व देखभाल-दुरूस्तीच्या कामांची जिल्ह्यात सुरुवात

**अमरावती/का.प्र.**

पावसाळ्यात वादळी वारा, मुसळधार पाऊस आणि विजांच्या कडकडाटामुळे विद्युत पुरवठ्यात निर्माण होणारा व्यत्यय टाळण्यासाठी अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात महावितरणच्या मान्सूनपूर्व देखभाल दुरूस्तीच्या कामांना जिल्ह्यात सुरुवात करण्यात आली आहे.



अचलपूर विभागात ‘एक वितरण केंद्र-एक उच्च दाब विद्युत वाहिनीची दुरूस्ती’ यानुसार कामाचे नियोजन करण्यात आले आणि एकाच दिवसात अचलपूर विभागांतर्गत अचलपुर, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, चांदूर बाजार, चिखलदरा आणि धारणी या तालुक्यांतील प्रत्येक वितरण केंद्रामधील एक उच्च दाब वाहिनी याप्रमाणे ४० वितरण केंद्रातील ४० उच्चदाब वाहिन्यांची देखभाल दुरूस्ती करण्यात आली.देखभाल दुरूस्तीच्या कामांतर्गत विद्युत वाहिनीजवळील धोकादायक झाडांच्या फांद्या छाटणे, नादुरुस्त जंपर्सची पुनर्जोडणी करणे, सैल तारा ताणून योग्य स्थितीत आणणे आदी महत्त्वाची कामे करण्यात आली. या कामासाठी कार्यकारी अभियंता प्रदिप अंधारे यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन सुरू असलेल्या कामांची पाहणी केली व आवश्यक सूचनाही दिल्या. मान्सूनपूर्व देखभाल दुरूस्तीच्या कामामुळे पावसाळ्यातील संभाव्य विद्युत व्यत्यय कमी होऊन ग्राहकांना अधिक विश्वासार्ह व अखंड वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार असल्याचे महावितरणने सांगितले आहे.

# संक्षिप्त



## जिल्हाधिकाऱ्यांची पोल्ट्री प्रकल्पाला भेट

**अंजनगाव बारी**-अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी म्हसला येथील रवींद्र मेटकर यांच्या यशस्वी व प्रयोगशील कुक्कुटपालन ( प्रोल्टी फॉर्म ) प्रकल्पाला भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली. उत्पादनक्षमता, आधुनिक पद्धती आणि व्यवस्थापनाच्या बारकाव्यांचा आढावा त्यांनी घेतला.क्षेत्रभेट कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, आत्मा संचालक अर्चना निस्ताने, तलाठी लांजेवार तसेच दिलीप मेटकर आणि शिवराय मेटकर उपस्थित होते. शाश्वत शेती व पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने यावेळी सामूहिक वृक्षारोपणही करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचा सत्कार करण्यात आला.

## स्नेहा लुल्ला आणि डॉ.मधुरा कहाळे यांचा पदग्रहण समारंभ

**अमरावती**-महानगरपालिकेच्या विधी समितीच्या नवनिर्वाचित सभापती स्नेहा लुल्ला आणि उपसभापती डॉ. मधुरा कहाळे यांचा पदग्रहण समारंभ उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. महानगरपालिकेतील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास महापौर श्रीचंद तेजवाणी, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, परम पूज्य संत डॉ. संतोषदेव जी महाराज, शिवसेना उपनेता प्रिती बंड,जिल्हा प्रमुख संतोष बद्रे, गटनेता नाना आमले, गटनेता डॉ.राजेंद्र तायडे, माजी पालकमंत्री जगदिश गुप्ता, शिक्षण समिती सभापती ॲड.प्रीती रेवणे, शहर सुधार समिती सभापती राधा कुरील, महिला व बाल कल्याण समिती सभापती ममता आवारे, उपसभापती लता देशमुख, सन?मा.नगरसेवक आशिष अतकरे, प्रदिप हिवसे, संजय गव्हाळे, अजय जयस्वाल, विनोद तानवैस, सचिन वैद्य, मनीष बजाज, इस्माईल लालुवाले, योगेश विजयकर, मोहंमद रेहान मोहमद यासीन, संजय तिरथकर, नगरसेविका पद्मजा कौंडण्य,स्वाती कुलकर्णी,माधुरी ठाकरे,अर्चना पांडे,अर्चना पाटील, विद्या माटे,स्मिता सुर्यवंशी,मंजुषा जाधव,प्रियंका पाटणे, आशिष लुल्ला, मिलींद कहाळे, शिवसेनेचे पदाधिकारी, अधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय शैक्षणिक भेट

**अमरावती**-स्थानिक विदर्भ युथ वेलफेयर सोसायटी अमरावती संचालित इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय अमरावती समाजशास्त्र विभागातर्फे मिशनरीज ऑफ चॅरिटी अमरावती ईशदया येथे शैक्षणिक संस्था भेट देण्यात आली.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अभ्यासक्रम अनुषंगाने बी. ए. समाजशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनींना समाजातील सामाजिक समस्या व उपाय याबाबत सखोल ज्ञान मिळण्याच्या दृष्टीने शैक्षणिक संस्था भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीदरम्यान विद्यार्थिनींनी मिशनरिज ऑफ चॅरीटी अमरावती ईशदया संस्थेतर्फे अनाथ अंध, अपंग स्त्रियांच्या घेण्यात येत असलेल्या संगोपनाच्या सेवाभावी कार्याची माहिती जाणून घेतली.सेवाभावी कार्य करतांना संस्थेला भेडसावत असणाऱ्या सामाजिक समस्या व त्यावर संस्थेने केलेले उपाय याचे अध्ययन व निरीक्षण विद्यार्थिनींनी संस्थेच्या कर्मचारी व अनाथ, अपंग स्त्रियांशी हितगुज करतांना केले. कार्यक्रमाला समाजशास्त्र अभ्यास मंडळ च्या विद्यार्थीनी उपस्थित होत्या. धरती मकेश्वर व आरती जवंजाळ बी.ए भाग-३ च्या विद्यार्थिनींची प्रशिक्षण व निरीक्षणाकरिता निवड करण्यात आली.कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय कोल्हे, संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य डॉ. पूनम चौधरी यांचे मार्गदर्शनात केले असून,कार्यक्रमाला डॉ. सीमा अढाऊ, प्रा. वंदना भोयर, प्रा.अरुणा तसरे,प्रा. वंदना गावंडे,प्रा. संजय काळे, प्रा. अनुप आत्राम, प्रा. ढगे, प्रा. बारबुदे, प्रा.ढोमणे, प्रा. देशमुख, प्रा.कोरडे व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. संचालन प्रा. डॉ.मंगेश ठाकरे व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. विभांगी देशमुख यांनी केले.

# जी.एच. रायसोनी विद्यापीठात राष्ट्रीय स्तराचे ‘काश्ती २०२६’

**अमरावती/का.प्र.**

जी एच रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथील मॅनेजमेंट स्टडीज स्कूलने राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित व्यवस्थापन कार्यक्रम ‘काश्ती २०२६’ यशस्वीरित्या आयोजित केला. देशभरातील विविध प्रतिष्ठित महाविद्यालये आणि संस्थांमधील एकूण १०५ विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवला. हा कार्यक्रम शैक्षणिक उत्कृष्टता, नाविन्यपूर्ण कल्पना आणि स्पर्धात्मक भावनेचे एक सजीव व्यासपीठ ठरला.



‘काश्ती २०२६’ मध्ये विद्यार्थ्यांच्या व्यवस्थापकीय कौशल्यांची परीक्षा घेणाऱ्या तीन प्रमुख स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.उद्यम-बिझनेस प्लॅन स्पर्धा,अध्ययन- केस स्टडी स्पर्धा,मंथन-ग्रुप डिस्कशन स्पर्धा.या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना आपल्या उद्योजकीय कल्पना, विश्लेषणात्मक क्षमता आणि संवाद कौशल्ये प्रदर्शित करण्याची संधी मिळाली. प्रत्येक स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस रु.५,००० आणि द्वितीय बक्षीस रु.३,००० देण्यात आले.उद्यम (बिझनेस प्लॅन)विजेता: टीम ‘कॅपिटल क्रिएटर्स’सुमित अग्रवाल, देवर्षी ठाकरे, तेजस लिंगोट, ममता पारस्कर (एमबीए द्वितीय वर्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती)उपविजेता: टीम ‘एपेक्स ऑटोमेटर्स’-अश्विन दहाके, आकांक्षा तेहरे, अशुतोष नंदाने, संयुक्ता तावळरे (एमबीए प्रथम वर्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती)अध्ययन (केस स्टडी)-विजेता: आदित्य वानखेडे (बीटेक, जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती)उपविजेता: सोनाली खोब्रागडे (एमबीए द्वितीय वर्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती)मंथन (ग्रुप डिस्कशन)विजेता: आदित्य वानखेडे (बीटेक, जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती)उपविजेता: टीम ‘थिंक टँक’-मयंक बुधवानी, वंशिका अग्रवाल, अलिया अब्दुल कुरी (बीबीए प्रथम वर्ष, जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती)

मुंबईतील विल्सन कॉलेज, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (पंजाब), डी. वाय. पाटील इंटरनॅशनल स्कूल (नागपूर), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, विद्याभारती महाविद्यालय (अमरावती) आणि सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (अमरावती) यासह अनेक संस्थांतील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला.समन्वयक डॉ. अमोल पांडे होते. त्यांना गुंजन चौधरी,प्रिया परढे, डॉ. पिंकी देवानी,अनिल कुमार आणि ध्रुव बाजपेयी यांच्या संघाने उत्कृष्ट साथ दिली.विद्यापीठाच्या नेतृत्वाखाली डॉ. विनायक देशपांडे (कुलगुरू),डॉ. स्नेहिल जैस्वाल (कुलसचिव), डॉ. प्रशांत अवचट (डीन, विद्यार्थी कल्याण) आणि डॉ. राजकुमार झा (डीन, स्कूल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज) यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

## ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट तर्फे

# नारायणदास लढ्ढा हायस्कूल ला राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कार

**अमरावती/का.प्र.**



ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्र एज्युकेशन समिट २०२६ द्वारा आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक व शाळा पुरस्कार सन्मान सोहळा निगडी प्राधिकरण, पुणे येथील ग.दि.माडगूळकर नाट्यगृहात संपन्न झाला. या पुरस्कार सोहळ्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपमहापौर शर्मिला बाबर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच मंचावर उपजिल्हाधिकारा संभाजीनगर व शिक्षणाधिकारी, पुणे उपस्थित होते.

मंचावर उपस्थित मान्यवरांचे ध्येय एज्युकेशन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुदाम शेंडगे यांच्यातर्फे यथोचित सत्कार करण्यात आले. सुदाम शेंडगे यांनी आपल्या एज्युकेशन फाउंडेशनचा प्रमुख उद्देश शिक्षक व शाळा यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा सन्मान करणे हा आहे हे सांगितले.त्यानंतर दत्तात्रय वारे गुरुजी, जिल्हा परिषद वाबळेवाडी, पुणे यांनी उपस्थितांचे मार्गदर्शन केले.दत्तात्रय वारे गुरुजी यांच्या हस्ते महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट प्रेरणादायी व उल्लेखनीय कार्य करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान दिल्याबद्दल नारायणदास लढ्ढा हायस्कूल शाळेला सन्मानपत्र व गौरव चिन्ह देऊन पुरस्कृत करण्यात आले. शाळेच्या या यशाबद्दल ब्रजलाल बियाणी शिक्षा समितीचे अध्यक्ष ओमप्रकाशजी लढ्ढा, सचिव सुनीलें गोयनका, उपाध्यक्ष देवदत्तजी शर्मा, उपाध्यक्ष विनोद सामरा, कोषाध्यक्ष गोपाल राठी व नारायणदास लढ्ढा हायस्कूलचे शाळा समिती अध्यक्ष ॲड.अशोक राठी ,तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व कार्यकारणी सदस्य यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका सुषमा अ. माळवे व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

# पाच वर्षांत अमरावती जिल्ह्यात वाहनसंख्येत २ लाख ४६ हजारांची वाढ

## मार्च २०२१ मधील ८,३७,७७३ वाहनांवरून मार्च २०२६ अखेर १०,८४,२५० वाहनांपर्यंत मजल

**अमरावती/का.प्र.**

प्रादेशिक परिवहन कार्यालय अमरावती (आरटीओ) यांच्या वाहन नोंदणीनुसार अमरावती जिल्ह्यात गेल्या पाच वर्षांत वाहनसंख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.मार्च २०२१ मध्ये जिल्ह्यात एकूण ८ लाख ३७ हजार ७७३ वाहने नोंदणीकृत होती. ती संख्या मार्च २०२६ अखेर १० लाख ८४ हजार २५० इतकी झाली आहे. म्हणजेच अवघ्या पाच वर्षांत २ लाख ४६ हजार ४७७ नव्या वाहनांची भर पडली आहे अशी माहिती प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर यांनी दिली.

वाहन हे केवळ गरज नसून आता प्रत्येक कुटुंबाचा अविभाज्य घटक बनत चालले आहे. शहरी भागासह ग्रामीण भागातही रस्ते सुविधा सुधारल्यामुळे दुचाकी व चारचाकी वाहनांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे चित्र दिसून येत आहे.

जिल्ह्यात वाहनसंख्या वाढत असताना वाहतूक नियमांचे पालन करणे अत्यावश्यक आहे.वाहन चालविताना वेगावर नियंत्रण ठेवावे.दुचाकी चालविताना हेल्मेटचा अनिवार्य वापर करावा.अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये.वाहनवाढ ही विकासाची दिशा असली तरी सुरक्षितता ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी आरटीओ उर्मिला पवार यांनी केले आहे.

**वर्षनिहाय नवीन नोंदणी**

२०२१-२२ : ३९,६६०
२०२२-२३ : ४४,८५०
२०२३-२४ : ४७,८२७
२०२४-२५ : ५३,३५५
२०२५-२६ : ५७,८४१

गेल्या दोन वर्षांत वाहन खरेदीत विशेष वाढ झाल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते.

**२०२१ मधील वाहनस्थिती**

अमरावती जिल्ह्यात ८ लाख ३७ हजार ७७३ वाहने होती.

**यामध्ये प्रामुख्याने**

दुचाकी : ६,८७,७७८
चारचाकी (कार/जीप) : ६८,१०
ऑटो रिक्षा : २०३५९
ट्रान्सपोर्ट वाहने : ५२,९४७

आदी वाहनांचा समावेश होता.

**पाच वर्षांतील (२०२१-२०२६) वाहनवाढ**

दुचाकी : १,९०,०३९
कार/जीप : २८,०७३
ऑटो रिक्षा : ४,१७२
मिनीबस/स्कूल बस/व्हॅन : ३४२
ट्रक/लॉरी : ५,७०७
डिलिव्हरी व्हॅन : १,२६६
ट्रॅक्टर : १०,१६४
ट्रॉली : १,८३०
ॲम्बुलन्स : १५७
ई-रिक्षा : ४७६
लक्झरी टुरिस्ट बस : ३६९
टँकर : २८
इतर : १,०९१



या कार्यालयाच्या आस्थापनेवर ३१ मार्च २०२६ पर्यंत नोंदणी झालेले ई (इलेक्ट्रिक) वाहने.मोटर सायकल - (दुचाकी) वाहन संख्या १२ हजार १४७,चारचाकी कार-३३५,ई रिक्षा - ५५७, डिलीव्हरी व्हॅन- ५५३, ई वाहने नोंदणी झालेली आहेत.

# लता-आशा... एक चिरंतन श्वास!




लताबाई गेल्या, तेव्हाच आपल्या आयुष्यातील सुरांचे अर्ध प्राणपाखरू उडून गेले होते...पण आशाबाई होत्या. काल त्याही गेल्या. इतकं हतबल आजवर कधीच वाटले नव्हते. गाण्याचे आपल्या आयुष्यातील स्थान काय ते नेमके नाही माहीत. पण लता-आशानी आपले आयुष्य व्यापून टाकले होते एवढे खरं. त्यांच्या मागे आता त्यांचे सूर असतीलच आपल्या सोबतीला. तरीही ज्यांना आपण 'याचि देही याचि डोळां' पाहिले-अनुभवले, त्या या हाडामांसाच्या दोघी विश्वाच्या या पोकळीत आता नाहीत, हे स्वीकारायला जरा कठीणच जात आहे. तशा तर वेगवेगळ्या काळात, वेगवेगळ्या क्षेत्रात, वेगवेगळ्या दंतकथा जन्माला येतच असतात. पण विसाव्या शतकात संगीतक्षेत्रात अख्ख मंगेशकर कुटुंबच दंतकथा बनले. दीनानाथ मंगेशकर हे या दंतकथेतले मानाचे पान होते खरे... तरीही विसाव्या शतकावर खऱ्या अर्थाने सत्ता गाजवली ती लता-आशा या दोघींनीच! दंतकथा किंवा मिथकं कधीच पूर्णपणे खरी वा खोटी नसतात. ती कायम सत्यासत्याच्या सीमेवर आंदोलत असतात. समाज जेवढा संवेदनशील तेवढी ती मिथकं वा दंतकथा समाजात रुजतात-पसरतात. विसावे शतक त्या अर्थाने अतिसंवेदनशील होते, त्यामुळे लता-आशा जिवंत दंतकथा बनून गेल्या. त्या दिसत असल्यामुळे त्यांचे अस्तित्व तर आपल्यासमोर होतेच. पण आपल्या दृश्य अस्तित्वाच्या पलीकडे आपल्या आवाजाने-गायनाने त्यांनी आपल्याभोवती जे तेजोवलय (ऑरा) निर्माण केले ते 'न भूतो न भविष्यति' होते.

त्यातही लताबाई म्हणजे-आत्म्याचा (खरंतर निसर्गाचा) स्वच्छ नि शुद्ध सूर... तर आशाबाई म्हणजे आत्म्याच्या त्या सुरांचा विलास! त्यामुळेच लताबाई कायम आपल्या प्रतिमेला जपत राहिल्या, तर आशाबाई मनसोक्त जगत राहिल्या. लताबाई आपल्या प्रतिमेच्या चौकटीत बंदिस्त झाल्या, तर आशाबाई चौकटी तोडत राहिल्या. त्यांनी जगण्याकडे आणि संघर्षाकडे कधीही पाठ फिरवली नाही, उलट त्या हसतहसत जगण्याला सामोरे गेल्या.

एकीचे कमालीचे अंतर्मुख असणे आणि दुसरीचे कमालीचे बहिर्मुख असणे, हीच त्यांची ताकद होती. त्या ताकदीची कमाल आपण त्यांच्या गाण्यांतून अनुभवली, हे आपले भाग्य (याला पर्यायी शब्द काय वापरायचा?).त्या अर्थाने विसाव्या शतकात जन्माला आलेले दोन सूर एकविसाव्या शतकात निमाले आणि आपण खऱ्या अर्थाने सुरांना पारखे झालो!

**मुकुंद कुळे**

# 'हम गया नही जिंदा है'



श्री स्वामी समर्थ महाराजांच्या समाधीला १४० वर्षापेक्षा अधिक काळ निघून गेला असला तरी जेव्हा ही घटना अनेक भक्तांच्या वाचण्यात किंवा ऐकण्यात येतो तेव्हा आपले हृदय किंवा अंतःकरण भारावून गेल्याशिवाय राहत नाही.श्री स्वामी समर्थ महाराजांनी म्हटले होते का, 'हम गया नही जिंदा है' या वाक्यात खरंच एक विलक्षण जादू आहे, आणि आपण ते प्रत्यक्षात अनुभवू शकतो. त्या काळात अक्कलकोटमधे प्रत्यक्ष दिसणारी परब्रम्ह व चैतन्य असलेली शक्ती चैत्र वद्य त्रयोदशी, सहवद्य चतुर्दशी, शके १८००, सन १८७८ ला आपल्या असंख्य भक्तांना व चाहत्यांना सोडून आपल्याला निघून गेली. अशा प्रकारची विधाने जेव्हा आपण ऐकतो त्यावेळी अशी वाक्ये आपल्या मनाला अजिबात दिलासा देत नाही. याचे कारण असे की त्यांची निर्गुण निराकार शक्ती आजही आपल्यात वावरत आहे. त्याच काळात बारा दिवसापासून श्री स्वामी समर्थ महाराजांनी काहीच अन्न घेतले नव्हते. श्री स्वामी महाराजांची एक भक्त काकूबाई ह्यांनी मात्र त्या दिवशी भक्तांच्या विनंतीमुळे महाराजांना थोडी पेज सेवन करण्यास दिली. त्यानंतर त्यांना बाळप्पांनी सुपारी दिली व झोपावयास सांगितले. महाराजांनी ती सुपारी ग्रहण केली. त्याच वेळी कर्म धर्म संयोगाने राणीसाहेब सुद्धा तेथेच होत्या. त्यांना सुद्धा महाराजांच्या ह्या वागण्यानं अत्यानंद झाला होता त्यामुळे त्यांना असे वाटू लागले होते की आता माझ्या महाराजांस कसलीही भिती नाही असे समजून राणीसाहेब वाड्यात परत गेल्या. पण नेमके त्याच दिवशी समर्थ कृपेने साधुत्वाला पोहोचलेल्या आपल्या असंख्य भक्तांचा व साधकांच्या हृदयाचा ठोका मात्र चुकला होता हे नक्कीच म्हणायला काही हरकत नाही. स्वामीचे मुख्य सेवेकरी श्री बाळप्पा महाराज यांना काहीतरी अघटीत घडण्याचा भास झाला होता. याचे कारण असे की त्यांनी सर्व स्वामी भक्तांना अक्कलकोटात त्वरित हजर होण्यासाठी तारा पाठविलेल्या होत्या. त्यामुळेच मुंबईचे केशव नाईक आपल्या पुत्रासोबंत अक्कलकोटला दाखल झाले. त्यांनी या घटनेचा सविस्तर प्रसंग 'साईलीला' या मुंबईतून निघणाऱ्या मासिकात २५ जुलै १९२५ ला प्रकाशित केला होता.

अनन्याश्चिन्तयंतो मां ये जनाः पर्युपासते।
तेषांनित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

समर्थ वचनाने भारावून गेलेले भक्तगण अनन्यशरण भावनेने प्राण एकवटून श्री स्वामी समर्थ यांच्या कृतीकडे पाहत होते.'श्रीं' नी आशीर्वाद संकेत दर्शविण्यासाठी हस्तकमल उंचावले. पुढच्याच क्षणी तो स्वप्नासारखा भास संपला. समर्थ निजानंदी निमग्न जाहले. अंतकाळी त्यांच्या मुखातून खसखशीएवढे तीन पांढरे दाणे बाहेर पडले. नंतर, श्री स्वामी देह दरबार मंडळींच्या आग्रहामुळे, पेठेतील मठाच्या ध्यानगुंफेत ठेवण्यात आला. वाजतगाजत मिरवणुकीने, ढोलताशांच्या गजरात त्यांच्या या समाधीलीलेस अंतिम स्वरूप देण्यात आले. तीन दिवस बाळप्पा समाधीत उतरून पूजा करीत होते. मग दगड लावून समाधी बंद करण्यात आली. वडाखाली कर्जाळकरांच्या घरा लागून असलेली छप्परवजा विश्रांतस्थळी मंगळवार, ३० एप्रिल १८७८, शके १८००,दुपारी २ वाजता चैत्र वद्य त्रयोदशी संपून चतुर्दशी सुरु झाल्यावर सायंकाळी ४.३० वाजता ही घटना घडली. पुढे तेथे भंडारखान्यातील दत्त मंदिरात असलेली एक शिवपिंड वडाखालच्या समाधी प्रसंगस्थळी स्थापन झाली.हेच स्थळ आज अक्कलकोटात वटवृक्ष देवस्थान म्हणून सुप्रसिद्ध आहे.

**दीपक जगताप**
अमरावती

# दही आणि ताक उन्हाळयात आरोग्यासाठी?



उन्हाळ्याचा तडाखा मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. त्यामुळे अनेकजण उन्हाळ्यात दही आणि ताक घेणे पसंत करतात.उन्हाळ्याची सुरुवात होताच बऱ्याच घरांमध्ये जेवताना नियमितपणे दही किंवा ताकाचे सेवन करतात. या दोन्ही पदार्थांमध्ये प्रोबायोटीक्स अर्थात पोटासाठी फायदेशीर ठरणारे बॅक्टेरिया असतात. मात्र, फार कमी लोकांना हे माहित आहे की यापैकी आपल्या पोटाच्या आरोग्यासाठी नेमके काय फायदेशीर आहे? चला तर जाणून घेऊयात दही आणि ताक या दोन्हींपैकी नक्की काय फायदेशीर ठरेल याबद्दल.

दह्यात प्रोटीन आणि व्हिटॅमिन्स भरपूर प्रमाणात असतात.यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. जर तुम्हाला वजन वाढवायचे असेल किंवा हाडे मजबूत करायची असतील, तर दही उत्तम आहे. आयुर्वेदानुसार, दही हे निसर्गात उष्ण प्रवृत्तीचे मानले जाते. दही खाल्यानंतर पोटातील उष्णतेमुळे त्याचे आंबवण्याचे कार्य वाढते, ज्यामुळे काही लोकांना ॲसिडिटी किंवा पोट फुगणे यांसारख्या समस्या उद्भवतात. दहीमध्ये ऊर्जेचे स्तोत्र मोठ्या प्रमाणात असते. पण हे पचनासाठी जड मानले जाते.जर तुम्हाला दही खायचे असेल, तर ते दुपारच्या जेवणात खावे. रात्री दही खाणे टाळावे, कारण यामुळे कफ वाढण्याची शक्यता असते.

ताक हे दह्यापासून बनवले जाते. पण त्यामध्ये पाणी मिसळल्यामुळे आणि घुसळल्यामुळे त्याचे गुणधर्म पूर्णपणे बदलतात. आयुर्वेदात ताकाला 'तक्र' म्हटले जाते, ज्याची तुलना अमृताशी केली गेली आहे. दह्याच्या विरुद्ध, ताक हे निसर्गात अत्यंत शीत अर्थात थंड असते. हे शरीराचे तापमान त्वरित कमी करण्यास मदत करते आणि ताक पचायलाही हलके असते. जर तुम्हाला अपचन, गॅस किंवा ॲसिडिटीचा त्रास असेल, तर ताक हे सर्वोत्तम पेय आहे.उन्हाळ्यात शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाईट्स घामाद्वारे बाहेर पडतात. ताक प्यायल्याने शरीरातील पाण्याची पातळी टिकून राहते आणि थकवा दूर होण्यास मदत मिळते.उन्हाळ्यात दह्यापेक्षा ताक पिणे जास्त फायदेशीर ठरते. दही हे पचायला जड असल्याने उन्हाळ्यात पचनशक्ती मंदावलेली असताना ताक घेणे अधिक फायदेशीर ठरते.

## मुलांचा सुट्टीतील वेळ सत्कारणी लावा


आता मुलांच्या शालेय परीक्षा चालू आहेत.आता सुट्ट्या सुरु होतील.खरे तर सुट्टी हा मुलांच्या आयुष्यातला एक आनंदाचा क्षण असतो.कायमचा अभ्यासाचे ओझे असते. त्या ओझ्यापासून काही दिवस दूर आता कोणीही अभ्यास करा असे म्हणणार नाही.पालकही ही मुलांची अवस्था पाहत असतात.पण मुलांची सुट्टी सत्कारणी लावणे अतिशय जरुरी आहे.त्यांना अभ्यासाला लावू नका पण अभ्यासू वातावरण निर्माण करा.त्यांना वाचनाची गोडी लावा.मुलांची मासिके वाचावयास द्या.मुले वाचनात रंगून जातील.त्यांना वर्तमानपत्रे वाचावयास द्या वर्तमानपत्रातील शब्दकोडे सोडवू द्या.या दृष्टीने मराठी तील संध्यानंद हे दैनिक अतिशय चांगले आहे.मुलांना गोष्टीची पुस्तके वाचावयास द्या एखादे वाचनालय त्यांच्यासाठी सुरु करा.ती राम लक्ष्मणांच्या कथेत रंगून जातील त्यांना दररोज दैनंदिन लिहावयास शिकवा.वेळ कसा खर्च होतो व दिवसाच्या घडामोडी दैनंदिनीत उमटू देत. त्यांना लिहावयाची सवयी लागेल व आपण दररोज काय करतो याचा स्वानुभव मिळेल.

हल्ली बऱ्याच शहरात उन्हाळी सुट्टीचे वर्ग असतात.तेथे व्यायाम व इतर गोष्टी शिकवितात.शिस्त लावतात.सांघिक खेळ खेळावयास मिळतात.ज्यांना शक्य असेल त्यांना तेथे पाठवा.इतिहासातील अनेक गोष्टी त्यांनी ऐकलेल्या असतात.आता प्रत्यक्षात त्या अनुभवण्याची संधी द्या.त्यांच्या बरोबर प्रतापगड,सिंहगड, शिवनेरी किल्ले दाखवा. पुणे दर्शन मधून किंवा इत्तर शहरातून अशा दर्शन गाड्यांची सोय असते.नसेल तर स्वतःच्या वाहनातून त्यांना घेऊन जा.तेथील वातावरण त्यांना निश्चितच आवडेल. इतिहासातील प्रत्यक्ष क्षण अनुभवण्याची संधी त्यांना मिळेल ज्या मुलांचे हस्ताक्षर सुधारावयाचे आहे त्यांना दररोज हस्ताक्षराचे धडे द्या. एखाद्या हस्ताक्षराच्या वर्गाला सुद्धा त्य्यांना घालावयास हरकत नाही त्यातून त्यांचे हस्ताक्षर सुधारेल. त्यांना प्राणायाम व योगासने शिकवा व व्यायामाची गोडी लावा.एकूणच आरोग्य, वाचन,हस्ताक्षर,ऐतिहासिक स्थळे पाहणे यात मुलांचा वेळ कसा जातो हे समजणार नाही.आम्ही लहान असताना आजोबा आम्हास त्यावेळी दररोजचा केसरी वाचावयास लावत तसेच वाचनासाठी प्रसाद मासिकाचे अनेक अंक देत.त्यातून आम्हास वाचवायची गोडी निर्माण झाली.जीवनात शिकण्यासारखे व आनंद घेण्यासारखे खूपच आहे.त्याचा आस्वाद घ्यावयास मुलांना शिकवा.



**शांताराम वाघ**

# चेहरा थंड पाण्याने धुण्याचे अगणित फायदे



सकाळी थंड पाण्याने चेहरा धुणे ही केवळ ताजेतवाने होण्यासाठीच मदत करत नसून त्वचेच्या आरोग्यासाठीही फायदेशीर ठरते. थंड पाणी त्वचेची रंध्रे तात्पुरती संकुचित करते, सूज आणि डोळ्यांखालील फुगीरपणा कमी करते तसेच नैसर्गिक तेलांचे संरक्षण करते. यामुळे त्वचा अधिक घट्ट, स्वच्छ आणि टवटवीत दिसते. थंड पाणी रक्ताभिसरण सुधारण्यास मदत करते, ज्यामुळे त्वचेला नैसर्गिक ग्लो येतो. मात्र अतिशय बर्फाचे पाणी कटाक्षाने वापरणे टाळावे.

आपल्या त्वचेचे आरोग्य हे रक्तभिसरण आणि बाहेरील आवरणाच्या मजबुतीवर अवलंबून असते. 'अमेरिकन अकॅडमी ऑफ डर्मेटोलॉजी' च्या अहवालानुसार, गरम पाणी त्वचेतील नैसर्गिक तेल काढून टाकते, तर थंड पाणी त्वचेचे संरक्षण करते. थंड पाण्याचा स्पर्श त्वचेच्या मज्जासंस्थेला उत्तेजित करतो, ज्यामुळे चेहऱ्यावर नैसर्गिक तेज येते. जेव्हा आपण सकाळी उठल्यावर थंड पाण्याचे हबके मारतो, तेव्हा केवळ चांगली खडबडून जागच येत नाही, तर आपल्या त्वचेच्या पेशींनाही एक नवीन ऊर्जा मिळते. हे केवळ स्वच्छतेसाठी नसून त्वचेला तरुण आणि टवटवीत ठेवण्यासाठी घेतलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे.

थंड पाण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे ते उघड्या रंध्रांना तात्पुरते संकुचित करते. 'हार्वर्ड हेल्थ' नुसार, थंड पाण्यामुळे त्वचेवरील रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, ज्यामुळे चेहरा अधिक घट्ट आणि सॉफ्ट दिसतो. यामुळे धुळीचे कण आणि प्रदूषण रंध्रांमध्ये अर्थात पोअर्समध्ये शिरण्याचे प्रमाण कमी होते, परिणामी ब्लॅकहेड्सची समस्या कमी होते.गरम पाणी त्वचेवरील आवश्यक नैसर्गिक तेल पूर्णपणे धुवून टाकते, ज्यामुळे त्वचा कोरडी आणि निर्जीव पडते. 'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन नुसार, थंड पाणी त्वचेचा नैसर्गिक ओलावा टिकवून ठेवण्यास मदत करते. ज्यांची त्वचा संवेदनशील आहे किंवा ज्यांना रोसेशियासारख्या समस्या आहेत, त्यांच्यासाठी थंड पाणी एक औषधासारखे काम करते.जर तुमच्या चेहऱ्यावर पिंपल्स किंवा पुरळ येत असतील, तर थंड पाणी तुमच्यासाठी वरदान ठरू शकते.थंड पाणी मुरुमांमुळे होणारी जळजळ आणि लालसरपणा कमी करण्यास मदत करते. ते त्वचेला शांत करते आणि वेदना कमी करते, ज्यामुळे संसर्ग पसरण्याचा धोका कमी होतो.

जर्नल ऑफ फिजियोलॉजिकल अँथ्रोपोलॉजीच्या संशोधनानुसार, थंड पाण्यामुळे होणाऱ्या 'व्हॅसोकॉन्स्ट्रिक्शन' क्रियेनंतर, जेव्हा त्वचा पुन्हा उबदार होते, तेव्हा त्या भागात रक्ताचा पुरवठा वेगाने वाढतो. यामुळे त्वचेच्या पेशींना अधिक ऑक्सिजन आणि पोषक तत्वे मिळतात. या प्रक्रियेमुळे त्वचेची लवचिकता टिकून राहते, सुरकुत्या उशिरा येतात आणि चेहऱ्यावर एक नैसर्गिक गुलाबी चमक येते.थंड पाण्याने चेहरा धुणे ही सर्वात स्वस्त आणि प्रभावी ब्युटी ट्रीटमेंट आहे. पण अतिशय थंड किंवा बर्फाचं पाणी वापरणं टाळावं. सामान्य थंड किंवा कोमट पाणी त्वचेसाठी सर्वोत्तम असते. दिवसातून दोनदा थंड पाण्याने चेहरा धुणे तुमच्या त्वचेचे आरोग्य दीर्घकाळ टिकवू शकते.थंड पाण्याने चेहरा धुणे हा त्वचेच्या आरोग्यासाठी सोपा आणि प्रभावी उपाय आहे. यामुळे त्वचेचा ओलावा टिकतो, सूज कमी होते आणि चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते. संवेदनशील किंवा मुरुमांची समस्या असलेल्या व्यक्तींनाही याचा फायदा होऊ शकतो. मात्र अतिथंड पाणी वापरण्याऐवजी सामान्य थंड किंवा कोमट पाणी वापरणे अधिक सुरक्षित आहे. नियमित सवयीने त्वचा निरोगी आणि तरुण दिसू शकते.

# हट्टी आणि आळशी टीनएजर्सचे करायचे काय?



आजकाल अनेक पालकांची तक्रार असते, की त्यांची किशोरवयीन मुले आळशी झाली आहेत, मोबाईलवर वेळ घालवतात, घरकाम करत नाहीत आणि जबाबदारी घेत नाहीत. पण प्रत्येक वेळी मुलांना 'आळशी' म्हणणे योग्य नसते. त्यांच्या वागण्यामागे काही खोलवर रुजलेली कारणे असू शकतात, ती समजून घेणे महत्त्वाचे आहे. मुले जेव्हा हट्टीपणा करतात, आळशीपणा करतात त्यावेळेला खरं म्हणजे आपल्या मनात स्वसंवादाची अर्थात सेल्फ टॉकची कॅसेट चालू असते. मानसशास्त्र बाजूला ठेवावे आणि दोन धपाटे घालावे किंवा शाब्दिक वाद करावा असे वाटत असते; परंतु आपल्या हट्टीपणाने आणि माझे ऐकत नाही म्हणजे काय या रागाने प्रश्न अधिकाधिक चिघळत जातात म्हणून खालील पद्धतीने परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न करायला हरकत नाही.

किशोरवयीन मुले दिवसभर खूप गोष्टींमध्ये व्यस्त असतात - शाळा, क्लासेस, खेळ, मित्र, इतर उपक्रम. त्यामुळे घरी आल्यावर ते थकलेले असतात. त्याशिवाय त्यांच्या मेंदूचा विकास अजून पूर्ण झालेला नसतो, त्यामुळे वेळेचे नियोजन, लक्ष देणे आणि निर्णय घेणे त्यांना कठीण जाते. अभ्यासाचा ताण, परीक्षांचा दबाव आणि भविष्यासंबंधी चिंता यामुळेही ते थकून जातात किंवा काहीच करायची इच्छा राहत नाही. - मोबाईल, सोशल मीडिया यामुळे झोप कमी होते आणि त्यामुळे ऊर्जा कमी वाटते. तसेच प्युबर्टीमुळे शरीरात आणि मनात मोठे बदल होतात. मित्रांचा प्रभावही खूप महत्त्वाचा असतो.ते जे करतात, तेच करण्याची मुलांची प्रवृत्ती असते.कधी कधी 'आळशीपणा' हा खरं तर आळशीपणा नसतोच. तो चिंता , नैराश्य किंवा इतर मानसिक समस्यांचा संकेत असू शकतो. जर मुलाच्या वागण्यात अचानक बदल दिसला - जसे की आधी खूप ॲक्टीव्ह असलेले मूल अचानक शांत झाले तर तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. मुलांना 'आळशी' असा शिक्का मारणं टाळायला हवे, कारण त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होऊ शकतो.पालकांसाठी सर्वात मोठं आव्हान म्हणजे, अशा परिस्थितीत शांतपणे आणि समजून घेऊन प्रतिक्रिया देणे. उदाहरणार्थ, मुले सोफ्यावर बसून खायला आणायला सांगतात तेव्हा आपल्याला राग येतो. पण रागावण्याऐवजी शांतपणे 'तू स्वतः घेऊन खाऊ शकतोस' असे सांगणे योग्य ठरते. - मुले मोबाईलमध्ये गुंतून तुमचे बोलणे ऐकत नाहीत, तेव्हा ओरडण्याऐवजी 'फोन थोडा वेळ बाजूला ठेव' असे सांगणे अधिक परिणामकारक असते. त्यांच्या खोलीचा पसारा पाहून लगेच रागावण्याऐवजी त्यांना थोडी मदत करून सुरुवात करायला प्रोत्साहित करणे उपयोगी ठरते. -घरात पसारा करून झोपल्यावर त्यांना शिक्षा देण्याऐवजी 'हे साफ केल्याशिवाय बाहेर जायचे नाही' असा नियम ठेवता येतो. यामुळे त्यांना जबाबदारीची जाणीव होते.काही मुले दिवसभर त्यांच्या खोलीत राहतात. अशावेळी त्यांना जबरदस्तीने बाहेर काढण्याऐवजी, 'आराम कर, पण काहीतरी वेगळंही कर' असे सांगणे चांगले. जसे की चालायला जाणे, काहीतरी क्रिएटीव्ह करणे किंवा व्यायाम करणे. - अभ्यासाच्या बाबतीत, मुले काम करत नाहीत तेव्हा त्यांना 'हे तुझे काम आहे' असे ओरडण्याऐवजी त्यांच्याशी संवाद साधणे महत्त्वाचे आहे. त्यांना विषय कठीण वाटतोय का, शिक्षक आवडतो का किंवा मदतीची गरज आहे का हे विचारणे गरजेचे आहे.

कधी कधी मुले काम अर्धवट करतात.अशावेळी त्यांना दोष देण्याऐवजी त्यांनी काय चुकवले ते दाखवून पूर्ण करायला सांगावे. यामुळे त्यांना काम नीट करण्याची सवय लागते.काही वेळा मुले पालकांवर ओरडतात किंवा घाई करायला सांगतात. अशावेळी शांत राहून 'ओरडून काही उपयोग नाही' असे सांगणे योग्य आहे.

शेवटी, किशोरवयीन मुलांचे असे वागणे तात्पुरते असते. या काळात त्यांना समजून घेणे, त्यांच्याशी संवाद ठेवणे आणि संयमाने वागणे खूप महत्त्वाचे आहे. ही वेळ त्यांना शिकवण्याची आणि त्यांच्याशी नातं मजबूत करण्याची असते. थोडक्यात, मुलांना दोष देण्याऐवजी त्यांच्या भावना समजून घेतल्या तर पालक आणि मुलांचे नाते अधिक चांगले होऊ शकते. मुले पंधरा-सोळा वर्षांची आहेत म्हणून आपण त्यांच्या वयाचे होऊन जर तसेच वागू लागलो, तर अशा परिस्थितींना हाताळणे कठीण होऊन बसते. याकरिताच आपल्याला काही गोष्टी ठामपणे सांगाव्या लागतील. प्रसंग हाताळावे लागतील म्हणजे काही वर्षांपुरते येणारे हे वादळ आपल्याला शांत करता येते.

**डॉ. स्वाती गानू**

# प्रभातची आर्या राठी ९९.८० टक्के गुण घेऊन अव्वल

## सीबीएसई दहावी निकाल : शुभ पटेल ९९.४० टक्के घेऊन दुस-या स्थानावर

■ प्रतिनिधी | अकोला ■

*सीबीएसई दहावीचा निकाल नुकताच जाहिर झाला असून अकोला येथील प्रभात किड्स स्कूलची विद्यार्थीनी आर्या राठी हिने ५०० पैकी ४९९ (९९.८० टक्के) गुण घेऊन अव्वल स्थान पटकाविले आहे. तसेच शुभ पटेल या विद्यार्थ्याने ९९.४० गुण मिळवून दुसरा क्रमांक मिळविला आहे. आर्याला ४ विषयात १०० पैकी १०० गुण असून एका विषयात ९९ गुण आहेत.*

त्यासोबतच शरयु राऊत ९८.८०, गायत्री येवले ९८.२०, स्वराली जामकर ९८.२०, समृद्धी अंधारे ९८.००, यथार्थ माणिकराव ९८.००, अक्षरा इंगळे ९८.००, क्रीष्णा भुजाडे ९८.०० टक्के, सार्थक नागे ९७.८०, प्रणाली खांदेल ९७.८०, गार्गी

गरकल ९७.८०, पार्थ इंगवले ९७.८०, रजत तायडे ९७.६०, यश गिरी ९७.६०, अंजली वाकोडे ९७.००, पार्थ देशमुख ९६.८०, सर्वेश धोलवडे ९६.८०, अन्वी जायभाये ९६.८०, आदित्य बाहेकर ९६.६०, रैवत देशपांडे ९६.६०, शरवरी गरकल ९६.६०, श्रावणी ढोरे ९६.६०, समर शिंदे ९६.६०, शाश्वत महल्ले ९६.२०, अर्णव टोंगसे ९६.२०, अलंकार डंबाळे ९६.२०, प्रणिल नावकार ९६.००, आर्यन उन्हाळे ९६.००, माही अग्रवाल ९६.००, श्रीशांत सुर्यवंशी ९५.८०, जान्हवी तराळे ९५.८०, राशी खवले ९५.८०, श्रावणी कवलकर ९५.८०, अथर्व आखरे ९५.८०, आरुष घोडे ९५.६०, सई देशमुख ९५.६०, रितीका आलिमचंदानी ९५.६० यांना ९६ टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले.



याशिवाय परीक्षेला बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी १०२ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत.

एकूण ६३ विद्यार्थ्यांनी विविध विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त करून सीबीएसई बोर्डात प्रथम येण्याचा मान प्राप्त केला आहे. याशिवाय गणित विषयात ११ जणांना ९० पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. मराठी विषयात १० विद्यार्थ्यांना १०० पैकी १०० गुण मिळाले असून ७८ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण आहेत. संस्कृत विषयांमध्ये १४ विद्यार्थ्यांना पैकीची पैकी गुण मिळाले असून ५२ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण आहेत. हिंदी विषयांमध्ये ११ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. विज्ञान विषयांमध्ये २ विद्यार्थ्यांना पैकीचे पैकी गुण मिळाले असून ५९ विद्यार्थ्यांना ९० पेक्षा जास्त गुण आहेत. समाजशास्त्र विषयात १ विद्यार्थी पैकीचे पैकी मिळवून अव्वल ठरला आहे. तर १०१ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण आहेत. माहिती व तंत्रज्ञान विषयात ३३ विद्यार्थ्यांना पैकीचे पैकी गुण मिळाले असून १५८ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. इंग्रजी विषयांमध्ये ३ विद्यार्थ्यांना पैकीचे पैकी गुण मिळाले असून १०७ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत.

सर्व यशस्वी गुणवंतांचे प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, व्यवस्थापक अभिजीत जोशी, समन्वयक मो. आसिफ, सीबीएसई समन्वयक प्रशांत होळकर, स्पर्धा परीक्षा प्रमुख व्ही अनुराधा यांनी अभिनंदन केले.

# रोजगार हमी योजनेतील प्रलंबित कामे तात्काळ मार्गी लावा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजुरीसाठी सादर केलेली विविध कामे अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर प्रलंबित कामांना तात्काळ मंजुरी देऊन ती मार्गी लावावीत, अशी मागणी पातूर पंचायत समितीचे माजी उपसभापती इमरान खान व वंचित बहुजन आघाडीच्या तालुकाध्यक्ष सौ. अर्चना विष्णू डाबेराव यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी १३ एप्रिल रोजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. निवेदनात नमूद केल्यानुसार, रोजगार हमी योजनेअंतर्गत विहिरी, गोठे तसेच इतर शेतीपूरक कामांचे प्रस्ताव पंचायत समिती, पातूर येथे सादर करण्यात आले होते.

## पातूर पंचायत समितीचे माजी उपसभापतींचे सीईओंना निवेदन; शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी



मात्र, संबंधित विभागाकडे हे प्रस्ताव मागील सुमारे आठ महिन्यांपासून प्रलंबित आहेत.

या विलंबामुळे शेतकऱ्यांची कामे रखडली असून आर्थिक अडचणींमध्ये भर पडत आहे. काही विहिरींच्या कामांना मंजुरी मिळूनही जिओ-टॅगिंग प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसल्याने प्रत्यक्ष कामांना सुरुवात होत नसल्याची बाबही निवेदनात अधोरेखित करण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रलंबित प्रस्तावांना तातडीने मंजुरी देऊन जिओ-टॅगिंग प्रक्रिया पूर्ण करावी, तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनाकडून लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षा तालुक्यातील शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# 'खम्मा खम्मा हो म्हारा रुणीछे रा' भजनांनी दुमदुमले अग्रसेन भवन



■ प्रतिनिधी | अकोला ■

लाखो भक्तांचे तारणहार रामसा पीर रामदेवबाबां यांचा संगीतमय जम्मा जागरण उत्सव स्थानीक अग्रसेन भवनात मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला. यजमान दीपक तिवारी, गिरीधर तिवारी व मनिष तिवारी कुटुंबीयांच्या वतीने आयोजित या संगीतमय जम्मा जागरणात भजनकार व गायक राजेश सोमानी यांनी रामसा पीर रामदेवबाबांच्या पर्च्यांचे बखान केले. रामदेवबाबा हे राजस्थानच्या पोखरण येथील राजा अजमलजी यांच्या घरी ६८७ वर्षांपूर्वी प्रकट झालेले भगवान कृष्णाचे रूप आहेत. कलियुगातील वाढती सामाजिक विषमता, सामाजिक भेदभाव त्यांनी नष्ट करून सामाजिक सौहार्द प्रस्थापित करण्यासाठी भगवंत रामदेवबाबा रूपात अवतरले. बाबांनी भक्तांना पर्चे दिलीत, या २४ पर्च्यांचे वर्णन प्रत्येक जागरण उत्सवात केले जाते. अग्रसेन भवनात या उत्सवात रामदेवबाबांचा दिव्य दरबार, घोडा झाकी, पालखी साकार करून दिव्य ज्योत सजवली गेली होती. त्यावेळी शेकडो महिला-पुरुष भक्तांनी दिव्य ज्योतीचे दर्शन घेऊन उत्सवाचा लाभ घेतला. उत्सव प्रारंभी यजमान दीपक तिवारी, गिरीधर तिवारी व मनिष तिवारी कुटुंबीयांनी बाबांची पूजा-अर्चना करून सामूहिक आरती करून उत्सवाची सुरुवात केली.

# तेल्हारा येथे शिवसेनेची आढावा बैठक संपन्न

## प्रत्येक गावात संघटन मजबूत करण्याचे डॉ. राजन साळवी यांचे आवाहन

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार १३ ते १७ एप्रिल दरम्यान अकोला लोकसभा मतदारसंघात तालुकानिहाय संघटन दौरा आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्याची जबाबदारी अकोला लोकसभा संपर्क प्रमुख माजी आमदार डॉ. राजन साळवी यांच्याकडे सोपविण्यात आली असून, त्याअंतर्गत १४ एप्रिल रोजी तेल्हारा येथील विश्रामगृहात तालुकास्तरीय आढावा बैठक पार पडली.



या बैठकीत डॉ. राजन साळवी यांनी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना संघटन बळकट करण्यावर भर दिला. तालुका व शहरातील प्रत्येक गावात शिवसेना भक्कमपणे उभी राहिली पाहिजे, यासाठी युवासेना, महिला आघाडी आणि विविध आघाड्यांनी सक्रिय भूमिका बजवावी, असे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीस शिवसेनेचे उपनेते माजी आमदार गोपिकीशन बाजोरीया, जिल्हाप्रमुख माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, उपजिल्हा प्रमुख संजय अढाऊ, अकोट विधानसभा समन्वयक विशाल इंगोले, प्रा. प्रकाश डवले, महिला आघाडी संघटीका राऊत ताई आदी प्रमुख उपस्थित होते. तसेच तालुकाप्रमुख प्रविण वैष्णव, शहरप्रमुख अनिकेत ढवळे, उपतालुकाप्रमुख पिंटू पाटील, फोकमारे, अतुल घंगाळ, अनिल घोगले, संजय लांडे, सुधाकर हागे, सचिन सातारकर, निखिल हिवराळे यांच्यासह युवासेना व आदिवासी संघटनांचे पदाधिकारी, तसेच शिवसेनेचे आजी-माजी पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते. बैठकीचे आयोजन व प्रास्ताविक प्रविण वैष्णव यांनी केले.

### जाहीर नोटीस

कि. फौ. अर्ज क्रमांक: २०२०/२०२२
हिना परवीन वि. मोहसीन शाह
चौ. ता. ०६/०५/२०२६

दिवाणी प्रक्रिया संहिता, ऑ.५ नि.२० अन्वये जाहीर नोटीस प्रसिध्द करणेबाबत....

**वि. अति मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट क्र. १०, जि. अकोला यांचे न्यायालयात**

हिना परवीन विरुध्द -तक्रारकर्ती/फिर्यादी.
विरुध्द
मोहसीन शाह -
अर्जदार: हिना परवीन
गैरअर्जदार : मोहसीन शाह

संदर्भ: कि. फौ. अर्ज क्रमांकः २०२०/२०२२ हिना परवीन वि. मोहसीन शाह या प्रकरणात नि.१४ वर ऑप रूल २० नुसार दैनिक वृतपत्रात नोटीस जाहीर करणेसाठीचा अर्ज मंजूर

ज्याअर्थी अर्जदाराने दिवाणी प्रक्रिया संहिता, ऑ.५ नि.२० नुसार अर्ज सादर केला व तो मंजूर करण्यात आला गैरअर्जदार क.१ मोहसीन शाह हुसैन शाह रा. जावरीपूरा जवळ मदरसा, जळगाव जामोद ता. जळगाव जामोद जि. बुलढाणा

त्याअर्थी सदर अर्जामध्ये गैरअर्जदार क. १ यांनी या न्यायालयात दिनांक. ०६/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: हजर राहणे अन्यथा आपल्या विरूध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात येईल हयाची नोंद घ्यावी. आज दि. १५ माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्कयानिशी दिली आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
कनिष्ठ लिपीक,
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट १० अकोला

### जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११८/२०२६ — प्रोसेस नं.३३९/२०२६
चौ.ता. ०२/०५/२०२६ — दिनांक : ३०/०३/२०२६

**अर्जदार :** १)शोभा अशोक छळकर (मराठा) -वय ७० वर्षे, धंदा- घरकाम
२)मंगला अशोक छळकर (मराठा) - वय ३५ वर्षे, धंदा - घरकाम
३)दिपक अशोक छळकर (मराठा) -वय ३० वर्षे, धंदा - मजुरी
४)राणी विनोद तिडके - वय २७ वर्षे, धंदा - घरकाम

अर्जदार क. १ व २ रा. मालेगांव बाजार, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क. ३, ४ रा. गल्ली नं. ०६, अंबिकानगर, मुकुंदवाडी, जि. औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद अर्जदार क. ४ रा. संतोषी माता नगर, मुकुंदवाडी, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ४ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ४ चे वडील मयत नामे अशोक शंकरराव छळकर (मराठा) हे दि. १७/०२/२०२४ रोजी मौजे मालेगांव बाजार, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झालेले आहेत त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत दिनांक ०२/०५/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क-स्तर तेल्हारा

### जाहीर नोटीस

**विद्यमान जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति. सत्र न्यायाधीश, अकोला यांचे न्यायालय**

गैरअर्जदार/गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस

प्रोसेस नं.१४९८/२०२६ — तारीख : १३/०४/२०२६
Civil M.A. No. 211/2026 — Fix for: 09/06/2026

1) Ambrish Ashokrao Deshmukh, 2) Sau. Ankita Ambrish Deshmukh, 3) Master Aarav Nikhil Deshmukh, All R/o House No. 49 A Yewata Road, Near D. D. Convent, Behind Shriram Apartment, Shivapur, Akola Tq. and Dist. Akola

**Vrs --- Nil**

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी 'जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति. सत्र न्यायाधीश, अकोला' या न्यायालयामध्ये 'DECLARATION OF ADOPTION UNDER SECTIONS 56 AND 58 OF THE JUVENILE JUSTICE (CARE AND PROTECTION OF CHILDREN) ACT, 2015 READ WITH ADOPTION REGULATIONS, 2022 (SCHEDULE XXXII) 'दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख ०९/०६/२०२६ ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वतः किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला ०९/०६/२०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक १३ माहे एप्रिल सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
न्यायीक विभाग जिल्हा न्यायालय अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४८२/२०२६ — प्रोसेस नं.४४४३/२०२६
चौ.ता. १७/०६/२०२६ — दिनांक : ०२/०४/२०२६

**अर्जदार :** निर्मलाबाई रामभाउ काळे रा. व्दारा मंगेश काळे, 'जय बजरंग कृपा', रिंग रोड, केशव नगर चौक जवळ, विजय विद्युत कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : संतोष रामभाउ काळे
**पत्ता :-** रा. व्दारा मंगेश काळे, 'जय बजरंग कृपा', रिंग रोड, केशव नगर चौक जवळ, विजय विद्युत कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत संतोष रामभाउ काळे यांचे दि. ०५/०८/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५७१/२०२६ — प्रोसेस नं.४९४८/२०२६
चौ.ता. ०९/०६/२०२६ — दिनांक : ०९/०४/२०२६

**अर्जदार :** १. किशोर रामराव शंखे २. रामराव किसन शंखे ३. विलास रामराव शंखे ४. छबू रामराव शंखे सर्व रा. कपिल नगर, खंडेलवाल कॉन्व्हेंटच्या मागे, गौरक्षण रोड, अकोला, ता. जि. अकोला. ४४४००४

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कु. शकुंतला रामराव शंखे
**पत्ता :-** रा. कपिल नगर, खंडेलवाल कॉन्व्हेंटच्या मागे, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कु. शकुंतला रामराव शंखे यांचे दि. ०७/०३/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.


त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०४/२०२६ रोजी साझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

■ प्रतिनिधी | अकोट ■





**- समताधिष्ठित समाजाचा संदेश देणारी भव्य शोभायात्रा**
**- विविध सांस्कृतिक उपक्रमांनी गाव दुमदुमले**

भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांची १३५ वी जयंती अकोट येथील त्रिमूर्ती प्रतिष्ठानतर्फे अत्यंत उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य, दिव्य आणि उद्बोधनात्मक शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

संपूर्ण गावातून डॉ. आंबेडकर यांच्या विचारांना उजाळा देत काढण्यात आलेल्या या शोभायात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शोभायात्रेत शाळकरी विद्यार्थ्यांनी लेझिम, नृत्य, देशभक्तीपर गीत तसेच लाठी-काठीचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

शोभायात्रेचे ठिकठिकाणी विविध धर्मीय नागरिकांच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी सहभागी नागरिकांना पाणी व शरबताचे वाटप करून सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला.

यावर्षीच्या शोभायात्रेची संकल्पना 'समताधिष्ठित समाज' अशी ठेवण्यात आली होती. त्यामुळे सर्वत्र बंधुता, समता आणि सामाजिक सलोखा यांचा प्रभावी संदेश पोहोचवण्यात आला. महिला वर्गाने 'भीमस्तुती' सादर करत घोषवाक्ये व पाळणा गायन करून कार्यक्रमात विशेष रंगत आणली. जयंतीनिमित्त धम्मचर्चा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आणि व्याख्यानमाला अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती उत्सव समितीचे प्रमुख स्वप्निल सरकटे, विलास सरकटे, भास्कर पोहोरकर, शुभम सरकटे, सचिन सरकटे, सुधीर पळसपगार, संदीप सरकटे, राजकुमार सरकटे, सतीश भरक्षे आणि बोधानंद आरख यांनी विशेष परिश्रम घेतले.

त्रिमूर्ती प्रतिष्ठानचे अध्यक्ष शेषराव सरकटे, मनिष सरकटे, सचिन सरकटे, रंजित सरकटे, दिलीप भरक्षे, विकास सरकटे आणि राहुल सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. शोभायात्रेचे संचलन वानखडे गुरुजी यांनी केले, तर प्रास्ताविक त्रिमूर्ती प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष मनिष सरकटे यांनी मांडले. या कार्यक्रमास त्रिमूर्ती प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, माजी शिक्षक गाढे गुरुजी, पत्रकार राजकुमार वानखडे, खन्नाडे मॅडम तसेच सर्व समाजघटकातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उष्माघात दक्षतेबाबत जनजागृती करा; यंत्रणा सुसज्ज ठेवा; जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

## जिल्हाधिकारी कार्यालयात उष्माघात उपाययोजनांबाबत आढावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात वाढते तापमान, उष्मालाटेचा इशारा लक्षात घेता दक्षतेबाबत प्रभावी जनजागृती करावी, तसेच सर्व रूग्णालये, यंत्रणा सुसज्ज ठेवाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

उष्माघात उपाययोजनांबाबत आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.आरती फुलवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता डॉ.संजय सोनूने आदी यावेळी उपस्थित होते.



प्रत्येक आरोग्य संस्थेत उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आला आहे. जिल्ह्यात शासकीय रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्रा. आ. केंद्र येथे १३७ खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. ओआरएस व औषधसाठा पुरेसा ठेवावा. त्याचप्रमाणे, नागरिकांमध्ये उष्माघातापासून दक्षता बाळगण्याबाबत प्रभावी जनजागृती करावी. ग्रामीण भागात दवंडी देऊन जनजागृती करावी महापालिका क्षेत्रात कचरा घंटागाडीमार्फत माहिती द्यावी. त्याचप्रमाणे, शहरात व जिल्ह्यात होर्डिंग्ज, सूचना, ध्वनीचित्रफीती आदींद्वारे प्रभावी जनजागृती करावी. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.

कामगारांसाठी आस्थापनांनी पेयजल, कुलर आदी सुविधा ठेवाव्यात. उन्हात काम करणे टाळावे. उन्हात जास्त वेळ श्रमाची कामे करणे, कारखान्यांच्या बॉयलर रूममध्ये काम करणे, काच कारखान्यांतील कामे किंवा जास्त तापमानाच्या खोलीत काम करणे यामुळे उष्माघाताचा धोका वाढतो. पाच वर्षांखालील मुले, ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला तसेच गंभीर आजारांनी ग्रस्त व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

उष्माघाताची लक्षणे दिसल्यास तातडीने रुग्णाचे शरीर तापमान कमी करण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार घ्यावेत. शरीराला घाम येणे, जास्त तहान लागणे, त्वचा कोरडी पडणे, १०२ अंशांपेक्षा जास्त ताप येणे, चक्कर येणे, डोकेदुखी, अस्वस्थता, उलटी किंवा बेशुद्धावस्था ही उष्णतेमुळे होणाऱ्या आजाराची लक्षणे आहेत, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी दिली. डॉ. मेश्राम, आर डी सी मालथने, डॉ.जावेद खान आदी उपस्थित होते.

आरोग्य विभागामार्फत पोस्टर, बॅनर आणि हस्तपत्रिकांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. उष्माघात टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आरती कुलवाल यांनी केले आहे

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १३२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# महामानवापुढे जिल्हा नतमस्तक !

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ नृत्य आणि लेझीम चे अप्रतिम सादरीकरण



**प्रिशा डान्स अकॅडमी चा उपक्रम**

**वर्धा/ जनमाध्यम**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त प्रिशा डान्स अकॅडमीच्या वतीने रोड शो करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा सिव्हिल लाईन येथे बुद्ध भीम गीतांवर २०० महिलांनी पारंपरिक कर्ण कर्कश डी.जे.ला नकार देत नृत्य व लेझीमचे सादरीकरण करत नृत्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यात आली. ग्रामीण भागातील महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून सर्व महिलांना दोन महिने मोफत प्रशिक्षण प्रसिद्ध नृत्य प्रशिक्षक संदीप वरके यांनी दिले. लेझीम पथकाला मार्गदर्शन सुनील ढाले, मनोज खैरकार, चंद्रशेखर बाचले, रिता वानखेडे, प्रवीण बनसोड, प्रीती गोटे इत्यादींने केले. पथक प्रमुख म्हणून मंदाताई नाखले व देवता कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. सावंगी (मेघे )लेझीम ग्रुपच्या प्रमुख शुभांगी पाटील, किरण गावंडे,आंजी,डोरली, धुळवा दयावंती बलवीर, पवणार प्रगती आठवणकर, महाकाळ नीलू धवणे यांनी जबाबदारी पार पाडली. लेझीम पथकाला भेट देत अभिनंदन जिल्हाधिकारी वांमती सी. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोनंम, समाज कल्याण आयुक्त केदार यांनी सर्व महिलांचे व प्रशिक्षक संदीप वरके यांचे अभिनंदन केले. यशस्वी साठी तक्षशिला वसाहत सावंगी (मेघे) डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे सहकार्य लाभले.

## विरूळ येथे 'जय भीम'चा जल्लोष

**विरूळ आकाजी -** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विरूळ परिसरात सर्वत्र उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. गावातील विविध ठिकाणी सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून अभिवादन करण्यात आले.ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अभिवादन केले. तसेच नेहरू विद्यालय, मॉडेल हायस्कूल, जिल्हा परिषद कन्या शाळा आणि जिल्हा परिषद केंद्र शाळा येथेही जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम घेण्यात आले.विद्यार्थ्यांनी भाषणे,गीतांद्वारे आणि विविध उपक्रमांतून बाबासाहेबांच्या विचारांचा जागर केला.

संध्याकाळी बौद्ध बांधवांच्या वतीने ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावातील प्रमुख मार्गांवरून निघालेल्या या मिरवणुकीत 'जय भीम'च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. विविध आकर्षक रोषणाईमुळे गाव उजळून निघाले होते.दरम्यान,भवानी वॉर्ड येथील विहारात सायंकाळी सात वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा संदेश देणारी ही जयंती विरूळमध्ये मोठ्या उत्साहात साजरी झाली.

## समाजात एकोपा आणि आपुलकीची भावना निर्माण करणे गरजेचे - इमरान राही

**वर्धा/ जनमाध्यम**

समाजात एकोपा आणि आपुलकीची भावना निर्माण करणे ही काळाची गरज असून त्यातूनच लोकशाही अधिक बळकट होऊ शकते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक इमरान राही यांनी केले. ऑल इंडिया समता सैनिक दल, वर्धा यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे आयोजित संविधान वितरण व लोकशाही विषयक परिसंवादात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या तत्वांवर आधारित समाजरचना मांडली. त्यांनी दिलेले संविधान सर्व नागरिकांना समान हक्क देणारे आहे.'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा त्यांचा संदेश आजही प्रेरणादायी असल्याचे राही यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिल खडतकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून विनोद जवादे, डॉ. मिलिंद सवाई, राजू लभाणे, रमेश निमसडकर, सुनील बाभळे आदी उपस्थित होते. यावेळी विविध वक्त्यांनी लोकशाही मूल्यांवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात सुमारे २०० संविधानांच्या प्रतींचे वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन चरण गायकवाड यांनी केले, तर आभार लीना पाटील यांनी मानले. कार्यक्रमास नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली.

## नवचैतन्य बुद्ध विहार समितीच्यावतीने महामानवांना अभिवादन

**सेलू/ जनमाध्यम**



महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त नवचैतन्य बुद्ध विहार समिती, सेलू यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करून अभिवादन करण्यात आले. ११ एप्रिलपासून सुरू झालेल्या सांस्कृतिक उपक्रमांची सांगता १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात पार पडलेल्या बक्षीस वितरण सोहळ्याने झाली.

कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक पंचशील ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी शैलेंद्र दप्तरी होते. प्रमुख पाहुणे म्हणून किशोर इरपाते,संदीप सांगोळकर, वैशाली पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.महापुरुषांचे विचार तरुण पिढीपर्यंत पोहोचावेत या उद्देशाने वक्तृत्व, गायन व रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली कला सादर केली. विजेत्यांना रोख पारितोषिके, संविधानाच्या प्रती, प्रमाणपत्रे व विचारांची पुस्तके देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवीनकुमार पाटील यांनी केले. सूत्रसंचालन विशाल नगराळे यांनी तर आभार बबन जामनकर यांनी मानले. कार्यक्रमास नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

## 'जल्लोष भीमजयंतीचा, सूर भीमक्रांतीचा'

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) हिंगणघाटच्या वतीने 'जल्लोष भीमजयंतीचा, सूर भीमक्रांतीचा' या सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमासह भव्य शोभायात्रेच्या स्वागत समारंभाचे आयोजन



करण्यात आले.

वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी चौक येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. अंतनार्द म्युझिकल ग्रुपच्या सादरीकरणातून भीमगीतांचे सादरीकरण करण्यात आले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी उपस्थितांना प्रेरित केले.

कार्यक्रमाला विदर्भ विकास आघाडीचे अनिल जवादे, अशोक रामटेके, नगरसेवक सोनू गवळी, माजी नगरसेवक अशोक पराते, दशरथ ठाकरे, शहराध्यक्ष बालू वानखेडे, अमोल बोरकर, विजय तामगाडगे, समाजसेवक देवा कुबडे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी निघालेल्या भव्य शोभायात्रेत बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित देखावे सादर करण्यात आले.

विविध मंडळांच्या वतीने अतुल वांदिले यांचे वृक्ष देऊन स्वागत करण्यात आले.

शिक्षित व्हा, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. एकंदरीत, भीमजयंतीचा हा सोहळा शिस्तबद्ध व उत्साही वातावरणात पार पडत नागरिकांनी एकत्र येऊन महामानवाला अभिवादन केले.

## भीमजयंती उत्साहात साजरी

**सिंदी (रेल्वे)/ जनमाध्यम**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सिंदी रेल्वे येथे एम. ढोबळे इन्शुरन्स परिवारातर्फे भीमजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. बस स्टॉप चौक, पालीवाल कॉम्प्लेक्स परिसरात आयोजित कार्यक्रमात सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले.

कार्यक्रमाची सुरुवात बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर परिसर आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. फटाक्यांच्या आतषबाजीसह 'जय भीम'च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले.उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेता, नागरिकांसाठी थंड पाणी, शीतपेय व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. शेकडो नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमाला कांता ढोबळे, नेत्रा ढोबळे, नंदा सेलकर, नरेंद्र ढोबळे, सुमित ढोबळे, मोनिषा ढोबळे, वैभव ढोबळे, बुलबुल ढोबळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रज्वल थूल, अक्षय भगत, सचिन काटोले, बिपिन जाधव, सागर मसराम, करण मेंढे, यशवंत थूल, प्रणय धाबर्डे, शुभम जुमडे, राजू कुरेशी यांनी परिश्रम घेतले.बहुजन समाजातील कार्यकर्ते व नागरिकांच्या उपस्थितीत हा सोहळा शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात पार पडला.

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष कार्यालयात



**वर्धा/ जनमाध्यम**

समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष कार्यालयात संयुक्तपणे उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी भैय्या देशकर व अॅड. बी. एन. हिवरे यांच्या हस्ते दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी नगरसेवक यशवंत झाडे, जिल्हा सचिव भैय्या देशकर, तालुका सचिव दुर्गा काकडे, शहर सचिव विनोद तडस आदी मान्यवर उपस्थित होते. आपल्या भाषणात यशवंत झाडे यांनी महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांनी सामाजिक, आर्थिक व राजकीय समतेसाठी आयुष्य वेचले असल्याचे सांगितले. मात्र आजही समाजात विषमता कायम असून गरिबी-श्रीमंतीची दरी कमी झालेली नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले.शिक्षणाच्या खासगीकरणामुळे गरिबांना अडचणी निर्माण होत असल्याचे सांगत, संघटित होऊन व्यवस्था परिवर्तनासाठी लढा देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

संविधानाचे रक्षण व त्यातील मूल्ये जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात प्रमोद धनविज, रमा चाटे, दुर्गा काकडे, भैय्या देशकर, डी. एन. हिवरे, प्रभाकर धवने, संजय भगत यांनी मार्गदर्शन केले. नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# संक्षिप्त

## शेतकऱ्याला मारहाण

**समुद्रपूर -** तालुक्यातील गोविंदपूर शेतशिवारात क्षुल्लक कारणावरून शेतकऱ्याला बेदम मारहाण केल्याची घटना उघडकीस आली. पुंडलिक पारखी (३५, रा. गोविंदपूर) हे शेतात बसले असताना स्वप्नील पोरके (रा. नारायणपूर झोटिंग) याने 'तू येथे बसून काय करतो' असा जाब विचारत शिवीगाळ केली. वाद चिघळताच त्याने पारखी यांना मारहाण केली. यात पारखी जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले.या प्रकरणी पारखी यांनी दिलेल्या तक्रारीवरून समुद्रपूर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला असून आरोपीचा शोध घेतला जात आहे. शेतशिवारात क्षुल्लक कारणावरून होणाऱ्या वादाच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांत चिंता व्यक्त केली जात आहे.

## युवकावर विळ्याने हल्ला; एक जखमी

**कारंजा (घा.) -** शहरातील ठाणेगाव बसस्थानक परिसरात एका युवकावर विळ्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली. साहील देहारे (२२) हा युवक तेथे उभा असताना मोहन बन्नगरे (रा. राहाटी) याने विनाकारण वाद घालत शिवीगाळ केली. त्यानंतर संतापाच्या भरात विळ्याने वार करून त्याला जखमी केले.जखमी युवकाला तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. तक्रारीवरून कारंजा पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला असून आरोपीला अटक करण्यासाठी पथके रवाना केली आहेत. शहरात वाढत्या मारहाणीच्या घटनांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## डॉक्टरच्या खोलीतून ३८ हजारांचा ऐवज चोरीला

**वर्धा -** सेवाग्राम परिसरात अज्ञात चोरट्याने डॉक्टरच्या खोलीतून लॅपटॉप व मोबाईलसह सुमारे ३८ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. डॉ. सिद्धांत सराफ हे समतानगर, वरुड येथे भाड्याने राहत असून ते सेवाग्राम रुग्णालयात कार्यरत आहेत.ते रात्री दरवाजा ओढून झोपले असताना अज्ञात चोरट्याने खोलीत प्रवेश करून दोन लॅपटॉप, एक मोबाईल व चार्जर असा ऐवज लंपास केला. सकाळी उठल्यानंतर चोरीचा प्रकार लक्षात आला. या प्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## अपघातातील जखमी वृद्धाचा मृत्यू

**वर्धा -** सेवाग्राम रोडवरील अपघातात गंभीर जखमी झालेल्या वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. किशोर वाघमारे हे सायकलने जात असताना दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते.त्यांना तातडीने सेवाग्राम रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या अपघातात दुचाकीचालक आर्यन गवळी (रा. पवनार) व त्याच्यासोबत असलेला व्यक्तीही जखमी झाले होते. या प्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी दुचाकीचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. वाढत्या अपघातांच्या घटनांमुळे नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## कामगार कल्याणासाठी 'बकाने' यांची धडपड

**देवळी/ जनमाध्यम**

बांधकाम कामगारांना शासकीय योजनांचा लाभ वेळेत व प्रभावीपणे मिळावा यासाठी आमदार राजेश बकाने यांनी पुढाकार घेत प्रशासनाला सजगतेचे धडे दिले. त्यांच्या कार्यालयात पार पडलेल्या आढावा बैठकीत कामगार कल्याणकारी मंडळाच्या कामकाजात सुसूत्रता आणि पारदर्शकता वाढवण्यावर भर देण्यात आला.

बैठकीत आयडब्ल्यूएमबीएस (ÿ) या ऑनलाइन प्रणालीच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. कामगारांची नोंदणी, नूतनीकरण आणि विविध योजनांचा लाभ देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ व वेगवान करण्याच्या सूचना देण्यात



### कामकाजात पारदर्शकतेवर भर

आल्या. कागदपत्रांच्या अडचणी किंवा तांत्रिक त्रुटींमुळे कामगारांना होणारा विलंब टाळण्यासाठी आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश बकाने यांनी अधिकाऱ्यांना दिले.स्थानिक व विभागीय सनियंत्रण समित्यांच्या कार्यपद्धतीतही बदल सुचवण्यात आले.

या समित्यांनी प्रत्यक्ष कामगारांपर्यंत पोहोचून त्यांच्या समस्या जाणून घेत तातडीने निवारण करावे, असे स्पष्ट करण्यात आले.बांधकाम कामगारांच्या कष्टांवरच विकास उभा आहे.

त्यामुळे कोणताही पात्र कामगार योजनांपासून वंचित राहू नये, असे बकाने यांनी सांगितले.बैठकीस सीमा शिंदे, प्रवीण शेंडे, प्रदीप राठोड, राहुल कदम यांच्यासह संबंधित अधिकारी व समिती सदस्य उपस्थित होते. या पुढाकारामुळे कामगार कल्याण योजनांना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## २० एप्रिल पासून प्रहारचे 'शौर्य शिबीर'



**वर्धा/ जनमाध्यम**

स्थानिक प्रहार समाज जागृती संस्थेच्या वतीने येत्या २० एप्रिल ते २३ एप्रिल दरम्यान निसर्ग सेवा समितीच्या ऑक्सिजन पार परिसरात प्रहारचे शौर्य तथा व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. सदर शिबिरात ९ वर्षावरील मुले मुली सहभागी होऊ शकतात.

या शिबिरात २१ प्रकारचे अडथळा पार प्रशिक्षण, रॉक क्लाइंबिंग, रेपेलिंग, जंगल भ्रमंती, जंगल खोज, बौद्धिक खेळ, व्यक्तिमत्त्व विकास, सैन्य दलात सहभागी होण्याकरिता मार्गदर्शन व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन राहील.इच्छुकांनी प्रहार संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन मोहन गुजरकर यांच्याशी ९४२२१४२५०७ या व्हाट्सअप क्रमांकावर संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करावा. सदर शिबिरात पहिल्या ५० मुला मुलींना सहभागी करण्यात येणार आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १३९

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१

फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## न.प. कर्मचाऱ्याचा अपघाती मृत्यू, शहरात हळहळ

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

मुलाच्या लग्नाच्या तयारीत रंगलेल्या घरावर नियतीने घाला घालत हिंगणघाट नगर परिषदेतील आरोग्य विभागातील कर्मचारी भारत चाफले (५५) यांचा अपघाती मृत्यू झाला. या घटनेमुळे शहरासह नगर परिषद वर्तुळात तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चाफले हे १४ एप्रिल रोजी मुलाला पुण्याला जाणाऱ्या रेल्वेत बसवण्यासाठी वर्धा येथे गेले होते. परतीच्या प्रवासात सायंकाळी साडेसातच्या सुमारास सोनेगावजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की, त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले.विशेष म्हणजे, आदल्या दिवशीच त्यांच्या मुलाचा 'साक्षगंध' समारंभ पार पडला होता आणि ५ मे रोजी विवाहाची तारीख निश्चित झाली होती. लग्नाच्या



आनंदात बुडालेल्या कुटुंबावर या घटनेने दुःखाचा डोंगर कोसळला आहे.कर्तव्यदक्ष व शांत स्वभावाचे कर्मचारी म्हणून ओळख असलेल्या चाफले यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे.दरम्यान, अज्ञात वाहनचालकाचा पोलिसांकडून शोध सुरू असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

## गोडाऊन जवळून ५० हजारांचे साहित्य लंपास

**वर्धा -** सावंगी मेघे परिसरात गोडाऊनजवळ ठेवलेले लोखंड व कॅटरिंग साहित्य चोरीला गेल्याची घटना समोर आली. अज्ञात चोरट्यांनी चार बोरी कटींग लोखंड, अॅल्युमिनियम पाइप व इतर साहित्य असा सुमारे ५० हजारांचा ऐवज लंपास केला.या प्रकरणी अक्षय मानकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून सावंगी मेघे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये काही संशयित दिसत असून पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली आहे. परिसरात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांनी सुरक्षा उपाययोजना वाढवण्याची गरज व्यक्त केली आहे.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# प्रगतिशील शेतकरी मोतीरामजी भुयार यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-**
अचलपूर येथील प्रगतीशील शेतकरी व व्यावसायिक मोतीरामजी गुलाबराव भुयार यांचे आज दुपारी १२.३० वाजता दीर्घ आजारानंतर दुःखद निधन झाले. ते ७० वर्षाचे होते. माहिती व जनसंपर्क विभागातील माहिती अधिकारी रितेश भुयार यांचे ते वडील आहेत. त्यांच्या मागे पत्नी वनमाला भुयार, दोन मुले मनीष व रितेश भुयार , सुना,नातवंड तसेच बराच मोठा आप्त परिवार आहे. अंत्यसंस्कार आज बुधवार दिनांक १५ एप्रिल रोजी दुपारी ५ वाजता



अचलपूर येथील जीवनपुरा स्थित हिंदू स्मशानभूमीत करण्यात आले. मोतीरामजी भुयार यांनी अचलपूर नगर परिषदेची नगरसेवक पदासाठी निवडणूक लढविली होती. मृत्यू पश्चात नेत्रदान करण्याचा व स्वतःच्या शेतातच त्यांची रक्षा व अस्थी पुरण्याचा संकल्प त्यांनी सोडला होता. सुरुवातीपासूनच सामाजिक कार्यात सहभागी होऊ त्यांनी अचलपूर व परिसरातील गरजू व गोर गरीब व्यक्तींना सदैव मदत केली. अनेकवेळा अचलपूरातील विलायतपुरा आणि परिसरातील गरिबांच्या अंत्यविधी त्यांनी स्वखर्चाने केल्या. ते स्वतः प्रगतिशील शेतकरी होते. त्यांनी व इतर शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या संत्रा व इतर फळबागातील फळांच्या विक्रीचा व्यवसाय केला. देशभरातील विविध व्यापारी मंड्यामध्ये त्यांनी खरेदी -विक्री व्यवसायाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत व्हावी असा कायम प्रयत्न केला.

**पाहिजे**

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
--पत्ता--
सी-१२, सातुर्णा, एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड, अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/८००७३४२३३५

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७०७/२०२६
**श्रीमती ताराबाई अधिक पाच -वि- निरंक**
पुढील ता.०६.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Tarabai Tikyaram Mata, Age about 71 Yrs. Occu.: Retired.
2. Shri Narendra Tikyaram Mata (Dead) through L.R's
   2(i) Khushi Narendra Mata, Age about 46 Yrs. Occu.: Housewife
   2(ii) Sakshi Narendra Mata, Age about 17 Yrs. Occu.: Education
   2(iii) Disha Narendra Mata, Age about 61 Yrs. Occu.: Education
   Appli.No.2(i) for herself and for Appli.No.(ii) & (2iii) being minor as natural guardian mother
   All Appli.No.1 to 2(iii) are R/o Near Shankar Nagar, Eknath Puram, Sai Nagar, Amravati
3. Sau.Sangita Jagyasi, Age about 53 Yrs. Occu.: Home Maker R/o Bhitriapada, Sundargarh, Tq.Dist.Sundargarh-770001 (Odisha)
4. Sau.Jyoti Nandkumar Taneja, Age about 51 Yrs. Occu.: Home Maker R/o Sindhi Colony, Ramnagar, Chandrapur, Tq.Dist.Chandrapur-442401
5. Sau.Kumkum Sanjay Jasuja, Age about 47 Yrs. Occu.: Home Maker R/o House No.29/294-2, Rajendra Ward, Jasuja Bhavan, Ganj, NBHS Vidyalaya, Ganj, Baitul, Tq.Dist.Baitul, MP - 460001

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Tikyaram Hoturam Mata हे दिनांक 11.08.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Tarabai Tikyaram Mata + 5 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Tarabai Tikyaram Mata + 5 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७३८/२०२६
**मनोहर व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Manohar Dnyaneshwar Radke, Age 61 Yrs. Occu.: Agriculturist R/o Winkar Wasahat, Plot No.330, Manewada Chowk, Nagpur.
2. Vijay Dnyaneshwar Radke, Age 51 Yrs. Occu.: Agriculturist R/o Kat Amla, Po.Uttamsara, Tq. Dist. Amravati.
3. Vandana Madhukar Punase, Age 62 Yrs. Occu.: Household R/o Kawatha (Shelu) Po.Hiwara Korde, Tq.Murtizapur, Dist.Akola
4. Aruna Dattatrayrao Patekar, Age 58 Yrs. Occu.: Household R/o Rajna Kajna, Tq. Dist. Amravati.
5. Kokila Dilip Navrange, Age 56 Yrs. Occu.: Household R/o Yeoti, Tq. N.Khandeshwar, Dist. Amravati.
6. Sunita Sanjayrao Hambarde, Age 54 Yrs. Occu.: Household R/o Veni Ganeshpur, Tq. Nand.Khandeshwar, Dist.Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **ज्ञानेश्वर शिवमरामजी रडके आणि विमल ज्ञानेश्वर रडके** हे अनुकमे दिनांक 04.09.2022 व 02.02.2022 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **मनोहर व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मनोहर व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६९४२०२६
**राकेश व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.११.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Rakesh Kisanlalji Gupta, Age 61 Yrs. Occu.: Business R/o Old Cotton Market, Oppo.Vijay Bank, Amravati
2. Rajesh Kisanlalji Gupta, Age 59 Yrs. Occu.: Business R/o Old Cotton Market, Oppo.Vijay Bank, Amravati
3. Mukesh Kisanlalji Gupta, Age 53 Yrs. Occu.: Service R/o Old Cotton Market, Oppo.Vijay Bank, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **गणेशीबाई किसनलालजी गुप्ता** व **किसनलाल घासीराम गुप्ता** हे दिनांक 09.11.2023 व 11.10.1976 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **राकेश ज्योती व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **राकेश व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६३६/२०२६
**ज्योती -वि- निरंक**
पुढील ता.०६.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Jyoti Dipak Gupta, Age 71 Yrs. Occu.: Household
2. Roshan Deepak Gupta, Age 50 Yrs. Occu.: Pvt.Job
3. Nilesh Dipak Gupta, Age 47 Yrs. Occu.: Service
   Appli.No.1 to 3 R/o Near Nemani Inn Power House Road, Shrikrushna Peth, Amravati
4. Amar Dipak Gupta, Age 48 Yrs. Occu.: Pvt.Job R/o D-1, Rajkalash Tower, Near Nawathe Plot, Swastik Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दिपक नथ्थुलालजी गुप्ता** हे दिनांक 18.09.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **ज्योती व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **ज्योती व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## अचलपूर नगर परिषद, अचलपूर
## जाहीर ई-निविदा सूचना क्र.०५/२०२५-२६ (फेरनिविदा)

मुख्याधिकारी नगर परिषद, अचलपूर, जि.अमरावती यांच्या वतीने न.प.निधी अंतर्गत विद्युत विभागातील कामाकरीता (**बी-१/बी-२**) दोन लिफाफा पध्दतीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे विद्युत शाखेकडील तथा शासनाचे ईतर विभागाचे विद्युत शाखेकडील योग्य त्या वर्गात पंजीबध्द कंत्राटदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. वरील कामांची निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) दिनांक १५.०४.२०२६ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

**(टिप - अटी व शर्ती तसेच सविस्तर निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)**

**(सौ.रुपाली अभय माथने)**
**अध्यक्ष,**
**नगर परिषद, अचलपूर**

शिक्का

**(धिरजकुमार गोहाड)**
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

---

## नगर परिषद कार्यालय, अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती (महाराष्ट्र)

**ई-निविदा सूचना**

**ई-निविदा सुचना क्र.१४० दिनांक १५.०४.२०२६ सन २०२६-२०२७**

नगर परिषद अंजनगांव सुर्जी च्या वतीने अंजनगांव सुर्जीच्या हद्दीत मुख्याधिकारी नगर परिषद, अंजनगांव सुर्जी यांच्या आदेशाच्या अधीन राहून तसेच प्राप्त निधीतून स्वच्छता विभागा अंतर्गत वार्षिक कामे महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत परवानाधारक कंत्राटदार यांच्याकडून वाहन चालक पुरवठा करणे, हेल्पर पुरवठा करणे, जे.सी.बी.पुरवठा करणे, पोकलॅण्ड पुरवठा करणे, IEC ची कामे करणे. ही कामे करण्याकरीता ई-निविदा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे. ई-निविदेच्या अटी व शर्ती, ई-निविदेची विस्तृत माहिती आणि कामाचा सविस्तर तपशील व नमुना शासनाच्या www.mahatender.gov.com.in या वेबसाईटवर दिनांक १६.०४.२०२६ पासून पाहण्यास उपलब्ध आहे. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक ३०.०४.२०२६ आहे.

**(अविनाश कृ.गायगोले)**
**अध्यक्ष,**
**नगर परिषद, अंजनगांव सुर्जी**

**(सौ.प्रियंका शंकरदादा मालठाणे)**
**उपाध्यक्षा,**
**नगर परिषद, अंजनगांव सुर्जी**

**(प्रविण देविदास नेमाडे)**
**सभापती**
**नगर परिषद, अंजनगांव सुर्जी**

**(विजय रु.लोहकरे)**
**मुख्याधिकारी (गट-अ)**
**नगर परिषद, अंजनगांव सुर्जी**

---

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **श्री.अमोल कृष्णराव उंबरकर**, रा.नरेडी नगर, व्हीएमव्ही कॉलेजच्या मागे, अमरावती यांनी नोंदणी पोटतुकडी अमरावती ग्रामीण वि.कचेरीचे कक्षेतील व अमरावती जि.प.च्या हद्दीतील मौजे नांदगांव पेठ-२, प्रगणे-नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती येथील वि.एस.डी.ओ.साहेब अम. यांचे फाईलवरील रे.के.नं. एन.ए.पी.-३४, नांदगांव पेठ-६/२०१०-११ नि.ता.२७.१२.२०१० नुसार अकृषक मंजूर झालेली जागा आहे. सदर जागेत ग्रा.पं.नांदगांव पेठ यांचे दिनांक ११.०१.२०११ रोजीचे पत्रान्वये वार्ड नं.३, मालमत्ता क्र.२५२५ (मौजा नांदगांव पेठ) स.नं.४४१/१-अ, १-ब, २, ३) मध्ये ठराव क्र.५/अ/१ दि.११.०१.२०११ नुसार नंतर ठराव क्र.७, दि.१७.०६.२०१४ बांधकाम नकाशा मंजूर करुन जागेवर बांधलेल्या बिझी लॅंड कॉम्प्लेक्स या ईमारतीतील ग्राऊंड फ्लोअर वरील खाजगी ब्लॉक ई मधील दुकान नं.८४ (चौऱ्यांशी) याचे एकुण क्षेत्रफळ ६४५.८४ चौ.फुट (६० चौ.मी.) आहे. मॅझनाईल २५८ चौ.फुट (२३.९७ चौ.मी.) अशा दुकान जागेचा सौदा ज्याची चतुःसिमा--

पुर्वेस - दुकान नं.८५
पश्चिमेस - दुकान नं.८२
उत्तरेस - रस्ता
दक्षिणेस - आर ब्लॉक विकत घेण्याचा सौदा मी १) **अमर मुकेशकुमार नवलानी, २) भजन मुकेशकुमार नवलानी**, दोन्ही रा.शिवकृपा कॉलनी, अमरावती यांचेशी दिनांक ०५.०३.२०२६ रोजी केला असून त्याप्रमाणे पक्षकारास ईसारचिठ्ठी करुन दिली आहे. सदर मिळकतीची लवकरच माझे पक्षकार रजिस्टर खरेदी नोंदविणार आहेत. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा काही हक्क संबंध, बोजा, गहाण, हितसंबंध किंवा निमसरकारी कर्ज किंवा कुठल्याही प्रकारचे खाजगी व नोंदणी असल्यास किंवा सामायिक हिस्सा व वारस हक्क, इतर काही वाद किंवा कायदेशीर आक्षेप असल्यास सदरहू नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मूळ दस्ताऐवजासह लेखी स्वरुपात आक्षेप नोंदवावा, अन्यथा सदर मिळकतीची नोंदणी खरेदी झाल्यानंतर कोणाचाही आक्षेप हरकत चालणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक १५.०४.२०२६

**(ॲड.योगेंद्र वाय.देशकर)**
प्रेरणा कॉलनी, राधानगर,
अमरावती
मो.९९७०९०५३११

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५८९/२०२६
**पुष्पा अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.२७.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Pushpa Dadarao Hushangabade, Age 73 Yrs. Occu.: Housework R/o Plot No.3, Friends Co-Op.Housing Society, VMV Road, Besides Ichchhamani Ganesh Mandir, Kathora Naka, Amrvati
2. Dr.Dipali Dadarao Hushangabade, Age 49 Yrs. Occu.: Medical Practitioner
3. Shri Nikhil Dadarao Hushangabade, Age 43 Yrs. Occu.: Service No.2 & 3 R/o Ravi Nagar, Nr.Sudhir Colony, Jatharpeth, Akola.
4. Sau.Jaee Dhananjay Patil, Aged 42 Yrs. Occu.: Service R/o Flat No.1101, C-Wing, La-Bllezza, Rishivan, Nr.Kajupada, Boriwali East, Mumbai-400066
5. Sau.Juee Yashpal Gudadhe, Aged 42 Yrs. Occu.: Service R/o Govt.Ministerial Quarter, Ravi Nagar, Nagpur.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Dadarao Daulatrao @ Daulatramji Hushangabade हे दिनांक 06.05.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Pushpa Dadarao Hushangabade + 4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Pushpa Dadarao Hushangabade + 4 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०९.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६१५/२०२६
**किरण अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२९.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kiran Shrichand Makhija, Age 58 Yrs. Occu.: HOusehold R/o Near Shiv Mandir, Rampuri Camp, Shivaji Nagar, Amravati.
2. Bharat Shrichand Makhija, Age 34 Yrs. Occu.: Business
3. Vijay Shrichand Makhija, Age 32 Yrs. Occu.: Business R/o Appli.No.2 & 3 R/o House No.21-B, Shegaon-Rahatgaon Road, Near Tulja Bhawani Mangal Karyalaya, Shivshakti Nagar, V.M.V.Amravati
4. Palak Ajay Nagdeo, Age 37 Yrs. Occu.: Household R/o Yavatmal Road, Behind Police Station, Sindhi Colony, Wani, Tq.Wani Dist.Yavatmal-445304

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Shrichand Murajmal Makhija हे दिनांक **०६.१०.२०१९** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Kiran Shrichand Makhija + 3 **निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Kiran Shrichand Makhija + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१७९/२०२६ ने.ता.०९.०६.२०२६

**अर्जदार :**
१. सविता सुधाकरराव वाकोडे, वय ५४ धंदा - घरकाम
२. रुपेश सुधाकरराव वाकोडे, वय ३४ धंदा - मजुरी
३. रणजीत सुधाकरराव वाकोडे, वय ३२ धंदा - मजुरी
सर्व रा.थुगांव पिंप्री पूर्णा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक सुधाकर किसनराव वाकोडे** यांचा मृत्यू दिनांक **२७.०२.२०२६** रोजी रा.थुगांव पो. पिंप्री पूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१७९/२०२०** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१३.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१७३/२०२६ ने.ता.०९.०६.२०२६

**अर्जदार :**
१. बाबुराव रुपराव ढोके, वय ६८ धंदा - शेती
२. आशा बाबुराव ढोके, वय ६६ धंदा - घरकाम
दोन्ही रा.चिंचोली काळे, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक दिपक बाबुराव ढोके** यांचा मृत्यू दिनांक **११.११.२०२५**रोजी जनरल हॉस्पीटल, अमरावती, ता. जि.अमरावती येथे झाला. ते कायमचे रा.चिंचोली काळे, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होते. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१७३/२०२०** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१३.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.७०२/२०२४ ने.ता.२१.०१.२०२५

**अर्जदार -** १. सुमित्रा गोपाल चोरे,
वय ८१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पिंपळखुटा (लहान), ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार चे वडील **नामे चंपतराव जयराम निंभोरकर** हे दि.**१२.११.१९७२** रोजी अमरावती, ता. जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १५.०४.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६६०/२०२६
**प्रभा राऊत अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.०२.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Prabha Balkrushna Raut, Age 70 Yrs. Occu.: Household R/o Old Town, Rahatgaon, Tq. Dist.Amravati
2. Manish Balkrushna Raut, Age 41 Yrs. Occu.: Labour R/o Rahatgaon, Shivaji Nagar, Amravati.
3. Ravindrarao Balkrushna Raut, Age 54 Yrs. Occu.: Labour R/o Near Lagade Kirana Shop, Rahatgaon Juni Vasti, Amravati
4. Rajendra Balkrushna Raut, Age 51 Yrs. Occu.: Labour R/o Rahatgaon, Shivaji Nagar, Amravati
5. Kalpana Bhaskar Gawande, Age 52 Yrs. Occu.: Household R/o Rahatgaon, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Balkrushna Rajaram Raut हे दिनांक 27.10.1997 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Prabha Balkrushna Raut + 4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Prabha Balkrushna Raut + 4 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

| | |
|---|---|
| फेरफार अहवाल/अर्ज क्र. | 48/2026 |
| सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक | **कार्यसिध्दी हनुमान विठ्ठल रुक्मिणी चॅरिटेबल ट्रस्ट, रघुनाथपूर पो.मोझरी, ता.तिवसा, जि.अमरावती** |
| बाबत अर्जदार - | **भैयासाहेब रंगराव बायस्कर** |

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - रु.१०,०००/- मात्र
(अक्षरी रुपये दहा हजार मात्र फक्त)

**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०८.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्यायशाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

**मा.सहदिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.८२/२०२६ ने.ता.०६.०५.२०२६

**अर्जदार :**
१. वत्सला नारायण सैरिसे, रा.साखरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. कल्पना विलास सैरिसे, रा.साखरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. अंकुश विलास सैरिसे, रा.श्रध्दा कॉलनी, साईनगर, अमरावती, ता.जि.अमरावती
४. शुभम विलास सैरिसे, रा.साखरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
५. अक्षय विलास सैरिसे, रा.साखरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **विलास नारायण सैरिसे** यांचा मृत्यू दि.**११.०७.२०१९** रोजी साखरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला असून ते तेथीलच मूळ रहिवाशी होते. मयतांचे अर्जदार नं.१ ही आई आहे, अर्जदार नं.२ ही पत्नी असून अर्जदार नं.३ ते ५ ही मुले आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **१८ मार्च २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**प्र.सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २१८
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

गुरुवार, १६ एप्रिल, २०२६
E-paper - www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# गौमातेची रक्ततूला करण्यासाठी मुस्लीम युवकाने केले सर्वप्रथम रक्तदान

## नगरसेवक आल्हाद कलोती ह्यांचा पुढाकार





**चिखलदरा/वार्ताहर**

चिखलदरा हे सामाजिक सौहार्दते साठी ओळखले जाते. हिंदू, मुस्लिम आणि सर्व धर्मीय येथे एकजुटीने राहतात. मागील नगरपरिषद निवडणुकीत हिंदू मतदारांनी मुस्लीम नगराध्यक्ष निवडून देऊन खऱ्या धर्मनिरपेक्षतेचे उदाहरण सर्वांसमोर ठेवले होते. आल्हाद कलोती, नगरसेवक, चिखलदरा नगरपरिषद यांच्या पुढाकाराने आयोजित रक्तदान शिबिरात याच सामाजिक अभिसरणाचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. गौमातेच्या रक्ततुलेसाठी आयोजित या शिबिरात चिखलदरा येथील मिस्त्री काम करणाऱ्या शेख इस्माईल शेख सुभान या मुस्लीम युवकाने सर्वप्रथम पुढे येऊन रक्तदान केले आणि सामाजिक सौहार्दाचा आणखी एक आदर्श संपूर्ण समाजासमोर ठेवला.

चिखलदरा येथील नगरसेवक आल्हाद कलोती यांच्या पुढाकाराने चिखलदऱ्याच्या ग्रामीण रुग्णालयात 'गोमाता' सन्मानार्थ आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरात परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत माणुसकीचे दर्शन घडवले. या सामाजिक उपक्रमातून एकूण २३ रक्ताच्या बाटल्यांचे संकलन करण्यात आले असून, दुर्गम भागातील रुग्णांसाठी हे रक्त वरदान ठरणार आहे.नगरसेवक आल्हाद कलोती यांच्या पुढाकाराने पार पडलेल्या या शिबिराचे उद्घाटन अत्यंत उत्साहात करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष वेदान्त सुपाले, नगरसेवक राजेश मांगलेकर, राजस्थान समाजाचे प्रमुख खेवराज तिवारी, प्रतिष्ठित नागरिक अनूप सोमवंशी, जितुजी पचोरी यांच्यासह आनंद गोर, प्रमोद उधे, पानुकर, गजानन रानवरे, नामदेव खडके, अनिल रानवरे, शुभम मिश्रा, अभिषेक मिश्रा, शिवम शर्मा आणि अशोक शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत अशा सामाजिक कार्याची गरज व्यक्त केली.

धारणी येथील शासकीय रक्त केंद्राच्या चमूने अत्यंत कार्यक्षमतेने रक्ताचे संकलन केले.शिबिरादरम्यान स्थानिक नेतेमंडळी, ठाणेदार आणि गावातील इतर प्रतिष्ठित नागरिकांनी प्रत्यक्ष भेट देऊन रक्तदात्यांचे मनापासून आभार मानले आणि उपक्रमाचे कौतुक केले. सहभागी झालेल्या प्रत्येक रक्तदात्याला सन्मानपूर्वक प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.आल्हाद कलोती यांनी या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व उपस्थितांचे आभार मानले. चिखलदऱ्याच्या या मातीत केवळ निसर्गसौंदर्यच नाही, तर लोकांच्या मनातही दातृत्वाची भावना ओसंडून वाहत असल्याचे या निमित्ताने पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# परमपूज्य सदगुरू श्री नानामहाराज पुण्यस्मरण महोत्सव उत्साहात

**नागपूर** - परमपूज्य सद्गुरू श्री नानामहाराज तराणेकर यांचा ३३ वा पुण्यस्मरण महोत्सव, श्रीनानामहाराज शिष्य परिवार भक्तमंडळाच्या वतीने अथर्वनगरी-३, बेसा, नागपूर येथे अत्यंत उत्साहात व भक्तिभावपूर्ण वातावरणात झाला.

या महोत्सवात भक्तमंडळातील डॉ.मिलिंद इंदूरकर,मीरा इंदूरकर, श्रेयस इंदूरकर, नेहा इंदूरकर, पुष्कर इंदूरकर, इंद्राणी इंदूरकर,नुपूर राजहंस, वेदांग राजहंस,माधव चौंगजकर, राधिका चौंगजकर, विनायक काळे, वैशाली काळे,सुमंत,सुहास जोशी, संध्या जोशी,रवींद्र भालेराव, अंजली भालेराव,गणेश गोठले, कल्पना गोठले, शिरीष अपराजित, स्वरूपा अपराजित,विनय तांबोळी,श्रुती तांबोळी,विभोर अपराजित,चिन्मय अपराजित,सतीश अपराजित, नीलिमा अपराजित, संदीप गव्हाणकर, विनोद गव्हाणकर,ज्योत्स्ना गव्हाणकर,व देशपांडे, श्रद्धा इंदूरकर तसेच समस्त नानामहाराज भक्तपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळी ७ वाजता काकडा आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर रागदारीत प्रभाती व भक्तिभजनांचे सादरीकरण करण्यात आले. 'जागो मोहन प्यारे','जागियो रघुनाथ कुँवर','उठीउठीबा श्रीगुरुवरा','उठ पंढरीच्या राया','भेटीलागे माझे','गुरुजी एक निरंजन','जाग जाग प्रभो' ,'श्रीगुरूसारिखा', 'गुरुनामाची ओढ' आदी भजनांनी वातावरण भक्तिमय झाले.यानंतर वेदशास्त्रसंपन्न श्री नुपूर शास्त्री राजहंस व श्री श्रीपाद शास्त्री तेलंग यांच्या मार्गदर्शनाखाली सद्गुरू श्री नानामहाराजांच्या पादुकांवर रुद्राभिषेक विधीपूर्वक झाला. याच वेळी 'मार्तंडमहिमा' पोथीचे चक्रीपारायण तसेच 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' या महामंत्राचा एक्का करण्यात आला. दुपारी ३ वाजता भजन कार्यक्रमास प्रारंभ झाला. डॉ.मिलिंद इंदूरकर व भक्तमंडळाच्या गायकवृंदाने 'जय जय रामकृष्ण हरी','रूप पाहता लोचनी','सुंदर ते ध्यान', 'सद्गुरू सारिखा', 'तांडव नृत्यकरी', 'दत्तांचा अभंग', 'ओ सद्गुरु राया', 'वाचे विठ्ठल गाईन', 'कान्होबाची संगती', 'देहुडा चरणी', 'पोवाडा','योगीराज श्री मार्तंडनाथा' आदी भजने भावपूर्ण सादर केली. मोठ्या संख्येने उपस्थित भक्तगणांच्या साक्षीने श्री सद्गुरू नानामहाराजांचा पुण्यस्मरण महोत्सव साग्रसंगीत व अत्यंत भक्तिभावाने पार पडला.

## सीईओ सत्यम गांधी यांचे कास्ट्राईब शिक्षक संघटनेकडून स्वागत

**अंजनगाव बारी** - अमरावती जिल्हा परिषदेचे नव्याने रुजू झालेले मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांचे कास्ट्राईब शिक्षक संघटनातर्फे शाल व पुष्पगुच्छ देऊन भव्य स्वागत करण्यात आले. स्वागत सोहळ्यात जिल्हाध्यक्ष राजेश गाडे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य अरुण रायबोले, पंडित भोयर, जयकृष्ण खडसे, संजय बोबडे व हेमंत मोहोड उपस्थित होते.या प्रसंगी सीईओ सत्यम गांधी यांनी कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या विविध मागण्या, प्रलंबित प्रश्न व प्रशासनिक अडचणी दूर करण्यास पूर्ण सहकार्य करण्याचे विश्वासदायी आश्वासन दिले. स्वागत कार्यक्रमामुळे शिक्षकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे.

# जिल्ह्यात विविध ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**नांदगाव खंडेश्वर** - येथील शासकीय विद्यामगृह, नांदगाव खंडेश्वर येथे युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात व श्रध्देपूर्वक साजरी करण्यात आली.सर्वप्रथम महामानवांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.पत्रकार बांधवांनी एकत्र येत महामानवांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण केली व त्यांच्या विचारांना व अभंग योगदानाला वंदन करण्यात आले. ग्रामीण भागातील पत्रकारांकडून आयोजित हा उपक्रम विशेष कौतुकास्पद ठरला.यावेळी पत्रकार संघाचे विभागीय अध्यक्ष उत्तमराव ब्राह्मणवाडे, नितेशजी कानबाले, श्रीपाल सहारे, अवधुत गाडेकर,देवीदास गाडेकर,पवन ठाकरे,गजेंद्र ढवळे, सुरज सहारे,पवन इंगोले उपस्थीत होते. जयंती कार्यक्रमात सामाजिक ऐक्य, बंधुता, समानता आणि शिक्षण या बाबासाहेबांनी दिलेल्या मूल्यांची पुनः स्मरण करण्यात आली. पत्रकारांनी समाजातील वंचित घटकांसाठी कार्य करत राहण्याचा संकल्पही व्यक्त केला.



**चांदूर रेल्वे** - तालुक्यातील आमला विश्वेश्वर येथील श्रीकृष्ण हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य दीपक बडोणे व प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक प्रा.ललित जावरकर,प्रा.रवींद्र मेंढे,प्रा.सुधीर पेठकर उपस्थित होते. नववीची विद्यार्थीनी दीपाली आले हिने आपल्या भाषणातून बाबासाहेबांचा संपूर्ण जीवनपट विद्यार्थ्यांसमोर उलगडला.प्रा.रवींद्र मेंढे यांनी बाबासाहेबांबद्दल सुंदर माहिती सांगून विद्यार्थ्यांना त्याबाबत अवगत केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण




**अमरावती** - 'व्हिजन इंटेग्रीटी डेव्हलपमेंट असोशिएशन (विडा)' ही स्वयंसेवी संस्था तळागाळातील निराश्रित, निःशक्त व गरजु बांधवांच्या उन्नतीसाठी मागील ११ वर्षापासुन सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. संस्थेच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि ज्ञानसुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्याने भिमज्योती ज्ञानदान अभियान अंतर्गत विदर्भ एज्युकेशन सोसायटी अमरावती द्वारा संचालित महिंद विद्यालय अमरावती येथे निवासी राहून शिक्षण घेणा-या एकुण ९० गरजु आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करून दोन्ही महामानवांची संयुक्त जयंती ख-या अर्थाने ज्ञानाची ज्योत पेटवून उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाला विदर्भ एज्युकेशन सोसायटी अमरावती द्वारा संचालित महिंद विद्यालय अमरावतीचे अध्यक्ष निलेश ताजने, मुख्याध्यापिका सुषमा निलेश ताजने, शिक्षकवृंद अन्सारी, सोळंके,चव्हाण,संभे,राऊत,खान,पंजाब पाटील,संदेश सुरकर, हेमंत वानखडे, वस्तीगृह अधीक्षक सचिन काळपांडे, माधुरी संभे, मुकेश जोगळेकर यांची उपस्थिती लाभली तर 'विडा' संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रितेश वाघमारे, महासचिव शेख नुरुद्दीन, कोषाध्यक्षा अॅड. अंकिता पाथरे-वाघमारे, सक्रिय सदस्य अंकितभाऊ जवंजाळ, अक्षयभाऊ साबळे, प्रियांशु गोंगशे, अमरदादा कणसे, जयाताई वाघमारे, मनिषाताई भटकर, अॅड. पुनम कांबळे, प्राची वाघमारे, जया देशमुख यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



**शिराळा** - शाहिद अण्णासाहेब राऊत संस्था शिराळा द्वारा संचालित दुर्गा इंग्लिश प्रायमरी स्कूल मध्ये बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर जिवनावर कार्यावर भाषणे दिली. त्यामध्ये प्रांजली पटले,युवांश भस्मे सानवी कोल्हे, परी कापसे, कृष्णाई तळखडकर, रेणुका वाठोळकर, अनुष्का भस्मे, तन्मय गभने, यश पटले, सानवी काळमेघ, प्रणव भोकसे, शिक्षका प्रगती तायडे, अंकिता घोंगडे मुख्याध्यापक प्रवीण मोहरे वर्षा तायडे, दीक्षा मनोहर शिवानी खाडे, अर्चना नागे, शालिनी कडू याप्रसंगी डॉक्टर एम वाय ढोणे साहेब किशोर बांबल राजेशभोवाळू सागर रोडे हजार उपस्थित होते.



**बडनेरा** - भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या औचित्याने प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा येथील मध्यवर्ती ग्रंथालयाच्या वतीने 'संविधान जनजागृती स्वाक्षरी अभियान' आयोजित करण्यात आले होते.सदर उपक्रम प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग व कर्मचारी यांच्या प्रमुख उपस्थितीत यशस्वीरित्या झाला. अभियाना दरम्यान विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे सामूहिक वाचन करून संविधानातील तत्त्वे, मूल्ये व कर्तव्यांचे पालन करण्याची शपथ ग्रहण केली.या अभियानाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांच्या अधिकार व कर्तव्यांविषयी भान विकसित करणे तसेच लोकशाही मूल्यांचे संवर्धन करणे हा होता. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून स्वाक्षरीद्वारे संविधानाच्या आदर व पालनाचा संकल्प व्यक्त केला.सदर अभियानाच्या यशस्वी आयोजना करीता संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीनजी धांडे, उपाध्यक्ष अॅड.उदयजी देशमुख, सचिव युवराजसिंगजी चौधरी, कोषाध्यक्ष प्रा.डॉ.हेमंतजी देशमुख, कार्यकारिणी सदस्य नितीनजी हिवसे, पंकजजी देशमुख, प्रा.विनयजी गोहाड, प्रा.गजाननजी काळे, प्रा.पुनम चौधरी यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.



**चांदूर रेल्वे-** येथील राजीव गांधी नगरातील मुलगंधकुटी बुध्द विहारात भीम जयंती उत्सव २०२६ आयोजन करण्यात आले असुन महात्मा जोतिराव फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले.यावेळी २१ दात्यांनी रक्तदान केले.अमरावती येथील बालाजी ब्लड बँकेचे डॉ.चंद्रभान दारा ( BTO),अजय रामटेके (जनसंपर्क अधिकारी),संजय विघे (टेक्निशियन), नंदू कोसे,संजय गणवीर या कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. या शिबिराकरीता नगरसेवक अरिहंत गेडाम,आयुष धवने,प्रतिक वावरे,आयुष खोब्रागडे,सम्यक इंगोले यांच्यासह भीम जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.



**अंजनगाव बारी** - जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक विनोद मुगल होते, तर प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक गजेंद्र अवघड व ज्येष्ठ शिक्षक विनोद चिंचोळकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजेंद्र अवघड यांनी करत विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये ममता बागडे, संपदा तायडे व अनुश्री भुरे यांनी प्रभावी भाषणे सादर केली.तसेच विद्यार्थिनींनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात विनोद मुगल यांनी डॉ. आंबेडकर यांनी समाजातील तळागाळातील घटकांसाठी केलेल्या कार्याचे महत्त्व पटवून दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगला मेहेरे यांनी तर आभार प्रदर्शन श्रावणी कारमोरे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन अमोल डवरे यांनी यशस्वीरीत्या पार पाडले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**अंजनगाव बारी** - आसरा नगर येथील ईगल ग्रुप मित्र मंडळातर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविण्यात आले. बडनेरा येथील 'मधुबन वृद्धाश्रम' तसेच अमरावती येथील 'सुखशांती बहुउद्देशीय संस्था वृद्धाश्रम' येथे भेट देऊन ज्येष्ठ नागरिकांना फळवाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे वृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला.संपूर्ण कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.या उपक्रमात अक्षय शेलोकर, मंजिल लोणारे, ईश्वर माहेकर ,गौरव खडसे, गौरव भुरे, जय तलवारे, रोहन गोसावी, रोहन सहारे, गौरव येरणे, राहुल सुरजुसे, रोशन कुकडे, चंदू भोयर, गौरव बागडे, प्रतीक भस्मे, उमेश तिरपुडे, अभिजीत थुटे, जयेंद्र म्हैसकर, मंथन चांबट, चेतन शेलोकर, सर्वेश पोकळे, आकाश तवाडे, ऋषिकेश खंडारे, जीवन गरुड, सुमित निचत, अनिकेत भिवगडे, चंद्रमणी खंडारे व माजी सरपंच प्रकाश खंडारे यांचा सक्रिय सहभाग होता.



**खल्लार** - नजिकच्या उपराई येथिल ग्रामपंचायत कार्यालयात भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच निरज नागे, उपसरपंच सौ अर्चना खंडारे, ग्रामपंचायत अधिकारी प्रविण पाचघरे,नाजूकराव मोहोड, अतुल मोहोड,अहमद अली, बाळकृष्ण खंडारे, विलास खंडारे, सूचित सुरवाडे, प्रदीप कीर्तक, शालू सुरवाडे, जि. प. शाळेच्या मुख्याध्यापिका हैडेक, उपकेंद्राचे डॉ. रोहित भावसार, पंकज खंडारे, माजी सरपंच कुदरत अली, राहुल कुकटकर, अंगणवाडी सेविका अनुसया खंडारे, शुभांगी कुकटकर,देवराव सुरवाडे, भिमराव सुरवाडे, निलेश विघे आदी उपस्थित होते.



**टाकरखेडा शंभू** - भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती श्रीराम प्राथमिक शाळा, टाकरखेडा शंभू येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी मुख्याध्यापक प्रवीण पाटील यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. 'भारतीय संविधानाचा विजय असो' अशा घोषणांनी शाळा परिसर दुमदुमून गेला.जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी भाषणे सादर करत बाबासाहेबांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग, त्यांचे शिक्षण तसेच संविधानाचे महत्त्व यावर प्रभावी विचार मांडले.यानंतर गावातील बौद्ध प्रार्थना स्थळाला भेट देऊन तेथेही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक प्रवीण पाटील यांनी 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो ते पितो तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही'या विचारातून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमाला सहाय्यक शिक्षक अतुल खांदे, प्रमोद विघे, प्रशांत देशमुख, रेखा खटाळे, अश्विनी दिंडीलकर, गौरी जूनघरे तसेच पद्मा सवई उपस्थित होते.



**अंजनगाव बारी** - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अंजनगाव बारी ग्रामपंचायतीत अभिवादन कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व गौरवमय वातावरणात पार पडला. सामाजिक समता, शिक्षण आणि संविधान मूल्यांची प्रेरणा जपण्याचा संकल्प या कार्यक्रमात करण्यात आला.कार्यक्रमाला प्रशासक सरपंच शोभा खडसे, उपसरपंच अरविंद निंबर्ते, ग्रामविकास अधिकारी विनोद इसळ, ग्रामपंचायत सदस्य बंडू डकरे, जगदीश अंबाडकर, प्रणाली निचत, मेघा भुजाडे, पूनम खाडे व प्रविण टवलारे यांसह गावातील आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका आणि लहान बालकांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावली.डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामाजिक बांधिलकी व प्रगतिशील भारताच्या दिशेने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत कार्यालयात करण्यात आले. ग्रामस्थांच्या सहभागामुळे जयंती कार्यक्रमाला विशेष उत्साहाचे वातावरण लाभले.



**नांदगाव खंडेश्वर** -नांदगाव हायस्कूल व क. म. वि. नांदगाव खंडेश्वर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वि जयंती सोहळा झाला. सर्वप्रथम शाळेचे मुख्याध्यापक व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रदीप रा. ठाकरे, प्रमुख अतिथी उप-मुख्याध्यापिका भारती वाटाणे, सुनीता मोहोड, नरेश घरडे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेचे पूजन करून पराक्रमाची सुरवात केली. यावेळी शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनावर प्रकाश टाकला. सर्व अतिथी व मुख्याध्यापक तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रदीप रा. ठाकरे यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मिळालेला' भारतरत्न' हाच त्यांच्या कार्याची पावती आहे असे प्रतिपादन करून त्यांच्या जिवनावर अत्यंत महत्त्वाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका पुष्पा पवार यांनी केले. तसेच कृष्णा भोसले यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या वेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# ४८ कोटींच्या दंडाचे गूढ अद्यापही गुलदस्त्यातच!

## अकोट एसडीओ, तहसीलदार यांना 'स्यू मोटो'चा पडला विसर

### -तक्रारीनंतरच चौकशी; महसूल विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील गाजीपूर येथील गट क्रमांक २७ आणि ३८ वरील बेकायदेशीर उत्खनन प्रकरणात तब्बल ४८ कोटी रुपयांचा दंड ठोठावूनही वसुलीची प्रक्रिया अद्यापही रखडलेली आहे. नोटीस, अपील, पुन्हा नोटीस आणि पुन्हा अपील या कायदेशीर प्रक्रियेच्या गुंत्यात हे प्रकरण अडकले असून महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणात शेतजमीन मालक विलास कालू चिमोटे आणि भाडेपट्टाधारक मे. साई स्टोन क्रशरचे संचालक संतोष चांडक यांच्यावर सुरुवातीला जवळपास ६४ कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला होता. मात्र संबंधितांनी हा दंड आव्हान देत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतल्यानंतर पुनर्मोजणी करण्यात आली आणि दंडाची रक्कम कमी होऊन सुमारे ४८ कोटींवर आली.

गाजीपूर येथील संबंधित जमीन वाणिज्यिक वापरासाठी अकृषक करण्यात आली असताना त्या ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने गौण खनिज उत्खनन, स्टोन क्रशर आणि डांबर हॉट मिक्स प्लांट उभारण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

भूवैज्ञानिक व खनिज संचालनालयाच्या ईटीएस मोजणीतून मोठ्या प्रमाणात अतिरिक्त उत्खनन झाल्याचे निष्पन्न झाले आहे. उच्च न्यायालयाने संबंधितांना चार आठवड्यांच्या आत सक्षम प्राधिकरणाकडे अपील दाखल करण्याचे आदेश दिले होते. मात्र ही मुदत संपल्यानंतरही अपील दाखल करण्यात आले नसल्याचे समोर आले आहे. त्यानंतर अकोटचे उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांनी फेब्रुवारीमध्ये दंड वसुलीसाठी आरसीसी प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश तहसीलदारांना दिले होते.

मार्च महिन्यात स्मरणपत्र देऊनही तहसीलदारांकडून ठोस कारवाई करण्यात आली नाही. उलट दोन आठवड्यांनंतर केवळ मागणीची नोटीस पाठवून वेळकाढूपणा करण्यात आल्याची चर्चा महसूल विभागातच रंगली आहे.

दरम्यान, एप्रिल महिन्यात संबंधितांकडून अपील दाखल केल्याचा दावा करण्यात येत असला तरी ही अपील न्यायालयाने दिलेली मुदत संपल्यानंतर कशी स्वीकारली गेली, याबाबत स्पष्टता नाही. तसेच अपील दाखल करताना शासन नियमांनुसार दंडाच्या रकमेपैकी किती टक्के रक्कम जमा करण्यात आली, की एकाही रुपयाचा भरणा न करता अपील स्वीकारण्यात आली, की अपील फेटाळून लावण्यात आली, यावर प्रशासन मौन बाळगत आहे. या संपूर्ण प्रकरणात स्यू मोटो कारवाई करण्याऐवजी तक्रारीची वाट पाहण्याचा अकोट एसडीओ आणि तहसीलदारांचा पवित्रा अधिकच संशयास्पद ठरत आहे. मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणात प्रशासनाची ही निष्क्रियता जनतेत संताप निर्माण करणारी ठरत आहे.

#### ५७ कोटींचा दंडही धूळ खात

अकोट तालुक्यातील रुदाळी प्र. खटकाळी येथील गट क्रमांक २ वरील बेकायदेशीर उत्खनन प्रकरणात बाळू शंकर सोयाम व इतरांवर सन २०१९ मध्ये तब्बल ५७ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. या दंडाची नोंद सातबाऱ्यावर करण्यात आली असली तरी त्यानंतर पुढे कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. दंड वसुली, अपील प्रक्रिया किंवा शासन पातळीवरील निर्णय याबाबत संपूर्ण माहिती अद्यापही अस्पष्ट आहे. परिणामी, मोठ्या रकमेचे दंड फक्त कागदोपत्रीच राहणार का, असा सवाल उपस्थित होत असून महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### अचलपूर-परतवाडा येथील

## सहा पोलिसांची नियंत्रण कक्षात बदली



या प्रकरणानंतर अनेक नागरिकांनी जुळ्या शहरातील परतवाडा - अचलपूर पो. स्टेशन मधील खुपिया विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्न निर्माण केले. अनेक कर्मचारी ४-५ वर्षापासून त्या ठिकाणी कार्य करीत आहे .आणि मनमर्जी प्रमाणे पक्षपाती कारभाराच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्याने या तपासात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी मी व्यापारी व नागरिकांसोबत आज १५ एप्रिल रोजी अमरावती जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांना पत्र दिले. अमरावती जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी घेतलेल्या निर्णयाचे स्वागत असून जनतेमध्ये समाधान व्यक्त होत आहे. जुळवा शहरात कायदा ,शांतता ,सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी पोलिस विभागाला अनेक गोष्टीत बदल करावा लागणार आहे आणि तो होईल अशी आशा आहे. **-आ.प्रवीण तायडे,** अचलपूर

**अचलपूर/प्रतिनिधीः-** जुळ्या शहरातील लैंगिक शोषण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी व आरोपी जेरबंद व्हावे याकरीता ग्रामिण पोलिस अधिक्षक विशाल आनंद यांनी विशेष पथकाची स्थापना केली आहे. दहा पोलिस अधिकारी व ३६ अंमलदारांचा समावेश करत उपविभागीय पोलिस ☞(पान २ वर)

## दारूच्या अतिसेवनामुळे वृद्धाचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** दारूच्या अति सेवनामुळे वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना नांदगाव पेठ पोलीस ठाणे हद्दीत मंगळवारी रात्री समोर आली आहे. ज्ञानेश्वर बाबुराव बेंडे (वय ६०, मालीपुरा) असे मृतक वृद्धाचे नाव आहे. माहितीनुसार ज्ञानेश्वर बेंडे यांना दारूचे व्यसन होते. ते नेहमी दारूच्या नशेत राहत होते. मंगळवारी सायंकाळी दारू पिण्यामुळे त्यांची तब्येत बिघडली आणि त्यांच्या झोपडीतच त्यांचा मृत्यू झाला. याची माहिती तिथून जाणाऱ्या नागरिकांनी नांदगाव पेठ पोलिसांना☞(पान २ वर)

## तीन अपत्य असणाऱ्या एमआयएम नगरसेविकेला नोटीस


### एका आठवड्यात मागितला खुलासा



**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीमध्ये एम आय एम पक्षातून विजयी झालेल्या महिला नगरसेविका नुजहत परवीन शाकीर हुसेन यांना तीन अपत्य असल्यामुळे महानगरपालिकेच्या वतीने आज बुधवार १५ एप्रिल रोजी नोटीस बजावण्यात आली आहे. या नोटीस वर त्यांना एका आठवड्याचे आत आपले उत्तर द्यायचे आहे. यामुळे महानगरपालिकेमध्ये एकच खळबळ उडाली आहे. माहिती नुसार प्रभाग क्रमांक २१ ब बनडेरा मधून नुजहत परवीन शाकीर हुसेन यांनी एमआयएमच्या तिकीटवर निवडणूक लढविली होती. या निवडणुकीत त्या विजयी झाल्या. त्यांच्या विरोधात दोन पेक्षा अधिक अपत्य असल्याची तक्रार ☞(पान २ वर)

## कार ट्रकवर धडकल्याने चिमुकलीसह वडिलांचा मृत्यू


### -आई गंभीर, साखरा येथे अपघात



**यवतमाळ/प्रतिनिधीः-** बोअरवेलच्या ट्रकवर कार धडकून झालेल्या अपघातात सहा महिन्यांच्या चिमुकलीसह तिच्या वडिलांचा मृत्यू झाला, तर आई गंभीर जखमी झाली. ही घटना मंगळवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास पांढरकवडा मार्गावर साखरा (खु.) नजीक आश्रम शाळेजवळ घडली. या अपघातात संपूर्ण कुटुंबच उद्ध्वस्त झाले. हंसिका गोडगुल्ला (सहा महिने), साईकिरण गोडगुल्ला (वय ३०) अशी मृतांची नावे आहेत. अनुष्का साईकिरण गोडगुल्ला (वय २५) या गंभीर जखमी असून, त्यांच्यावर यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.☞(पान २ वर)

## आरोपी अयान अहमदच्या घरावर चालवला बुलडोझर

### परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी गठीत



**परतवाडा/प्रतिनिधीः-** अश्लील फोटो व व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित केल्याच्या प्रकरणातील आरोपी अयान अहमद तनवीर अहमद (वय १९) याच्या घरावर आज बुधवार १५ एप्रिल रोजी' बुलडोजर चालवण्यात आले. त्याच्या घराचा काही भाग अतिक्रमित असल्याने नगर परिषदेने घराचा जीना तोडून टाकला. या कारवाईदरम्यान प्रचंड पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. लोकांनीही गर्दी केली होती. राज्यभरातील ही पहिली कारवाई परतवाडामध्ये करण्यात आली तसेच प्रकरणातील आणखीन तीन आरोपी उजेर उजेर खान इकबाल खान (वय २०),तरबेज खान तसलीम खान(वय २४) व मो.साद मो.साबीर (वय २२, तिघे राहणार, अचलपूर) यांना ताब्यात घेतले आहे. तिघांना न्यायालयात हजर करण्यात आले. तिथे त्यांना २१ मार्चपर्यंत पीसीआर देण्यात आला आहे. तसेच या प्रकरणाच्या तपासणीसाठी एसआयटी पथक गठीत करण्यात आले आहे.☞(पान २ वर)

#### अन्य सहा संशयित ताब्यात

या प्रकरणात पोलिसांनी आणखीन सहा संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून विचारपूस केली जात आहे. यामध्ये एक आरोपी हा मुख्य आरोपी अयान अहमदला रूम उपलब्ध करून देत होता. पोलीस आता त्याच्याकडून विचारपूस करत आहे.

## जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात येत्या तीन दिवसात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. जिल्ह्याच्या तापमानात वाढ होणार असून नागरिकांनी याबाबत सतर्कता बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

भारतीय हवामान खात्याने विदर्भात येत्या तीन दिवस उष्णतेच्या लाटेबाबत इशारा दिला आहे. त्यामुळे नागरिकांनी दुपारी उन्हात जाणे टाळावे, तसेच आवश्यक असल्यास उष्णतेपासून बचाव करण्याचा उपायाचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. भारत हवामान विभागाच्या प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर यांनी विदर्भातील अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांसाठी पुढील दोन दिवस उष्णतेच्या लाटेची ेतावणी जारी केली आहे. तसेच विदर्भातील इतर भागांमध्येही कमाल तापमान सामान्यापेक्षा सुमारे ३-४°से. अधिक राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी.

**उष्णतेच्या लाटेदरम्यान घ्यावयाची काळजी :**

शक्यतो दुपारी १२ ते ३ या वेळेत बाहेर जाणे टाळावे. पुरेसे पाणी प्या, तहान नसली तरी नियमितपणे द्रवपदार्थ घ्यावेत. हलके, सैल आणि फिकट रंगाचे सूती कपडे परिधान करावेत. बाहेर पडताना टोपी, छत्री किंवा ओला कापड वापरून डोके झाकावे. मद्यपान, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड पेये कमी प्रमाणात घ्यावीत, ☞(पान २ वर)

## सीबीएसई दहावीचा निकाल जाहीर

### स्कूल ऑफ स्कॉलर्सची अक्षरा पानझाडे ९३.२०% गुणांसह उत्तीर्ण



**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (CBSE) इयत्ता दहावीचा निकाल नुकताच घोषित केला असून, अमरावती येथील स्कूल ऑफ स्कॉलर्स (निंभोरा खुर्द) या शाळेची विद्यार्थिनी अक्षरा ज्ञानेश्वर पानझाडे हिने घवघवीत यश संपादन केले आहे. अक्षराने ९३.२०% गुणांसह यशाची मोहोर उमटवली आहे. अक्षराने केवळ एकूण टक्केवारीच नव्हे, तर विषयानुसारही उत्कृष्ट कामगिरी केली आहे. विशेषतः आधुनिक काळातील महत्त्वाचा विषय असलेल्या 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'मध्ये तिने १०० पैकी ९९ गुण पटकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. तसेच इंग्रजी (९६), सोशल सायन्स (९३) आणि मराठी (९०) या विषयांतही तिने नव्वदी पार केली आहे. अक्षराने मिळवलेल्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.☞(पान २ वर)

## महिला पत्रकाराचा अपमान करणाऱ्या प्रवीण तोगडिया विरोधात जिल्हा कचेरीवर निदर्शने

### महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने केली कारवाईची मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** आंतरराष्ट्रीय विश्व हिंदू परिषद तथा राष्ट्रीय बजरंग दलाचे प्रमुख प्रवीण तोगडिया यांनी एका पत्रकार परिषदेत महिला पत्रकाराला जात विचारून तिचा अपमान केला. त्यांच्या या वक्तव्याच्या विरोधात पत्रकारांच्यावतीने निदर्शने करण्यात आली. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ विदर्भ प्रदेशाध्यक्ष नयन मोंढे यांच्या नेतृत्वात बुधवार ( दि. १५) अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर आंदोलन करून कारवाईच्या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. यावेळी सावित्रीबाई फुले के देश मे महिला पत्रकारों का अपमान नही चलेगा, प्रवीण तोगडिया मुर्दाबाद, प्रवीण तोगडिया हाय हाय, जातीयवादी प्रवीण तोगडिया वर कारवाई झालीच पाहिजे, महिला ☞(पान २ वर)

## एकविरा देवी संस्थानची नवीन कार्यकारणी घोषित

### अध्यक्ष राजेंद्र टेंभे, सचिव योगेश राठी



**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री एकवीरा देवी संस्थांच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये अध्यक्ष पदावर सिंचन विभागात इंजिनियर पदावर राहिलेले राजेंद्र टेंभे यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर सचिव सीए योगेश राठी आणि कोषाध्यक्ष पदावर चंद्रशेखर उर्फ शेखर कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एकवीरा देवी संस्थान☞(पान २ वर)

## पेट्रोलपंपाच्या बाजुलाच आगीचा भडका

### डीपीजवळील पार्किंगमुळे आग -महावितरणचे दुर्लक्ष; नागरिकांत संताप



डीपीतील स्विचमध्ये स्पार्किंग होऊन आग लागली.यासंदर्भात आमच्याकडे पूर्वी कुठलीही तक्रार आलेली नव्हती.आज त्याठिकाणी आग लागल्याचे समजताच तेथील माहिती घेतली,लवकरच डीपीची दुरुस्ती केली जाईल.

**-श्री.रिठे,** सहाय्यक अभियंता, मोझरी

**तिवसा/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय महामार्गावरील कृष्णाजी पेट्रोल पंपाच्या लगत आज बुधवारी (दि.१५) दुपारी सुमारे एक वाजताच्या सुमारास अचानक आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. डीपीजवळ अनधिकृत पार्किंग व धोकादायक स्थितीत असलेल्या विद्युत ताऱ्यांमुळे ही आग लागल्याचे प्राथमिक निष्कर्षातून स्पष्ट झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तिवसा ते मोझरी महामार्गावरील कृष्णाजी पेट्रोलियम शेजारील डीपीजवळ गेल्या अनेक दिवसांपासून वाहनांचे पार्किंग होत होते. संबंधित डीपी वरील डिओ 'ऑटोमॅटिक' असल्याने त्या ठिकाणी वारंवार हालचाल होत असते. याच ठिकाणी जिवंत विद्युत वाहिन्यांच्या तारा जमिनीवर लोंबकळत असल्याने मोठा धोका निर्माण झाला आहे. पेट्रोल पंपाचे मालक भूषण यावले यांनी यापूर्वी अनेकदा महावितरणाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रारी करून तसेच ☞(पान २ वर)

